८८२६

# पारध

( शिकारकथांचा संग्रह )

•

मधु मंगेश कर्णिक

•

प्रस्तावना

जयंतराव टिळक

IRBK-0107726

IRBK-0107726

ना प्रकाशन, पुणें

किंमत रु. २·५०

ગો · ઝું · ૭૭૨૬

૩૦૪૪૭
ગ્રા·વાં·
૨૪૧૭

# पारध

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
बा. क्र. १६८९२ नों दि ..........
वि. ......... बाळवा.........

## मधु मंगेश कर्णिक

प्रस्तावना
जयंतराव टिळक

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ३०७७२८
दि. भाषा बाल वाङ्मय
क्रमांक २५९८
नों. दि.
वाचनालय शाखा

IRBK-0107726
IRBK-0107726

साधना प्रकाशन, पुणें
किंमत रु. २·५०

स्वातंत्र्य दिन
१५ ऑगस्ट १९६०

© मधु मंगेश कर्णिक

मुखपृष्ठ : अरविंद मेस्त्री

प्रकाशक :
**प्रभाकर सिद्ध**
साधना प्रकाशन
४३०-३१ शनवार
पुणें २

मुद्रक :
**ह. म. गद्रे**
जनवाणी प्रिंटिंग प्रेस
४५ बुधवार पेठ : पुणें २

ती. रा. रा. रघुनाथ रावजी कर्णिक

रिटायर्ड डिस्ट्रिक्ट जज्ज

व

ती. सौ. विमलाबाई र. कर्णिक

यांना कृतज्ञतापूर्वक अर्पण

## चाप ओढण्यापूर्वी —

श्री. कर्णिकांसारखा मीहि एक वेडापीर आहे. सिंहगडावरून माझा माळी " साहेब वाघ फिरतोय्. चलतां कां ? " अशी वर्दी घेऊन पुण्याला आला कीं, माझें कामावरील लक्ष उडतें. पुढ्यांत घेतलेलीं कामें तेथेंच थंडावतात व मी उगीचच कागदावर रेघोट्या ओढूं लागतो. माझ्या मनःचक्षूंपुढें सिंहगडाचें जंगल उभें राहतें. रानांतील वस्तीभोंवतीं एखादें बकरें दाबायला मिळतें कां म्हणून घिरट्या घालणारा बिबट्या मला दिसूं लागतो. ' वाडींतल्या सोम्याचे बकरें वाघानें नेलें. तानूचं शेरडं कुडातनं आंत पंजे घालून वढलं ! ' इत्यादि गाऱ्हाणीं सांगत माझ्याभोंवतीं गोळा झालेले गुराखी मला दिसूं लागतात ! आणि मग मीं सारीं कामें बाजूला सारून सिंहगडचा रस्ता सुधारतो. असा हा शिकारीचा मोठा वेडा पण मर्द नाद आहे.

शिकारीचा नाद पुष्कळांना असतो आणि त्या शास्त्रांत पुष्कळांना उत्तम गतीहि असते पण ज्याचा हात जसा बंदुकीच्या चापावर तसाच लेखणीवरहि आहे अशीं माणसें विरळीं आढळतात. श्री. कर्णिक हे त्यांपैकीं एक आहेत. पुनः पुन्हां वाचूनहि समाधान होऊं नये व शिकाऱ्याच्या डोळ्यापुढें तर त्या कथांच्या वाचनानें प्रतिसादासारखें स्वानुभवाचे प्रसंग उभे राहावेत इतक्या आकर्षक शैलींत त्यांनीं आपलीं साहसें ' पारध 'मधील या कथांतून गुंफलीं आहेत. इंग्रजी वाङ्मयांत साहस-कथांनीं एक खास जागा पटकावली आहे व युद्धकथांइतक्याच किंबहुना किंचित् अधिकांशानें शिकारकथा रम्य ठरल्या आहेत. मात्र मराठी वाङ्मयाच्या दालनांत श्री. रा. वि. फडतऱ्यांमुळेंच शिकार-कथेस प्रवेश मिळाला. आतां मात्र या कथांचें वाचकांत इतकें जबरदस्त आकर्षण निर्माण झालें आहे कीं, बहुतेक मासिकांच्या खास अंकांत शिकारकथा हें एक खास सदर बनलें

आहे. परंतु प्रत्यक्ष शिकाऱ्यानें लिहिलेल्या स्वानुभवाच्या शिकारकथा मराठी नियतकालिकांना तरी फारच थोड्या उपलब्ध होत असल्यानें बहुतेकांना अनुवादांनींच आपली गरज भागवावी लागते. पुस्तकांबद्दल तर बोलावयासच नको! मला वाटतें, फडतऱ्यांच्या 'रानोमाळ', 'मृगये'नंतर श्री. कर्णिकांची, 'पारध'च काय ती ग्रंथरूपानें प्रकाशित झाली असावी. इंग्रजीमधील विपुल ग्रंथनिष्पत्तीच्या हिशोबांत ही केवळ सुरुवात आहे. कुमाऊनमधील कॉरबेट साहेबाच्या (जिम कॉरबेट) किंवा निलगिरीमधील अंडरसन साहेबाच्या (केनेथ अंडरसन) सखोल ज्ञानाच्या व साहसाच्या तुलनेंत श्री. कर्णिक यांची शिकार हा 'खेळ' ठरेल. वाघांना वाघांबद्दल जेवढी माहिती नसेल तेवढी भारताच्या उत्तर-दक्षिण भागांत संचार केलेल्या या साहेबांना त्यांच्याबद्दल होती; व जंगलांत अनेक वर्षें हिंडून मिळविलेल्या या ज्ञानाच्या जोडीला बंदुकीबरोबर लेखणीची करामतहि त्यांच्याजवळ असल्यानें शिकाऱ्यांना अभ्यसनीय ठरावी अशी ग्रंथ-निष्पत्ति त्यांच्या हातून झाली. धुळीवरून सरपटत गेलेला साप विषारी कां बिनविषारी हें त्याच्या धुळीवर उमटलेल्या सरपटीवरून सांगणाऱ्या कॉर्बेटच्या ज्ञानानें जसें मन थक्क होतें तसेंच मनुष्यभक्षक वाघाच्या हकीगती वाचतांना पुष्कळ वेळां श्वास रोखून धरण्याचा प्रसंग येतो.

कॉर्बेट किंवा अंडरसन साहेबाच्या अभ्यासाच्या मानानें कर्णिकांचा अभ्यास हा मर्यादित असेलहि. पण तोच साहसी पिंड, तीव्र रग या मर्द शिकाऱ्यांतहि आढळते. 'एका शिकंदर काडतुसाची गोष्ट,' तर अशी विलक्षण आहे कीं, सामान्य माणसाचा त्यावर विश्वास बसणार नाहीं. लेखणीच्या करामतीनें मूळ मामुली शिकार कर्णिकांनीं खुलवून तर सांगितली नाहीं ना अशी शंका वाटावी! पण शिकारीच हें जाणूं शकेल कीं असे हे अवचित प्रसंगच शिकारीची लज्जत वाढवतात व या नादांत बेहोषी निर्माण करतात. शिकारकथांचें तर हेंच वैशिष्ट्य आहे कीं त्यांतील प्रसंगांची मूळचीच खुमारी अशी विलक्षण असते कीं साहित्यिक मालमसाला हा केवळ दर्शनीयच ठरतो. साहस ही एक जबरदस्त नशा आहे, व या धुंदींतच माणूस अघटित वाटावें, असें कांहीं करून जातो हें खरें! पण शिकार हें जसें साहस आहे तसें शास्त्रहि आहे म्हणूनच तो एक 'मर्द खेळ' म्हणून आजवर

मानला गेला व एका काडतुसानिशीं दोन कराल व्याघ्रांशीं झुंजण्यांत कर्णिकांना अमाप आनंदाची प्राप्ती झाली. त्यांच्या शिकारी आयुष्यांतील तो आजरामर प्रसंग ठरला व ती शिकंदर काडतुसाची रिकामी केस लाख मोलाची मानून त्यांनीं जपली.

जुनीं जंगलें गेलीं व जुनी शिकारहि गेली. नवी कॉंक्रीटचीं जंगलें आतां त्याजागीं उभीं आहेत. या कॉंक्रीटच्या जंगलांतून क्षुद्र मनाची दोन पायाची जनावरें हिंडत असतात. वाघ-बिबट्याबद्दल आपण भिती बाळगावी असे खरोखरीच कांहीं नाहीं. मोठ्या छातीचा तो गडी असतो; 'जंगलचा न्याय' मर्द छातीनें स्वीकारतो. 'माणसाच्या न्याया'पेक्षां 'जंगलचा न्याय' कितीतरी पटींनीं उदात्त आहे. आपण माणसें दुसऱ्याबद्दल अधिक्षेपानें बोलतांना, 'जनावर' असें त्याला म्हणतो. पण खरोखर माणसानें माणसाला इतका हीन करून सोडला आहे कीं जनावर या शब्दानें त्याचा गौरवच होईल. रक्तपिपासू ठरविलेल्या वाघाबद्दल कॉरबेट म्हणतो, 'A Tiger is a large hearted gentleman with boundless courage.'

श्री. कर्णिक यांचा हा कथासंग्रह वाचकांनीं मुळांतच वाचावा अशी शेवटीं शिफारस करण्याशिवाय इलाज नाहीं. कारण शिकार आणि शिकार-कथांवर माझ्यासारखा वेडा लिहूं लागला किंवा बोलूं लागला कीं त्यास अंत राहणार नाहीं. आम्हां शिकाऱ्यांच्या या आनंदाचा कांहीं वाटा तुम्हांसहि श्री. कर्णिकांनीं या पानांवर वाढून देऊन आमच्या आनंदांत सहभागी केलें आहे. शिकारीच्या वास्यानें आपली जीभ चाळवेल हें खरें पण मला तें पाहिजेत आहे. आपली हौस पुरवावी म्हणून आपण अधिकाधिक कर्णिकांच्या मागें लागलात तर श्री. कर्णिकांच्याहि लेखणींतून शिकार-वाङ्मयांत अधिक भर पडेल व तेच घडावें हीच इच्छा !

—ज. श्री. टिळक

# एक निःसंकोच निवेदन

या संग्रहामध्यें सगळ्या ‘ शिकार-कथा ’ आहेत; ‘ शिकार-वृत्तांत नव्हेत. ’ ‘ शिकार-वृत्तान्त ’ म्हणजे लेखकानें—वा ज्याचे अनुभव तो स्वतःच्य। लेखणीनें वाचकांसमोर ठेवीत असेल, त्या बरकंदाजानें—प्रत्यक्ष केलेल्या शिकारीची सत्य वर्णनें. आणि ‘शिकार—कथा’ म्हणजे लेखकानें स्वतःच्या कल्पनेनें निर्माण केलेल्या शिकारी जीवनावरील कथा. जशा रहस्यकथा, दर्यावर्दी साहसकथा, शौर्यकथा, इ०....अर्थात् कल्पनेनें ‘ शिकार—कथा ’ लिहायच्या म्हटलें तरी लेखकाला त्या जीवनाचा किमान अनुभव नसेल तर केवळ हौसेनें ज्यावर लिहावें, असा हा विषयच नाहीं. सुदैवानें मला शिकारीच्या छंदाखातर मनमुराद भटकायला मिळालें, त्यामुळें शिकारीचे नाना तपशील माहीत झाले; शिकारीचे खेळ नजरेनें पाहण्याचा मोका मिळाला, कित्येक नामांकित शिकाऱ्यांचा स्नेह लाभला आणि त्यांच्या तोंडूनहि कैक रसभरित शिकार-वृत्तान्त ऐकतां आले. या साऱ्या सामग्रीचा उपयोग करून मी या ‘ शिकार-कथा ’ लिहिल्या.

त्यामुळें माझें कसब फक्त या ‘ शिकार—कथा ’ लिहिण्यापुरतेंच आहे हें कबूल करतांना मला मुळींच संकोच वाटत नाहीं.

—मधु मंगेश कर्णिक

## अ नु क्र म


◎ प्रस्तावना

◎ लेखकाचें निवेदन

| | | |
|---|---|---|
| १ | माझा पहिला रानडुक्कर | १ |
| २ | एका शिकंदर काडतुसाची गोष्ट | ९ |
| ३ | गड आला पण सिंह गेला | २३ |
| ४ | घायाळ | ३३ |
| ५ | वेध | ४० |
| ६ | पारध | ४९ |
| ७ | मत्स्यवेध | ६० |
| ८ | कुर्दुर कुर्दुर घुम्... | ६८ |
| ९ | भैरवगडचा नरभक्षक | ७३ |
| १० | बिबट्याशीं झुंज | ९४ |

# १ : माझा पहिला रानडुक्कर

पंधरा-सोळाव्या वर्षीं मी बंदूक वापरायला शिकलों; तेव्हांपासून माझ्या मनांत एक गोष्ट दडलेली होती. ती ही कीं आजूबाजूच्या पांच-दहा गांवांत माझा नामांकित शिकारी म्हणून लौकिक व्हावा—आणि त्या आधीं लवकरांत लवकर माझी एखाद्या माजलेल्या रानडुकराशीं गांठ पडावी...

अशी इच्छा माझ्या मनांत दृढ व्हायला एक मोठें कारण घडलें होतें. माझी एका कर्दनकाळ रानडुकराशीं अशी एकदां उघड्या मैदानांत मुलाखत झाली होती; आणि मी भेदरून जाऊन, त्याला अंगावरून तसाच सरळ जाऊं दिला होता! त्याच्यावर बंदूक रोखण्याची हिंमत मला त्यावेळीं झाली नव्हती!...मी त्यावेळीं अगदींच पोरसवदा बरकंदाज होतों. नुक्तीच बंदूक उडवायला शिकलों होतों, नि गांवकऱ्यांबरोबर गंमत म्हणून रानांत पारधीला गेलों होतों. रानांत शिरतांच, इतर बहाद्दर बंदुकवाल्यांना सोडून माझ्याच अंगावर सरळ एक रानडुक्कर चालून आला होता! मी बंदूक उचलावी म्हणून चहूंबाजूंनीं रानकाढ्यांनीं एकच हांकाटी केली होती.... पण मी भलताच घाबरलों होतों. आयुष्यांत प्रथमच असा रौद्र पशु पाहून जिवाच्या भीतीनें कांपूं लागलों होतों...नि तें जनावर माझ्या अंगावरून गोळी न खातां पुढें जातांच, मी माझ्या गांवकऱ्यांच्या शिव्या-शापांना बळी पडलों होतों. कुणीतरी कुत्सितपणें म्हणाले होते—" हुडत्! आतां बंदूक चुलीला लाव नेऊन फुंकणीऐवजीं!"

ती चीड माझ्या अंगांत तेव्हांपासून शाबूत होती. ते उपहासाचे शब्द मी तेव्हांपासून विसरलों नव्हतों.

आज या गोष्टीला चांगली चार वर्षें लोटलीं होतीं. दरम्यान मी खरोखरीच नेमबाजीचा अभ्यास चांगला केला होता. विशीं-बाविशींतलें धाडस नि जिद्द माझ्या अंगीं उत्तम बाणली होती. ससा, भेकर, पिसय असलीं क्षुल्लक जनावरें मी कैक मारलीं होती. कुणी उंच आंब्यावर नारळाचें निशाण टांगलें, तर तें मी अचूक भेदीत होतों.

पण अद्याप मला हवी तशी संधि मिळाली नव्हती. गांवकऱ्यांच्या नजरेंत खुपेल असा एखादा रानडुक्कर मला एकट्यानें ठोकायचा होता. अशा संधीसाठीं मी अहर्निश धडपडत होतों. आणि ती संधि मला यंदा अगदीं अनायासे लाभली होती...

यंदा गोकुळाष्टमीपासून पावसानें विलक्षण जोर धरला होता. कणकवलीला दीडशें इंचावर पाऊस पडल्याची नोंद झाली होती. आतां पाऊस आटोक्यांत आला नसता तर आमच्या दरिद्री मुलुखांतल्या तुटपुंज्या शेतीचा नाश झाला असता......

मळ्या-मळ्यांतून हळवीं भातें पिकायला आलीं होतीं. पटणी, अवचितें या जातींच्या भातशेतीच्या लोंब्या पावसानें गळून पडूं लागल्या होत्या. गणेशचतुर्थीला नव्या भाताचा नैवेद्य दाखवण्याच्या आशेनें खूष असलेले कुळवाडी या पावसामुळें चिंतातूर झाले होते. पिकलेलें भात त्यांना घरांत आणतां येत नव्हतें...घरांत आणलेलें झोडतां येत नव्हतें...नि तांदूळ नजरेला पडत नव्हता.

त्यांत भरीला भर म्हणून यंदा मळ्यांत रानडुकरांचा उपद्रव सुरू झाला होता. रानडुकराची अवलाद नंबर एकची विध्वंसक. भातावर एकवेळ कीड पडलेली पत्करते; पण रानडुकरांचें पाऊल मळ्यांत पडतां कामा नये— असें शेतकरी नेहमीं म्हणतात. आमच्या गांवच्या मळ्यांत रानडुकरें येऊं लागलीं, ही बातमी, कशी कोण जाणें, फोंड्या-कणकवलीच्या बंदुकवाल्यांना अचूक समजली. ते रोज रात्रीं आमच्या मळ्यांत झगझगीत बॅटऱ्या घेऊन फिरूं लागले. बाजारपेठेंतले ते पैसेवाले हौशी शिकारी. त्यांच्याजवळ काडतुसी बंदुका असायच्या नि पट्ट्याला काडतुसेंहि मुबलक असायचीं. ते लोक कधीं दिवसाउजेडीं रान काढण्याच्या भानगडींत पडत नसत. भातें

पिकूं लागलीं कीं ते लोक रात्रीचे हिंडत नि शेतांत चरत असलेलें जनावर बॅटरीनें दिपून बघत उभें राहिलें कीं नेम धरून ठोकीत. त्यांचा सरंजाम जय्यत असायचा—नि त्यांची शिकारहि हमखास साधायची.

यंदा मीहि या संधीचा फायदा घ्यायचें ठरविलें. पण माझ्याजवळ फोंडेकर शिकाऱ्यांसारखी सामग्री नव्हती ! माझी बंदूक होती गांवठी. ठेंचून भरण्याच्या जुन्या पद्धतीची. शिवाय माझ्याकडे प्रखर टॉर्चेहि नव्हता ! नि मुख्य म्हणजे मला रात्रीच्या शिकारीचा मुळींच अनुभव नव्हता......

तरीहि माझ्यानें स्वस्थ बसवेना. वाडींतल्या माझ्या सवंगड्यांना माझ्या बेताची कल्पना मी दिली. आणि आम्हीं तीन प्रहरीं मळ्यांत जाऊन कुणाकुणाच्या शेतींत डुकरांची खावट झाली आहे, त्याचा अंदाज घेतला. रस्त्याबरोबरच्या सुताराच्या शेतींत आदल्या रात्रीं डुकरांनीं धुडगूस घातलेला आम्हांला दिसून आला. नजीकच्या जंगलांतून भुकेलेलीं रानडुकरें पोसावलेल्या भातांत घुसण्यासाठीं बहुधा तिन्हीसांजेबरोबरच निघत असावीं. बापड्या सुतारानें हळवें भात आशेनें केलें होतें, आणि डुकरांनीं त्याची बेबंद नासाडी केली होती. ओल्या पाणथळ जमिनींत जनावरांची पावलट स्पष्ट उठली होती.

आम्ही रात्रीं लवकर जेवणें आटोपलीं. मी बंदुकींत बार भरला. बंदूक उलट करून आंत प्रथम दोन अंगुळें गनपॉवडर सोडायची, त्यानंतर नेट येण्यासाठीं काथ्याचें भूस गजानें ठेंचून भरायचें नि मग शिशाची ठोकून हातीं बनवलेली गोळी आंत टाकून पुन्हां भूस भरायचें; म्हणजे झाला बार पक्का. मग निपलवर कॅप बसवली म्हणजे बंदूक फायरिंगसाठीं सज्ज झाली. हा ठेंचणीच्या गांवठी बंदुकीचा बार काडतुसाएवढाच प्रभावी असतो, फक्त यामध्यें गैरसोय इतकीच कीं काडतुशीं बंदुकीसारखा लागोपाठ गोळीबार या बंदुकीनें करतां येत नाहीं. आणीबाणीच्या प्रसंगीं ही गैरसोय प्राणावरसुद्धां बेतते; पण तो धोका आमचे कोंकणांतले गरीब शिकारी खुशाल पत्करतात. त्यांना काडतुशी महागड्या बंदुकी परवडत नाहींत...

आम्ही बंदुकींत बार भरून तयार झालों. पण बॅटरीवाल्या गोपाळ पावसकराचा अद्याप पत्ता नव्हता. त्याचा भाऊ मुंबईहून गणेशचतुर्थीसाटीं

नुकताच आला होता. त्यानें येतांना एक तीन सेल्सची बॅटरी आणली होती. त्या बॅटरीच्या बळावरच आम्ही बाहेर पडणार होतों....अखेरीस गोपाळ आला आणि आम्ही निघालों. आम्ही एकंदर चौघेजण होतों. त्यांत मी मुख्य असामी—म्हणजे बरकंदाज. त्यानंतर महत्त्वाचा माणूस गोपाळ पावसकर–तो बॅटरी दाखविणारा होता. शिवाय दोन शिकारीचे शोकीन गडी आम्ही मुद्दाम बरोबर घेतले होते...वेळ आहे, वखत आहे, यासाठीं !—

भाद्रपदांतील शुद्ध द्वितीयेची ती रात्र होती. आकाश एवढें गच्च ढगाळलें होतें कीं चंद्रकोर राहोच, पण चांदणीहि कुठें चमकत नव्हती... काळोख काजळापेक्षांहि दाट झाला होता. आम्ही परस्परांना खेटून चाललों होतों, पण एकाची आकृती कांहीं दुसऱ्यास दिसत नव्हती ! काळोखांतूनच आम्ही अंदाजानें चाललों होतों. सडकेवर येतांच प्रकाशझोत टाकायला सुरुवात करायची असें ठरलें होतें.

एवढ्यांत रघु कदमाला एकाएकीं जोराची ढांस आली. त्याला ती आवरतां आवरेना. चालतां चालतांच त्यानें निमूट खालीं बैठक मारली नि दोन्ही हातांनीं तोंड आवळीत तो खोकला दाबूं लागला.......हा इसम आपल्या कामांत बिघाड आणणार हें ओळखून मी म्हणालों—" रघु, तूं नि सहदेव इथेंच या शाळेच्या पडवींत बसा. इथें हळुंहळूं गप्पा मारल्यात तरी चालेल. मी व गोपाळ तेवढे पुढें मळ्यांत जातों. बार झाला तरी तुम्हीं पुढें येऊं नका.......आम्ही फेरी टाकून येईपर्यंत इथेंच बसून रहा—" खोकला दाबण्याच्या खटपटींत गुदमरून गेलेला रघुजी आनंदानें म्हणाला—" हां ज्या हां—"

पुन्हां एकवार गोपाळला मी शेवटच्या सूचना दिल्या.—" हें बघ गोपाळ, अंगावर लाईट पडतांच जनावर कदाचित् एकदम बिथरून आपल्यावर चाल करील किंवा घाबरून तसेंच पळत सुटेल. कांहीं झालें तरी न भितां तूं बॅटरी रोखून धरायची...जनावर माझ्या मजुऱ्यांत येतांच मी सोडीत नाहीं. तूं चिंता करूं नकोस—"

गोपाळनें खात्रीच्या स्वरांत 'होय' म्हटलें...आठ दहा मिनिटांतच आम्ही रस्त्यावर आलों. इथून दोन्ही बाजूंना गांवची दरोबस्त भातशेती

पसरली होती. क्षणभर उभे राहून आम्ही चाहूल घेऊं लागलों. रात-किड्यांचा कर्कश आवाज वातावरणांत भरून राहिला होता...वाऱ्याच्या झुळुकीबरोबर पिकलेल्या भाताचा आलेला उग्रट गंध नाकावर ठरत नव्हता. पलीकडच्या वाडीवर नुकत्याच सुरूं झालेल्या भजनांतील टाळ-नालीचा आवाज मंदपणें घुमत होता......अचानक पावसाचे चार शिंतोडे अंगावर पडले. मी आकाशांत पाहून म्हणालों—" महाराजा, आजची रात्र मेहरबानी कर—"

थोडा वेळ गेला तरी कुठूनच कांहीं चाहूल येईना...मग एकाएकीं एक टिटवी भेदरून ओरडली—नि मग तिच्या पाठोपाठ आणखी कांहीं टिटव्या ओरडत उंच उडाल्या नि पुन्हां पूर्वींसारखें चिडीचीप झालें ! मी गोपाळला इशारत दिली आणि टिटव्या ओरडल्या त्या दिशेनें आम्ही रस्त्यानें सरळ चालूं लागलों. थोडे अंतर जातांच आम्हांला जनावरांचा सराव मिळाला. भुर्रुक् भुर्रुक् असा आवाज ऐकूं येऊं लागला. भातशेतींत खसखसहि चांगली स्पष्ट ऐकूं येऊं लागली. माझ्या खुणेसरशीं गोपाळनें लाईट पेटवला. त्या मिट्ट काळोखांत एकदम वीज चमकल्यासारखें लखलखलें. पिवळसर ठेंगणी भातशेती लख्ख उजळून निघाली......

गोपाळ माझ्या मनाप्रमाणें चोख रीतीनें प्रकाशझोत टाकीत होता. बॅटरीचा फोकस सुरेख लागला होता. त्या झगझगीत प्रकाशांत माझी नजर तीक्ष्णतेनें फिरत होती...मध्येंच एके ठिकाणीं दोन लालबुंद डोळे चमकले; गोपाळची बॅटरी क्षणभर त्या जागीं स्थिरावली...पण मी त्याच्या कानांत कुजबुजलों—" चल पुढें; तें खोकड आहे....बेडक्या खायला आलें आहे—"

पांच-सहा भाताचे कोपरे आम्ही ओलांडले; नि गोपाळनें एके ठिकाणीं बॅटरी रोखली. मी खांद्यावरून नळी हातांत घेतली....पांच-सहा रानडुकरें मजेंत चरत होतीं. त्यांत दोन नग चांगलेच मोठे होते. त्या ठिकाणचें भात फार उंच नव्हतें. ( हळवीं भातें कधींच उंच वाढत नाहींत— ) त्या जनावरांच्या पाठीपासून वरचा भाग आम्हांला स्पष्ट दिसत होता. कान उभारून, माना खालीं घालून नि शेपट्या थुड्डक थुड्डक हलवीत तो कळप खुशाल चरत होता.

प्रकाशझोत अंगावर पडतांच क्षणभर ती डुकरें चांगलींच बावरलीं· त्यांतील तो थोरला डुक्कर मात्र ताठ उभा राहून आमच्याकडे रोखून पाहूं लागला. बॅटरीच्या झोतांत त्याचे पिचपिचीत बारीक डोळे, उंदराच्या डोळ्यांसारखे चमकत होते...क्षणार्धहि न गमावतां मी बंदूक उचलली आणि नेम धरला. लाईटवर नजर दिपल्यामुळें तो किंचित् आडवा वळतांच मी कट्कट् घोडा ओढला, नि त्याचें मस्तक धरून शिस्तींत चाप ओढला—

त्या गांवठी बंदुकीचा आवाज तोफेसारखा चौफेर घुमला. बंदुकीच्या धुरानें आम्हांला डोळ्यासमोरचें कांहींच दिसेनासें झालें. पण जनावरें ताड्ताड् उड्या मारीत नाहींशीं झालीं एवढें आम्हांला कळलें....जिथें गोळी झाडली त्या जागीं कांहीं दिसत नव्हतें! त्या ठिकाणाहून बॅटरी बाजूला न करतां गोपाळ पुटपुटला—"फुकट गेलासा वाटतो आवाज—"

"शहाणा आहेस तूं. नीट शिस्त धरून मी मारलें आहे....आवाज चुकणार नाहीं. खात्री आहे माझी...जरा आजूबाजूला शोधूं या—"

आम्ही पुढें जाऊन पाहिले. बॅटरीच्या उजेडांत रक्ताचें शिपणें झालेलें आम्हांला आढळलें! माझी गोळी चुकली नव्हती...आतां प्रश्न एवढाच होता कीं, हा जखमी रानडुक्कर आतां कुठें म्हणून गावणार? बरें, सकाळ-पर्यंत थांबावें तर हा प्राणी रातोरात किती अंतर तोडून जाईल नि कुठें पडेल, त्याचा कांहीं नेम सांगतां येत नव्हता!

बंदुकींत दुसरा बार भरून आम्ही बॅटरी अंधुक होईपर्यंत शोध केला. पण कांहीं माग लागेना. मध्यरात्रीनंतर आम्ही नाइलाज होऊन परतलों. रघु आणि शिवराम शाळेबाहेर आमची वाट पहात ताटकळत बसले होते. त्यांच्याकडच्या विड्याहि संपल्या होत्या...

घरीं येऊन झोपलों तेव्हां पहिला कोंबडा आरवला होता. चार घटका नीज मिळाली तर ती घेऊन झुंजुमुंजु होतांच पुन्हां बाहेर पडायला हवें होतें. ही मारलेली शिकार मोफत घालवून चालणार नव्हतें...सकाळ होतांच माझे दोस्त पुन्हां आले. रात्रीं मी डुक्कर जखमी केला आहे, ही बातमी तोंपर्यंत वाडींत पसरली होती...आणखी आठदहा मंडळी आमच्या मदतीला आली....आम्ही पुन्हां बाहेर पडलों. म्हातारे चुलते अनुभवी शिकारी होते. त्यांनीं पुन्हां पुन्हां सांगितलें—"जखमी रानडुकरावर एकटा

चालून जाऊं नकोस. जखमी वाघ परवडेल—पण डुकरासारख्या अडाणी पशूशीं गांठ पडणें वाईट...संभाळून अस...."

दहा वाजून गेले तरी आम्हांला जनावराचा माग लागेना. रक्तावरून आम्ही तीन एक फर्लांग माग नीट काढला....पण पुढें जमेना...मला भलतीच हळहळ लागून राहिली.

एवढ्यांत बाबल्या धनगर धांपा टाकीत मला शोधीत आला. त्यानें आणलेल्या बातमीवरून असें समजलें कीं एका जखमी जनावरानें सकाळीं उजाडतांनाच त्याच्या चरायला बाहेर पडलेल्या शेरडांत घुसून गोंधळ माजविला होता. बाबल्याच्या अंदाजाप्रमाणें डुक्कर चांदवडाच्या घळींत मुरून बसला असावा—

आम्ही सगळ्यांनीं तिकडे धांव घेतली. चारहि बाजूंना झाडांवर उंच जागीं टेहेळे इसम ठेवले. पावसाळ्यामुळें चांदवडाच्या घळींत भयंकर झाडोरा माजला होता. तरीहि आंत शिरणें आवश्यकच होतें. दगडधोंड्यांनीं झाडी हलवून त्या डुकराला बाहेर काढणें महाबिकट होतें.

मी धनगरालाच घेऊन आंत शिरलों. धनगर गडी भलत्या घट्ट काळजाचा निघाला. त्यानें मला नेमक्या जागीं नेलें. दिंड्याच्या असकडांत तो कर्दनकाळ पशु एखाद्या खडकासारखा जमिनीला भिडून राहिला होता! लांबून इथें जनावर आहे हें सुद्धां समजलें नसतें. आमची जाग लागतांच तो त्वेषानें व्हॉक् हॉक् करीत धडपडून उठला, नि आपले सुळे परजीत आमच्या रोखानें धांवून आला. मी बंदूक खवाट्याला लावीपर्यंत तो जवळ जवळ माझ्या अंगाशींच भिडला होता....माझ्या डोळ्यांसमोर असंख्य काजवे चमकले. आतां आपला कोथळा खात्रीनें बाहेर पडतो असें मला वाटलें, नि मी जिवाच्या आकांतानें मागें सरलों...हातांतला धारदार कोयता परजीत धनगर ओरडला—" बघतां काय, ठोका हरामखोराला—

आतां हें धूड माझ्या अंगावर आदळणार असें मनांत म्हणत मी क्षणभर डोळे मिटले....बंदूक मात्र पवित्र्यांत धरली होती...पण कांहींच घडलें नाहीं! क्षणापूर्वीं क्रोधानें मुसंडी घेणारा तो पशु चार पावलें पुढें यायच्या आंतच धाडकन् कोलमडून पडला; नि मगरीच्या जबड्याप्रमाणें

आपला जबडा पसरून तिथल्या तिथेंच कुचंबत धडपडूं लागला !......हा त्याचा अवसानघात अगदीं अनपेक्षित होता.

मी ताबडतोब ओळखलें---रात्रीच्या माझ्या आवाजानें तो डुक्कर जबरदस्त जखमी झालेला असावा आणि आतां तो बिल्कूल गलितगात्र झाला असावा. आतां मी सहज त्याला गोळी घालूं शकलों असतों. मी नीट पाहिलें, त्याच्या मानेवरचे राठ केंस सरसरून उभे राहिले होते.

मी निवांतपणें नेम धरला नि अगदीं जवळून त्याच्यावर गोळी झाडली...एकवार चिखलांत गडबडा लोळत त्यानें आक्रोश केला आणि मग तो थंड झाला....!

पांच मिनिटांपूर्वींची त्याची ती मुसंडी जर प्रभावी ठरती तर हें वर्णन सांगण्यासाठीं हयात राहिलों नसतों ! त्याक्षणीं मला काडतुशी बंदुकीची उपयुक्तता पुरी पटली—आणि दुसऱ्या दिवशीं मी कलेक्टरकडे बंदूक बदलून मिळावी म्हणून अर्जी ठोकली....

◎ ◎ ◎

# २ : एका शिकंदर काडतुसाची गोष्ट

प्रसंग मोठा बांका होता.

माझ्या खांद्यावर उत्तम इंग्लिश बनावटीची ब्रीचलोड बंदूक होती. मीहि कांहीं नवखा शिकारी नव्हतों. माझ्या नेमबाजीला कित्येक उत्तमोत्तम जनावरें बळी पडलीं होतीं. माझ्या भागांत माझा चांगला शिकारी म्हणून लौकिक होता...पण आजचा वखत माझी कसोटी पाहणारा होता. आणि हा प्रसंग मूर्खासारखा मी माझ्यावर ओढवून घेतला होता.

माझ्याजवळ फक्त एक पांच बुलेट्सचें काडतूस शिल्लक होतें आणि मला दोन मजबूत बिबट्यांना तोंड द्यायचें होतें. त्यांना चुकविणें मला शक्य नव्हतें. किंबहुना मीच तें पत्करलें नसतें आणि पुरेशा काडतुसांअभावीं केवळ मी हतबल झालों होतों.

माझ्याकडे नेहमीं काडतुसें शिलकीं असायचीं. तालुक्याहून आणलेल्या परमिटावरच्या कोट्यांपैकीं दहापांच गोळ्या शिल्लक असल्या म्हणजे मी दुसरें परमिट आणवून घेत असे. त्यामुळें माझ्याजवळ बंदूक आहे पण गोळी नाहीं, असा प्रसंग कधींच आला नव्हता. या खेपेलाहि खरं म्हणजे जरूर तेवढी सामग्री मी वेळींच आणून ठेवायला हवी होती...पण शेतीच्या व्यापांत मीं इतका गुंतलों होतों कीं, महिनाभर बंदुकीला हातसुद्धां लावायला मला सवड मिळाली नव्हती.

कालच शेतीच्या धांदलींतून तात्पुरता मोकळा झालों होतों. खूप दिवसांत रानजनावराची सागुती जिभेला लागली नव्हती म्हणून आज

सकाळींच उठून मी नळी बाहेर काढली. ऑइलिंग केलें, नि बरेच दिवस शिळीं होऊन पडलेलीं काडतुसें तापविण्यासाठीं जरा उन्हांत टाकावीं म्हणून कपाटांतील पट्टा बाहेर काढला. बघतों तर सहा नंबरचीं दोन छर्‍यांचीं काडतुसें नि पांच बुलेट्सचें एक एल्. जी. तेवढें शिल्लक होतें! म्हणजे मला मोठ्या जनावराच्या पारधीसाठीं गडी बोलावण्याची आवश्यकता नव्हती. सहा नंबरच्या काडतुसानें मी जास्तींत जास्त पाणकोंबड्या नाहीं तर एखादद्दुसरा मिळाला तर ससा तेवढा ठोकूं शकलों असतों...

माझ्या गड्यानें—शिवरामनें—मला विचारलें, " एका एल्. जी. काडतुसानें तुम्ही रानांत जाऊन करणार काय? माझ्याजवळ परमिट नि पैसे द्या, मी तालुक्याहून दारूसामान घेऊन येतों—मग धरूं या पारध."

त्याचें म्हणणें बरोबर होतें.

पण मी त्याचें ऐकलें नाहीं. कारण माझ्याजवळ जेवढे रुपये शिल्लक होते ते सर्व मला शेतीच्या कामासाठीं—गडी—मजुरांसाठीं खर्च करावे लागणार होते...नि एक दारूगोळ्याचें परमिट आणायचें म्हणजे चाळीस-पन्नास रुपये सहज लागणार होते. काडतुसें महागलीं होतीं. तूर्त मला एवढी रक्कम शिकारीखातर बाजूला काढणें शक्य नव्हतें. मी म्हटलें, " जाऊं दे थोडे दिवस, मग आणूं परमिट!...."

शिवरामनें माझी अडचण ओळखली असावी. तो आपला अधिक न बोलतां कामावर निघून गेला.

मी तीं तीन काडतुसें खिशांत टाकलीं नि न्याहारी करून निघालों. अकरा वाजून गेले होते. दुपारीं दोनएक वाजेपर्यंत मी रात्रीच्या कालवणा-पुरतें कांहींतरी घेऊन येऊं शकेन या खात्रीनें मी बाहेर पडलों होतों....

माझ्याजवळ मोठ्या शिकारीची सामग्री नाहीं या जाणिवेनें मी लांबलचक कुठें फिरत राहिलों नाहीं. सहज नदीच्या बारीनें पाणथळींतून पाण-कोंबड्यांच्या अंदाजानें मी फिरत होतों. सुमारें दोन तास हिंडल्यावर माझ्याकडचीं दोनहि छर्‍यांचीं काडतुसें मला वापरतां आलीं. दोन कोंबड्या मी लागोपाठ मारल्या. मग थोडका दमून जाऊन मी नदीकांठावरील एका खडकावर ऐनाच्या सावलींत थोडा वेळ विश्रांति घेतली. बंदूक खडकाला

टेकवून उभी केली नि कोंबड्यांच्या रक्तानें माखलेले हात नदींत स्वच्छ धुतले. पोटभर पाणी प्यालों.

आतांपर्यंत मी एवढा फिरलों पण कुठेंहि मला ससाचा माग लागला नव्हता. सरीसरीनें मी बारकाईनें पाहात होतों. कुठेंहि मला चुन्याच्या रंगाचा त्याचा मूत्रोत्सर्ग किंवा लेंड्या आढळल्या नव्हत्या. आज या दोन पक्ष्यांच्या मांसावरच भागवावें लागणार असें मनाशीं म्हणत मी उठलों नि पुन्हां नदीकांठ तुडवूं लागलों.

मृगयेचा हा छंदच मोठा दिवाणा आहे. त्याखातर बाहेर पडलेल्या इसमाला वेळकाळाचें कांहीं भान रहात नाहीं...आतां जवळजवळ दोन वाजून गेले होते. मी जेवायला परत येणार या कल्पनेनें घरीं माणसें वाट बघत बसलीं होतीं. मी खुळ्यासारखा रानांत वणवणत होतों. माझ्या-जवळ एक एल्. जी. काडतूस तेवढें उरलें होतें. पांखरें मारण्यासाठीं त्याचा उपयोग होणार नव्हता. मी ज्या नदीकांठानें हिंडत होतों त्या भागांत कांहीं मोठी शिकार आढळण्याची शक्यता नव्हती. खरें म्हणजे मी आतां मिळाला तेवढा ऐवज काखोटीला मारून घरीं परतणें योग्य होतें...

पण अचानक माझ्या डोकींत एक वेगळाच विचार आला. मी वर पाहिलें. सूर्य चांगलाच रणरणत होता. मार्च महिन्याचे दिवस होते. नदीच्या कोंडींत या वेळीं कदाचित् मरळ जातीचे मोठे मासे सांपडण्याची शक्यता होती. या पेटत्या उन्हांत, आटत आलेल्या नदीच्या डोहांतील खबदाडींत गारव्याला विसांवणारे हे प्रचंड मासे हवेसाठीं पाण्याच्या पृष्ठ-भागावर येतात. त्यांच्यावर टेहळ ठेवून बसले तर एखादे दिवशीं चांगली दोनचार देखील काळीभोर मरळें बंदुकीच्या तावडींत सांपडतात. मी विचार केला. अद्याप एक एल्. जी. काडतूस शिल्लक आहे; दिसलाच एखादा मरळ मासा तर नक्कीच हाणतां येईल....

मारलेल्या दोन्ही कोंबड्यांचीं पिसें मी भराभर पिसडून टाकलीं, दोन्ही तंगड्या पेंचून त्यांच्या पोटांतील घाण काढून टाकली, नि चांदवडाच्या पानांत त्यांचीं शरीरें नीट बांधून पिशवींत टाकलीं. आतां संध्याकाळपर्यंत कोंबड्या नासल्या नसत्या.

मी बंदुकींत काडतूस भरलें. पुन्हां एकदां डोहाला तोंड लावून पोटभर पाणी प्यालों; नि दरड चढून येऊन डोहाच्या कांठानें टेहळणी करीत चालूं लागलों. कांठाशीं उथळ उथळ होत आलेल्या त्या काळ्याशार डोहावर मी नजर खिळवून सावधगिरीनें चाललों होतों. एवढ्यांत एकाएकीं मला अंदेशा आला. एका ठिकाणाहून भलेमोठे बुडबुडे संथपणें वर येत होते. मी थबकून पाहिलें; नि माझी खात्री पटली. हमखास त्या ठिकाणीं मरळ मासा होता...

दरडीच्या कांठावर, डोहाच्या पृष्ठभागाशीं किमान अंतर ठेवतां येईल अशा बेतानें मी नीट मुडपून बसलों. हलकेंच जाग लागूं न देतां डोकीची सनहॅट, अंगांतील कपडे बाजूला काढले नि त्या तळपत्या उन्हांत बंदूकीची नळी खालीं करून एका चड्डीनिशीं उकिडवा बसून राहिलों. बंदुकींतून गोळी सुटतांक्षणींच मला डोहांत उडी ठोकून जखमी झालेल्या माशाला विळखा घालणें भाग होतें. नाहींतर मार खाल्लेला मासा तिरीमिरीसरशीं डोहांत दूरवर धांवत जातो नि कुठेंतरी मरून पडतो. तो उलटा होऊन वर येईपर्यंत मग शिकाऱ्याला डोहाच्या कांठाकांठानें हिंडत वाट पाहावी लागते. यासाठीं मी माशाच्या शिकारीला जायचें असलें म्हणजे एखादा चांगला पोहणारा गडी बरोबर घेत असें. म्हणजे मग मला स्वतःला विशेष यातायात करावी लागत नसे; पण आजची गोष्टच वेगळी होती. सगळें कांहीं माझें मलाच करायला हवें होतें.

ज्या ठिकाणीं मी दृष्टि खिळवली होती त्या ठिकाणीं एक सोडून अनेक मरळ मासे असले पाहिजेत असें मला वाटूं लागलें. तिथल्या पाण्याची विशिष्ट हालचाल, तिथून उमटणारे लहानमोठे बुडबुडे यांनीं माझी खात्री पटवली....आणखी दोनचार काडतुसें असतीं तर आज किती बहार झाली असती असें सारखें वाटूं लागलें; पण तरीहि हरकत नव्हती. एखादा पुष्ट मासा जरी मला गवसता तरी माझे श्रम सार्थकी लागले असते. माझ्याजवळ एक ज्याच्यांत पांच गोळ्या ठेंचून भरल्या आहेत असें विलायती कंपनीचें उत्तमपैकीं काडतूस शिल्लक होतें. माशांच्या ऐन हंगामाची वेळ मला साधली होती, नि माझ्या नेमबाजीवर माझा विश्वास होता. किमान एक मला भरगच्च मरळ मासा ही माझी आजची कमाई निश्चित होती.

मी नजर लावून नळी रोखून बसलों होतों. आडोशाला एक निगडीची जाळी होती. मला पाण्याचा पृष्ठभाग नीट दिसत होता. पाण्यांतील माशांना मात्र माझी चाहूल मुळींच लागली नसती अशी मोक्याची ती जागा होती.

सुमारें पंधरा मिनिटें अशींच गेलीं. बुडबुडे उमटत होते. पाणी हालत होतें. मधूनमधून नेहमींचे खवळे, खरचे, मळवे या जातीचे लहान मासे पाण्याच्या पृष्ठभागावर आपल्या रुपेरी पंखांची चमकदार हालचाल करीत फिरत होते. मी पापणी न चळवितां पहात होतों. वरचेवर बंदुकीचा चाप हाताळीत होतों. आतां मला घाई झाली होती. कधीं एकदां समोर भक्ष्य येतें नि कधीं चाप दाबतों असें मला झालें होतें. तीन प्रहर कलंडून गेले होते. पोटांत भूक वाढत होती. एकदां इथली कामगिरी आटोपली कीं मी थेट घरचा रस्ता सुधारणार होतों. रात्रीं या रुचकर मासळीच्या कालवणावर नि तळलेल्या तुकड्यांवर यथेच्छ हात मारून मी मुडद्यासारखा झोपणार होतों. सकाळपासून अतिशय वणवण झाली होती.

मग एकाएकीं बुडबुड्यांचा आकार वाढत गेला. त्यानंतर मिनिटभर तसेंच गेलें नि मग एका माशाचें तोंड हलके हलके तळाकडून पृष्ठभागाकडे सरकत असलेलें मला दिसूं लागलें. तो जसजसा वर येत होता, तसतसा बुडबुड्यांचा आकार वाढत होता. त्यांची गति वाढत होती. मी नीट पहात होतों. घोड्याच्या नालीच्या आकाराच्या, भल्या मोठ्या तोंडाची वरचेवर उघडझांप करीत तो मासा जवळजवळ पृष्ठभागाला येऊन भिडला. त्याचें सारें शरीर उभेंच्या उभें ( परपेंड्युक्युलर ) पाण्यांत दडलें होतें. त्यामुळें तो नेमका किती मोठा असावा याची नीट कल्पना येत नव्हती; पण त्याच्या जबड्यावरून माझी खात्री पटली कीं, हा मासा चांगला जांघेएवढ्या जाडीचा नि साडेतीन-चार फूट लांबीचा असला पाहिजे.

आतां मला वेळ गमावून भागणार नव्हतें. डोहाच्या पृष्ठभागावर येऊन संथपणें हवा खात असलेल्या त्या माशाच्या मस्तकाचा वेध घेऊन मी चाप दाबायला हवा होता. मी बंदूक खवाट्याला लावली; नि नेम धरला; निमिषार्धांत माझी कामगिरी होणार होती. पण दुर्दैव माझें. माझ्या टप्प्यांत असलेला तो मासा तेवढ्यांत अचानक थोडासा डाव्या बाजूला

वळला. चांगलें यार्डभर अंतर तो डावीकडे वळला नि पुनश्च बुडबुडे सोडीत तरंगू लागला. मी पुन्हां त्याचा वेध घेण्याचा प्रयत्न केला; पण तो नेमका अशा ठिकाणीं जाऊन थांबला होता कीं, मला त्याच्यावर अंदाजानेंच गोळी घालणें भाग होतें; कारण त्या ठिकाणीं पाण्यावर सूर्याचीं किरणें इतक्या चकचकीतपणें परावर्तित झालीं होतीं कीं, माझे डोळे चांगलेच दिपूं लागले होते. मी पुन्हां पुन्हां नेम धरीत होतों, आणि पुन्हां पुन्हां नळी खालीं उतरीत होतों. दुसरें एखादें जनावर असतें तर मी इतका वेळ मुळींच दवडला नसता. तसा माझा अंदाज कमकुवत नव्हता; पण या ठिकाणची गोष्ट वेगळी होती. येथें अंदाजावर विसंबून भागण्याजोगें नव्हतें. ही पाण्यांतील शिकार होती. गोळी अचूक लागेल याची खात्री पटल्याशिवाय चापावरील बोट मला ओढतां येत नव्हतें. पाण्यांत बंदुकीची गोळी एक विशिष्ट वक्र गति घेऊन फिरते. शिवाय पाण्यांत गोळीचा वेगहि खूपच कमी होतो. पाण्याच्या अगदीं पृष्ठभागावरच तेवढी गोळी अचूक मारा देऊं शकते. जितका मासा खोल तेवढा मारा कमकुवत. या साऱ्या गोष्टींचा विचार करतां मला घाई करणें नडलें असतें. त्यामुळें त्या आरशासारख्या लखलखीत पाण्यावर, मला मासा पूर्वीसारखा स्पष्ट दिसत नसल्यामुळें, नेम धरणें अवघड जात होतें. अंदाजानें गोळी घालून शिकार हुकवण्यास माझ्या मनाची तयारी नव्हती. मी क्षणभर थांबायचें ठरविलें. कदाचित् तो मासा पुनश्च थोडी जागा सोडून इकडेतिकडे वळला असतां, मला नीट दिसूं शकला असतां, माझ्या गोळीचा खात्रीशीर उपयोग झाला असता.

कांहीं क्षण कमालीच्या अस्वस्थतेंत गेले. माझी नजर त्या चकाकणाऱ्या पाण्यावर सारखी खिळल्यामुळें मेल्यासारखी झाली. नीट कांहींच दिसेना. मी डोळ्यांची उघडझांप केली नि नजर सांवरण्याचा प्रयत्न केला... पण व्यर्थ. अखेरीस अधिक वेळ न घालवतां बुडबुड्यांच्या अंदाजानें वेध घ्यायचें मी ठरवलें. काय होईल तें होवो, असें म्हणून मी मजुरा धरला....

....एवढ्यांत माझ्यासमोरच पाण्यांत एखादा दगड कुणींतरी वेगानें फेंकावा असा आवाज झाला. शांततेचा विलक्षण भंग झाला. मी दचकून पाहिलें. क्षणभर कांहींच समजेना, नि मग तोंडांत एक तडफडता छोटा मासा घेऊन एक सुरेख मुठीएवढा निळा खंड्या पक्षी पाण्यांतून बाहेर

पडला नि दूर उडाला !...साऱ्या रंगाचा बेरंग झाला होता. माझी शिकार हुकली होती. इतका वेळ पृष्ठभागावर मजेंत हवा खाणारा तो मरळ मासा त्या अनपेक्षित विक्षेपानें घाबरून पुन्हां तळाशीं अदृश्य झाला होता. बुडबुडे थांबले होते. माशाची इवलीसुद्धां हालचाल कुठें दिसत नव्हती. मी भडकलों. त्या चिमुरड्या अपशकुनी पांखराचा मला इतका राग आला कीं, मी करकरा माझे दांत चावले ! माझी मोठी पंचाईत झाली. हातातोंडाशीं आलेली उत्तम शिकार बोल बोल म्हणतां नाहींशी झाली होती. मग मी स्वतःवरच चिडलों. समोर मासा चांगला 'मला मार, मला मार' म्हणत उभा राहिला होता त्या वेळीं त्याला मारलें नाहींस—आतां कशाला हळहळतोस, असें माझें मन मलाच खाऊं लागलें. इतकी विलक्षण चीड मला कित्येक दिवसांत आली नव्हती.

आतां तिथें थांबावेसे मला वाटेना. मी दिवस पाहिला. चार वाजून नक्कीच गेले होते. आतां हळूंहळूं रानांत थंड वारे वाहूं लागले असते. दिवस जसजसा मावळायला येईल तसतसा नदीचा डोह थंड पडत जातो. अशा वेळीं मासा पृष्ठभागावर येण्याचीहि शक्यता मला वाटत नव्हती. आजचा दिवसच खराब उजाडला असें म्हणत मी उठलों. बसून बसून पायांना रग लागली होती.

बंदूक मोडून मी काडतूस बाहेर काढलें, नि खिशांत टाकण्यापूर्वीं त्याच्याकडे एकवार पाहिलें. जणूं मला म्हणायचें होतें—'बोल, किती दिवस तूं असाच कुजत राहणार आहेस ?'—

निराश चेहऱ्यानें आणि दमलेल्या पावलांनीं मी दरड चढून वर येऊं लागलों. बंदूक खांद्यावर आडवी घेतली नि दोन्ही हात तिच्याभोंवतीं टाकून कष्टानें मी एकेक पाऊल चढण चढत होतों. अद्याप घर दोनअडीच मैल दूर होतें. मला विलक्षण भूक लागली होती.

हा एवढा चढाव चढून गेल्यावर एक बारीकसें रान लागणार होतें. त्याच्यापलीकडे मात्र सारा उजाड माळ. घरहि मग तिथून फार लांब नाहीं.

दोन्ही बाजूंना रान असलेल्या छोट्या पाऊलवाटेनें मी चालत होतों. हें रान गांवदरीपासून नजीक पडत असल्यामुळें यांत कधीं जनावरांचा रहिवास नसे. चुकार ससे नि क्वचित् एखादी भेकर अधूनमधून इथें आढळे. मी

संथपणें इकडे-तिकडे न बघतां वाट चालत होतों. माझी अनवाणी पावलें मात्र सावधगिरीनें पडत होतीं. त्यांचा आवाज मुळींसुद्धां होत नव्हता. शिकारी जीवनाला सुरुवात केल्यापासून ही सावधगिरी माझ्या अंगीं आपसूकच बाणली होती. आवश्यकता असो वा नसो, माझ्या पावलांचा आवाज सहसा व्हायचा नाहीं.

आतां मी रानाच्या मध्यभागीं आलों होतों. मी चालत होतों त्याच्या उजव्या अंगाला एक चिंचोळी घळ होती. तिच्यांत गंधारीची दाट झाडकळ माजली होती. त्या झाडकळींतून एकाएकीं मला सातभाई पक्ष्यांचा कवकवाट ऐकूं आला. सातभाईचा चीत्कार वाढला होता. सारें चिडीचीप असलेलें तें रान त्या आवाजानें एकदम गजबजून गेलें.

विचारांच्या तंद्रींत असलेला मी एकदम जागा झालों नि थांबून पाहूं लागलों. कांहींच समजून येईना. त्या गंधारीच्या जाळीचें मी पुन्हां निरीक्षण चालविलें. ही कांटेरी वनस्पती रानडुकरांना निवासासाठीं फार प्रिय असते हें मला ठाऊक होतें. कदाचित् एखादा रानडुकरांचा मेळा रात्रीं आळसानें इथेंच राहिला असावा, नि आतां दिवस बुडत चालला तरी त्यांची चाळवाचाळव झाली असावी, असा मी तर्क करूं लागलों; पण खात्री नव्हती. रानांत अचानकपणें मला पाहूनसुद्धां सातभाईचा थवा घाबरला असेल. कांहीं असो; पांखरें घाबरलीं होतीं, त्याअर्थीं कांहीं तरी वेगळा प्रकार असला पाहिजे.

गंधारीच्या असकडांत कसलीतरी खसबस वाढली होती. अशा परिस्थितींत प्रकार काय आहे तें जाणून घेतल्याशिवाय घराच्या दिशेनें पुढें जाणें मला कबूल नव्हतें. मी कितीहि दमलेला असलों तरी माझ्या खांद्यावर बंदूक होती नि एकच का असेना, पण माझ्या खिशांत काडतूस शिल्लक होतें.

थोडा वेळ सावधपणानें वाट पाहूनहि कांहींच अंदाज येईना तेव्हां मी एक शहाणपणाची गोष्ट केली. घळींत जाऊन उतरणें शक्यच नव्हतें; इतकें रान त्या ठिकाणीं माजलें होतें. त्यामुळें मी पायाजवळचे दोन मोठे धोंडे उचलले नि पाटोपाठ त्या झाडींत भिरकावून दिले. दोनचार मिनिटें खसबस मुळींच झाली नाहीं नि मग घळीच्या पलीकडील चढावाच्या पायथ्याच्या बाजूनें हळूच एका लांबोड्या बिबट्यानें आपलें शरीर झाडीबाहेर काढलें !

सायंकाळचीं उतरतीं सूर्यकिरणें त्या जागीं स्वच्छ पसरलीं होतीं. नि त्यांत तें जवान जनावर ऐटीनें मस्तक पुढें काढून जांभई देत होतें. त्याची पाठ माझ्या बाजूला होती. नि त्याला माझी चाहूल सहजासहजीं मुळींच लागली नसती, इतका झाडोरा मध्यें होता. मी उंच जागीं होतों, तो सखल जागीं होता. तो आपल्याच नादांत जांभयांमागून जांभया देत होता. पुढच्या पायानें अधूनमधून मुस्कुर साफ करीत होता.

अनपेक्षितपणें तेथें तो बिबटा निघतांच मी किंचित् हादरलों. नकळत माझा हात माझ्या खिशांत गेला. या वेळीं पृथ्वीमोलाची ती एकच वस्तु जवळ होती. मी चटकन् हळूंच खालीं बसलों. बंदूक मुळींच आवाज होऊं न देतां लोड केली नि उठून पाहूं लागलों.

माझा गेलेला सगळा उत्साह जणूं परत आला. फक्त प्रश्न एवढाच होता कीं, माझ्याजवळील त्या एकुलत्या एका काडतुसांतच या अदमासें पुरुषभर लांबीच्या दिसणाऱ्या वाघाला, अधिक धडपड करूं न देतां, जागच्या जागींच कसा निजवायचा.

बहुधा नुकत्याच झोंपून उठलेल्या त्या बिबट्याचा आळस देण्याचा कार्यक्रम यथास्थित चालू होता. हा बिबटा खूप देखणा दिसत होता. त्याची खाण्यापिण्याची बहुधा कधीं आबाळ झालेली नसावी, इतका तो पुष्ट दिसत होता. त्याची कांतिहि एखाद्या कात टाकलेल्या सर्पासारखी तेजस्वी दिसत होती. मधूनच तो आपलें डोकें दोन्ही पंजांच्यामध्यें धरून जमिनीवर घाशी, जिभेनें पंजे चाटी आणि शेपटीची गंमतीदार वळवळ करी. एखाद्या लाडावलेल्या बोक्याप्रमाणें चाललेली त्याची क्रीडा पहाण्यांत थोडका काळ मी अगदीं गुंगून गेलों. वाटलें, याला अशी चोरून गोळी घालण्यापेक्षां डिंवचावा. तो कसा काय रागावतो तेंहि जरा पाहून घ्यावें. आणि या विचाराच्या मी इतका अधीन झालों कीं, पुन्हां एक छोटासा दगड घेऊन मी त्याच्या दिशेनें भिरकावला ! बंदूक अर्थात्‌च अगदीं तयार होती.

मी फेंकलेला दगड कांहीं त्याच्या अंगावर बसला नाहीं, पण आडव्या येणाऱ्या झाडपाल्याचा आवाज करीत तो त्याच्या जरा पुढ्यांतच टपली खाऊन पडला; नि त्यासरशीं तो गडी दचकून मागें पाहूं लागला. त्याचें तोंड धुणें थांबलें. किंचित् विस्मयानें त्यानें माझ्या बाजूला मान वळवली,

आणि त्याची माझी नजरानजर झाली. मी त्याला आपण होऊन माझ्याकडे पहायला लावण्याचा उद्योग केला होता.

मी बंदूक उचलली नि निमिषार्धहि न गमावतां त्याच्या छातीचा नेम धरला. माझ्या अंदाजाप्रमाणें त्याचें काळीजच मी धरलें होतें. आतां त्याची सुटका नव्हती....

पण माझा तो बिलंदर मित्र माझ्याहिपेक्षां अधिक चपळ निघाला. मी चाप ओढला नाहीं हेंच नशीब, नाहींतर गोळी फुकट भुईलाच लागली असती ! डोळ्याचें पातेंहि लवण्याच्या आंत पठ्यानें धोका ओळखून मागच्या मागें उडी ठोकली !...

संपलें. पुन्हा मघांचीच आवृत्ति. आतां चूक माझी नव्हती, पण वेळच खराब मिळाली होती. मी किंचित्काल विचार केला. जवळपासचें रान पाहिलें. हा वाघ अधिक दूर कुठें जाऊं शकणार नाहीं अशी माझी खात्री पटली. तो पुन्हां त्या घळींतच मुरला होता, नि तिथेंच लपून बसणार होता. त्याला लांब जाण्याइतकें जंगल सोईस्कर नव्हतें.

पण आतां दिवस मावळल्यासारखा वाटत होता. उजेड झपाट्यानें कमी होत होता. या वाघानें आतां मला पाहिलें होतें. तेव्हां तो सहजासहजीं बाहेर पडणार नाहीं हें खरें होतें नि या प्रकरणाचा सोक्षमोक्ष लावल्याशिवाय आतां इथून हालायचें नाहीं, हा माझा निश्चयहि तितकाच खरा होता.

कोंकणांत आढळणारी ही बिबट्या वाघाची जात जेवढी घातकी, फसवी आणि कोपिष्ट असते तेवढी मला वाटते वाघाच्या जातींत दुसरी कुठली नसावी. हें जनावर देशावरच्या वाघांच्या मानानें एखाद्याला दुर्बल वाटावें, इतकें लहानसर दिसतें. पण मोठ्या ढाण्या वाघापेक्षांहि हा बिबटा डांबीस असतो. बंदुकीच्या गोळीसारखा त्याच्या झेपेचा वेग असतो, नि हडकुळा दिसणारा हा वाघ एखादा जवान पाडा मारून फरफटत अर्धा-पाऊण मैल सहज घेऊन जाऊं शकतो; अशी त्याला विलक्षण ताकद असते. तो एखादें कुत्रें जेवढ्या चलाखीनें पळवतो तेवढ्याच चलाखीनें कळपांतलें मेंढरूं डोळ्यादेखत उठवतो !....

त्याचा खुनशीपणा मी बरोबर जाणत असल्यामुळें मला आतां तिथें जमिनीवर बेसावध अवस्थेंत उभें राहणें सोयीचें वाटत नव्हतें. न जाणों,

माझ्या पायालगतच्या जाळींतूनच तो प्रगट व्हायचा नि माझे मानेवर बसायचा !...

जवळच एक कुंभ्याचें चांगलें गांठाळ आणि मजबूत झाड होतें. दीड-एक पुरुष उंचीवर आरामांत बसतां येईल अशी एक जागाहि होती. मी लगेच त्याचा आश्रय घेतला. मात्र झाडावर चढण्यापूर्वीं मी सोबतच्या पिशवींत जवळपासचे बरेचसे दगड जमवून घेतले, आणि वर जातांच मी समोरच्या झाडींत एकेक दगड साऱ्या बाजूंनीं फेंकूं लागलों. हेतु हा कीं, तो लपलेला बिबट्या कुठूनहि पुन्हां बाहेर पडावा.

माझी नजर चारीहि दिशांना फिरत होती. कुठेंहि खुसबुसलें तरी मी तें टिपीत होतों. पण खुद्द माझ्या मुळाशीं मात्र काय चाललें आहे, याचा मला पत्ता नव्हता ! पायाखालीं एकाएकीं कसला तरी आवाज आला म्हणून मी खालीं वांकून पाहिलें...आणि मला आश्चर्याचा धक्काच बसला ! पंधरा मिनिटांपूर्वीं समोरच्या घळींत दडलेला तो बहाद्दर बिबटा माझी मुलाखत घ्यायला माझ्या पायाशीं हजर होता ! तो कुठून आणि कसा आला हे माझ्या ध्यानांत येण्यापूर्वींच त्यानें वर उडी घेण्याचा प्रयत्न केला. मी त्याला पाहिलें, हें त्यानेंहि ओळखलें होतें—आणि माझ्या आधींच तो संधि साधूं पहात होता.

मी जेथें बसलों होतों ती जागा तशी कांहीं वाईट नव्हती. त्या कुंभ्याच्या झाडावरून मी आजुबाजूच्या कुठल्याहि दिशेला लीलेनें गोळी झाडूं शकलों असतों. पण माझ्या बुंध्याशींच खालीं वांकून बंदूक वापरावी लागेल याची पुसटशीदेखील कल्पना त्या घाईच्या वेळीं मला शिवली नाहीं. त्यामुळें माझा शत्रु असा अंगाशीं येऊन भिडतांच माझी मोठी तारांबळ उडाली. बंदुकीचें तोंड खालीं वळवून मी वेध घेण्याचा आटोकाट प्रयत्न करूं लागलों. पण मला हवी तशी मोक्याची जागा सांपडत नव्हती. पोकळ जागीं मला गोळी घालायची नव्हती. एक घाव दोन तुकडे हा माझा निश्चय होता. हातीं असलेल्या केवळ एकाच काडतुसांत मी तोच एक निर्णय घेऊं शकत होतों. वेळेचें गांभीर्य किंवा महत्त्व मला कळत नव्हतें असें नाहीं. पण माझा नाईलाज होता...मी उलटा सुलटा होत होतों. झाडाच्या बुंध्याशीं झटत असलेल्या नि कावेबाजपणानें स्वतःचा बचाव करीत माझ्या

जिवावर उठलेल्या त्या वाघाला नेस्तनाबूत करण्यासाठीं मी माझी शिकस्त करीत होतों. असा प्रसंग जन्मांत कधीं माझेवर आला नव्हता...

अकस्मात् माझ्या मनांत एक विचार आला नि माझ्या खांद्याची दगडांनीं भरलेली पिशवी मी डाव्या हातांत घेतली. बंदूक खाकेला अडकवून मी उजव्या हातानें जमेल तसा त्या दगडांचा जोरदार मारा झाडाला बिलगलेल्या त्या बिबळ्यावर करूं लागलों. एखादा दगड चुके तर एखादा त्याला लागे. या माझ्या युक्तीनें तो थोडासा बावरल्यारखा झाला नि वर येण्याचा प्रयत्न थांबवून तिथल्या तिथेंच खोडाला लिपटून तो माझे दगड चुकवूं लागला. आणि मग कंटाळून कीं काय कुणास ठाऊक, त्यानें पाय लांबवून धाड्दिशीं खालीं जमिनीवर उडी ठोकली....मला तेंच हवें होतें.

तो तसा खालीं उतरतांच माझ्या हातांतील दगडांची पिशवी माझ्या नकळतच खालीं गळून पडली नि मी त्वरेनें बंदूक खवाट्याला जोडली. आतां कुठली तरी एकच गोष्ट निश्चित होती. एक तर त्याचें माझ्या हातून मरण किंवा आपल्या एकाच झेपेंत त्यानें घेतलेला माझ्या नरडीचा घोट...

आणि हाय रे कर्मा ! जवळच उभा असलेला दुसरा आणखी एक बिबट्या वाघ माझ्या नजरेला पडला ! पहिल्या वाघानें झाड सोडून खालीं कां उडी घेतली त्याचा क्षणांत मला उलगडा झाला. बहुधा तें दुसरें जनावर त्याची मादी असावें. चाललेला सारा प्रकार स्वस्थपणें न्याहाळीत तें ताठ उभें होतें. माझी छाती आतां मात्र धडधडूं लागली. हें कंत्राट आतां आपल्याला निभणार नाहीं, असें एकाएकीं मला वाटूं लागलें. काय करूं नि काय नको अशा अवस्थेंत माझे ते क्षण जात होते. माझें काळीज लकलकत होतें. सारें अंग घामानें न्हाऊन निघालें होतें.

तो पहिला वाघ जणूं कोणत्याहि क्षणीं माझ्या दिशेनें झेंप घेण्याच्या पवित्र्यांत उभा होता. त्याची क्रुद्ध नजर अद्याप मला स्पष्ट आठवते ! नि त्याची ती नव्यानें आलेली मैत्रीण मात्र विस्मयानें बघत होती. ती यत्किंचित्हि चिडलेली दिसत नव्हती. काय होईल तें होवो असें मी मनांत म्हटलें. कुलदेवतेचें स्मरण केलें नि डाव्या हाताच्या विळख्यांत जी शेजारची डहाळी मीं इतका वेळ गच्च धरली होती, तिला अधिकच दृढतेनें पकडून मी सरळ नळी रोखली. माझी खात्री होती कीं, नळीचें तोंड आपल्या

दिशेनें वळलेलें पाहतांच तो बिबटा चिडून हमखास माझ्यावर उडी घेणार; आणि तसें झालेंच तर त्याची नि माझ्या गोळीची गांठ चुकूं नये या हेतूनें मी मुद्दामच त्याचें मस्तक सोडून किंचित् वर मानेचा वेध घेतला... आतां बेहत्तर त्या दोघांनींहि माझ्यावर हल्ला चढवला तरी. या मरण-प्रसंगांतून सुटकेचा तो एकच मार्ग होता. मी घाबरून स्वस्थ राहतों तरी ते पशु मुळींच निमूट बसले नसते......

—क्षणार्धांतच काड्दिशीं काडतूस फुटलें ! पेट झाला. त्याचा आवाज तोफेसारखा माझ्या कानांत घुमला. माझ्यावर हल्ला होणारच या समजुतीनें मी डोळे गच्च मिटले. नि क्षणभर कांहींच घडलें नाहीं त्यासरशीं गप्कन् पुन्हां उघडले...शाब्बास ! मी जिंकलों होतों. माझ्या अंदाजानें मला दगा दिला नव्हता. माझ्या काडतुसानें त्या बिबट्याला लोळवलें होतें. तिथल्या तिथें जमिनीवर तो तळमळत होता...ती त्याची जोडीदारीण घाबरून कुठें अदृश्य झाली होती देव जाणे !

मी सुटकेचा निःश्वास टाकला. कपाळावरचा घाम निपटून काढला नि खालीं धडपडणाऱ्या त्या जनावराकडे पाहिलें.

रक्ताच्या लोटांत अद्याप तो धडपडत होता. उलथापालथा होऊन लोळत होता. आत्यंतिक यातनांमुळें त्यानें एकदोन वेळां भेसूर चीत्कार केला. कातरवेळ होत आली होती. माझ्या अंगावर त्या चीत्कारासरशीं झरारून कांटा उठला. मला त्याची गंमत वाटली.

मी नीट पाहिलें. त्याची छाती नि कूस रक्तबंबाळ झाली होती. त्याचा उठण्याचा प्रयत्नहि निष्फळ होत होता. याचा अर्थ, त्याचा कणा निकामी झाला होता. काळीज तुटलें होतें, नि कोथळ्यालाहि गोळीनें फोडलें असावें. बहुधा माझ्या एकुलत्या एका काडसुतानें, आपल्या पोटांतील साऱ्या पांचहि गोळ्यांचा त्याच्यावर उपयोग केला होता. मी नेम धरण्यांत दाखवलेली हिकमत शंभर टक्के यशस्वी झाली होती. वर उडी घेतांच त्याच्या धडावर गोळ्यांचा भडिमार झाला होता.

त्या दिमाखदार पशूची अशी केविलवाणी अवस्था बघून मला खरोखर बरें वाटलें ! मी त्याच्यावर अपुऱ्या साधनांनींहि विजय मिळविला होता.

मला उन्माद चढल्यासारखा झाला होता. मी स्वस्थ चित्तानें झाडावरून खालीं उतरलों नि निर्भयपणें पुढें जाऊन बंदुकीच्या नळीनें त्या वाघाच्या मस्तकाला जरा ढोसलें, त्यासरशीं आटोपत आलेला तो बिबटा शेवटचा जोर करून धडपडला, उताणा होते होत तो माझ्या बाजूनें सरकूं लागला, आणि मी दूर आटोक्याच्या पलीकडे स्वस्थ उभा असलेला पहातांच त्यानें दाण्दिशीं आपला पंजा त्वेषानें मातींत आपटला. नंतर त्यानें नाइलाजानें जवळच्या एका तोडलेल्या झाडाच्या खुंटाला कडकडून ढांस मारली. जबडा पूर्ण उघडून त्यानें त्या सुकलेल्या कठीण लांकडांत आपले तीक्ष्ण सुळे गच्च रुतवले. तोंडानें गुदमरल्यासारखा विचित्र आवाज केला आणि इकडचा तिकडे होतां होतांच तो ताठ झाला. त्याची लालभडक पातळ जीभ मातींत लडबडली होती.

डोळे उघडे ठेवूनच त्यानें प्राण सोडला होता. कांहीं वेळापूर्वीं त्यानें मला ज्या जळजळीत नजरेनें आव्हान दिलें होतें, ती त्याची पेटती नजर कणाकणानें विझत चालली होती !

माझ्या पायाजवळ पडलेली काडतुसाची रिकामी केस मी उचलून धरली नि कपाळाला लावली !

अत्यंत श्रांत होऊन मी घरीं परतलों. त्यानंतर दोन घटकांच्या आंतच माझे गांवकरी पेट्रोमॅक्सच्या उजेडांत तें साडेसहा फूट लांबीचें धूड वाशाला उलटें बांधून घेऊन आले !

आज माझ्या घरीं पांच भोंकें पडलेलें एक रंगदार बिबट्याचें कातडें तुम्हांला आढळेलच. पण त्यापेक्षांहि एक अधिक मोलाची वस्तु मी कपाटांत जपून ठेवून दिली आहे. माझ्या शिकारी आयुष्यांत अजरामर झालेल्या त्या प्रसंगाची सदोदित आठवण करून देणारी, एका शिकंदर काडतुसाची ती रिकामी केस आहे ! मला ती लाख मोलाची आहे.

◎ ◎ ◎

# ३ : गड आला पण सिंह गेला

माझी कुत्री एखाद्या वाईट रोगाला बळी पडून मेली असती तर मला इतकें वाईट वाटलें नसतें. पण माझ्यासारख्या शिकारी माणसानें शिकारीच्याच कामासाठीं पाळलेलें तें मर्द आणि हुषार जनावर एका वाघानें माझ्या नजरेसमोर गारद करावें, याची मला विलक्षण खंत वाटली. माझ्या बंदुकीकडे मी आव्हानाच्या नजरेनें पाहिलें आणि म्हटलें, " फुकट तुझी करामत !... तुझ्यापेक्षा माझी गुणी कुत्री मला अधिक प्यार होती, तिच्या बळावर मी आजपर्यंत इतक्या पारधी मारल्या. तुला याची कांहीं इशीम असेल तर त्या वाघाच्या शरिरांत आरपार तुझी गोळी घुसली पाहिजे...आपल्या या जिवलग मैत्रिणीच्या अशा मरणाचा तूं पुरा सूड घेतला पाहिजेस—"

तुमचा जर पेशा शिकाऱ्याचा असेल आणि जर एखादें तल्लख बेरकी कुत्रें तुम्हांला जोपासतां आलें असेल, तर माझ्या मतें त्याच्याएवढी चांगली गोष्ट दुसरी नाहीं. अशा कुत्र्याच्या जिवावर विसंबून तुम्ही वाटेल तेवढी मर्दुमकी गाजवूं शकाल. हां; एक गोष्ट मात्र लक्षांत ठेवायला हवी. त्या कुत्र्याला शिकार खेळतांना झालेली प्रत्येक जखम ही स्वतःच्या शरिराला झालेलीच जखम आहे, या समजुतीनें तुम्हीं तिला औषधपाणी केलें पाहिजे. प्रसंगीं ती जखम स्वतःच्या जिभेनें चाटण्याची तुमच्या मनाची तयारी असली पाहिजे...इतकें खुळें प्रेम जर तुमचें तुम्हीं पाळलेल्या कुत्र्यावर असेल, तर बेलाशक तुम्हीं तुमचा जीव त्या प्राण्याच्या ताब्यांत द्या... वेळीं तुमची आवडती बंदूक तुम्हांला वांचवणार नाहीं—पण हें कुत्रें तुमच्या प्राणांचें संरक्षण करील.

मी पाळलेल्या कुत्रीवर माझें असें जिवापाड प्रेम होतें; त्यामुळेंच तिच्या मरणानें मला अतिशय दुःख झालें होतें.

चार वर्षांपूर्वी मी राधानगरीच्या जंगलांत वैदू लोकांबरोबर शिकारीला गेलों होतों. हे वैदू लोक मोठे शूर, हिकमती आणि शिकारीच्या कामाला लायक असतात. तुम्हीं वाघ मारलांत, तर त्याची चरबी आम्हांला काढून घेऊं द्या, अशी गळ ते तुम्हांला घालतील...हरिण, भेकर मारलेंत तर त्यांच्या मांसासाठीं ते तुमच्या मनधरण्या करतील—फार काय एखादें जिवादें किंवा साळींदर दिसलें तरी तें ठोका, असा ते आग्रह धरतील. त्यांच्या दृष्टीनें कुठल्याहि प्राण्याचें मांस निरुपयोगी नाहीं ! हे लोक शिकारीच्या वेळीं काळीज फुटेपर्यंत धांवतील, जनावराचा अचूक माग काढतील, तुम्हांला हमखास शिकार आढळवून देतील...मात्र हें सारें त्यांच्याजवळ असलेल्या कुत्र्यांच्या तांड्याच्या बळावर. त्यांच्याकडे नाना जातीचीं शिकारी कुत्रीं असतात आणि माणसांपेक्षां ते त्या जनावरांना अधिक जपतात.

राधानगरीच्या त्या शिकारीच्या वेळीं परशराम वैदूनें मला तें कुत्रीचें पिल्लूं दिलें. तो म्हणाला होता—"साहेब, तुम्हीं या पिल्लास जपा. जातिवंत अवलाद आहे ही—" मलाहि एका चांगल्या कुत्र्याची आवश्यकता होतीच. मोटारींत घालून मीं त्या काळ्याभोर रंगाच्या किडकिडीत पिल्लाला घरीं आणलें. परशरामनें दिलेल्या सूचनांबरहुकूम त्याला आहार देऊं लागलों—त्याला इतर उनाड कुत्र्यांचा संपर्क लागूं नये म्हणून जपू लागलों. अवघ्या सहा महिन्यांच्या त्या पिल्लाला मी रानची हवा दाखवली आणि तें अस्सल रक्ताचें पोर रानांत शिरतांच जन्मजात शिकारी वृत्तीनें वागूं लागलें ! जाळीजाळींतून बेदरकारपणें घुसूं लागलें. सशांचा आणि भेकऱ्यांचा माग बिनचूक काढूं लागलें !

शिकारीच्या कामांत मला मोठा आधार मिळाला. ही कुत्री इतकी हुशार आणि समजूतदार निघाली कीं, विचारतां सोय नाहीं....रानडुकराच्या पारधीसाठीं रानांत शिरलें म्हणजे करवंदीच्या आणि गांधारीच्या जाळींत घुसून तीं जनावरें बरोबर हुसकून बाहेर काढी. मी ज्या ठिकाणीं बंदूक घेऊन असेन, त्या ठिकाणीं त्या जनावराच्या मागेंपुढें धावून निरनिराळ्या युक्त्या योजून त्याला घेऊन येई, आणि मी बंदूक उचलून नेम धरला

म्हणजे पुढें कोणता धोका आहे हें चलाखपणें ओळखून चटकन् जनावरापासून दूर होई ! मला निर्विघ्नपणें गोळी घालतां येई...पुन्हां, जखमी झालेले जनावर शिकाऱ्याच्या अंगावर चिडून कधीं कधीं चाल करण्याची शक्यता असते, अशा वेळीं ही माझी कुत्री मला त्या प्रसंगांतून सलामतपणें सोडवीत असे. माझ्या बंदुकीचा आवाज झाला कीं ताबडतोब पुन्हां ती त्या जखमी जनावराच्या अंगचटी झटे नि तें चिडलेलें जनावर माझ्या अंगावर येण्याऐवजीं त्या कुत्रीच्याच नादांत राही—पुन्हां मला शिस्त धरून गोळी झाडून त्या जनावराचा अंत करणें सोपें होई—

अशी ही गुणी कुत्री रात्रीं, इमानदारीनें माझ्या घराची रखवाली करीत असतांना वाघाच्या तावडींत सांपडली होती. माझी बंदूक ओटीवरल्या खुंटीवरच राहिली होती नि पदरीं असलेलीं दरोबस्त काडतुसेंहि कपाटांत ठेवल्या जागींच शाबूत राहिलीं होतीं. त्यांपैकीं एकाचाहि मला रात्रीं माझ्या कुत्रीच्या बचावासाठीं उपयोग झाला नव्हता !—

गेले कित्येक महिने आमच्या गांवांत वाघाची चाहूल नव्हती. कोंकण प्रांतीं या माघ महिन्यांत खरें म्हणजे जंगल मोकळें झालेलें असतें. कुळ-वाड्यांनीं शेतीच्या राबासाठीं कवळकाठी तोडून उभें रान उजाड भणभणीत केलेलें असतें. अशा दिवसांत वाघाला दडायला चांगली जागा मिळत नसल्यामुळें तो सहसा जवळपास रहात नाहीं. मृगाच्या सुरुवातीला रान पालवीनें भरलें म्हणजे दूरपास गेलेलीं वाघरें पुन्हां गांवाच्या जवळ येतात. एखादटुसरें मेंढरूं मारतात. क्वचित् कुठें कुणाचा बेसावध पाडा मिळाल्यास हाणतात....नि मग वाडीवाडींतले बरकंदाज गडी सावध होतात, आपापल्या बंदुकांना तेलपाणी करूं लागतात.

अशी परिस्थिति असल्यामुळें मीहि हल्लीं थोडासा आळशी झालों होतों. शिवाय गांवांतील देवाची नवसाची पारध आम्हीं नुकतीच धरली होती. चार दिवस रानांत काढलें होते. कुठें वाघाचा मागमूसहि आम्हांला आढळला नव्हता. मग गोठ्यांत बांधलेल्या वासरांवर रात्रीं झडप घालायला वाघ येईल, ही शंका माझ्या मनांत कां म्हणून यावी ?...मी निर्धास्तपणें झोंपत होतों. माझ्या इमानी कुत्रीवर घराचें नि गोठ्याचें संरक्षण करण्याची

जबाबदारी टाकून, मी उशाखालीं हात ठेवून सावचितपणें झोंपत होतों. बंदुकीपेक्षां मी कुत्रीवर अधिक विश्वासून होतों.

आमच्या बाजूला कोंकणांत उन्हाळ्याच्या दिवसांत गुरेंवासरें गोठ्यांत बांधीत नाहींत. गोठ्याबाहेर उघड्यावर झाडपाल्याचें छप्पर ( कावण ) उभारून त्यांत जनावरें बांधायचीं. हेतु हा कीं, उन्हाळी सहा महिने गोचीड-पिसवांचा उपद्रव गोठ्यांत होऊं नये. रीतीप्रमाणें माझींहि जनावरें मी कावणांत बांधलीं होतीं.

रात्रीं खूप उशीरां मला अचानक जाग आली. बाहेर कुत्रीं मोठमोठ्यानें भुंकत होती. गुरगुरून गुरगुरून तावातावानें भुंकत होती. मी सावध झालों. कुत्रीच्या ओरडण्यांत त्वेष होता. राग होता. चार वर्षांच्या अनुभवानें मी तिच्या भुंकण्याच्या तऱ्हा नीट ओळखीत होतों. एखादें धोकेबाज जनावर असलें म्हणजेच ती अशी रागीटपणें भुंकत भुंकत धांवत असे. बंद केलेल्या दरवाजापासून तों बाहेरील बेड्यापर्यंत ती भुंकत धांवत भुंकत जात होती नि पुन्हां जोरानें मागें येऊन दरवाजावर पायांनीं खराखरा ओरखाडीत होती. जणूं तिला मला म्हणायचें होतें—" ऊठ, झोंपला आहेस काय ? वाघ दाराशीं येऊन ठेपला आहे—ऊठ ! "

तिचें असें भुंकणें बहुधा बराच वेळ चाललें असावें. मी जागा होतांच उशाची बॅटरी चांचपली. तिच्या प्रकाशांत खुंटीवरची बंदूक उतरून घेतली नि काडतुसांसाठीं कपाट खोलणार तेवढ्यांत बाहेरून कुत्रीचा गोंगाट एकाएकीं वाढलेला ऐकूं आला नि पाठोपाठ क्षणभरानें एखादें बकरें खाटकानें सुरी मानेवर ठेवतांच जसें ओरडतें, तसें माझ्या कुत्रीचें दीनवाणें ओरडणें फक्त एकदांच ऐकूं आलें....आणि मग एकदम सारें शांत झालें. इतकें शांत कीं, जणूं कांहीं घडलेंच नव्हतें !...

बंदूक सांवरीत मी त्वरेनें दरवाजा उघडून बाहेर आलों नि बॅटरीचा प्रकाशझोत अवख्या परड्यांत फिरवला. कावणांत, केळीच्या परसांत—गडग्यापलीकडे पांदींत सगळीकडे मी प्रकाश फेंकला—पण कांहीं उमगेना. मीं तत्क्षणींच ओळखलें; कुत्रीला वाघटानें पळवलें !—पण अद्याप आशेला जागा होती. त्वरेनें पाठलाग केला असता तर जवळपास कुठेंतरी प्रकाशाच्या झोतांत वाघ आढळलाहि असतां. त्याला कदाचित् ठोकतां

नसतें आलें, तरी निदान कुत्रीतरी त्याच्या तोंडून सोडवतां आली असती. उगीच कुठें दोनचार दांत लागते तर हळदचुना भरूनहि काम भागलें असतें...वेळ गमावून उपयोग नव्हता....मी पांदींतून वर आलों तों थेट माझ्या गड्याच्या–शिवरामाच्या–घरीं. त्याची बायको बाळंतीण व्हायची होती म्हणून तो हल्लीं झोंपायला घरीं जात असे. शिवरामला घाईघाईनें उठवून आम्ही दोघेहि बॅटरीच्या प्रकाशांत हिंडहिंड हिंडलों...पण कुठें माग आढळेना ! कुठल्या मार्गानं वाघ गेला असावा, हें लक्षांत येईना. सोन्यासारखी कुत्री मला मुकली, हें समजून येऊन मला विलक्षण उदास वाटूं लागलें. तासभर हिंडून आम्ही परतलों. तोंपर्यंत घरचीं सारीं माणसें जागीं होऊन आमची वाट बघत ओटीवर येऊन बसलीं होतीं. धाकट्या भावानें व्याकुळ आवाजांत विचारलें–" काय झालें ?–"

" कुत्री गेली–"

साऱ्यांचे चेहरे उतरले.

माझ्या आईचा या कुत्रीवर भारी जीव होता. ती नुसतेंच म्हणाली– " दारची लक्षुमी गेली–"

रात्रीं कुत्रीला ज्या परळांत भात वाढला होता, तो मातीचा परळ पडवींत तसाच पडला होता. त्यांत भात उरला होता...जवळच्या पाण्याच्या वाडग्यांतील पाणीहि संपलेलें दिसत नव्हतें. सगळीजणें तें पाहून कळवळलीं.

दिवस उजाडेपर्यंत मग घरचीं सारीं माणसें जागींच होतीं. कुत्रीचें नाना गुण आठवीत...तिच्या इमानदारीच्या गोष्टी...तिचा राग...नि तिचें असें अकस्मात् बळी पडणें...

मी मात्र अंथरूणावर पडल्या पडल्या एकच विचार करीत होतों. या बदमाश वाघाला कसा ठोकायचा–कसा लोळवायचा...

दुसऱ्या दिवशीं सकाळीं आम्ही पांच-सहा असामी बाहेर पडलों. कुत्रीला रात्रीं वाघानें पळवलें ही गोष्ट आवाठांतल्या साऱ्यांनाच लागून राहिली होती. प्रत्येक जण मनापासून रान काढीत होता. अर्थात् या वेळीं कांहीं वाघाचा तलास लावणें ही आमचेसमोर कामगिरी नव्हती. तर कुत्रीला वाघानें कुठें फाडून खाल्ले, त्या जागेचा तपास करायचा होता. कुत्रीच्या

मृत शरिराचा माग लागला असता म्हणजे मग पुढील काम सोपें होतें....

आणि रानवडीच्या खालच्या बाजूला असलेल्या कोरड्या ओढ्यांतून चालत असलेल्या भद्या महारानें तोंडासमोर पोकळ मूठ धरून खुणेचा कुकारा घातला " उऽऽहूऽऽहू "

त्याला कांहींतरी आढळलें होतें. आम्ही सारे जण त्याच्या दिशेनें धांवलों. पाहतों तर भद्या महारानें नेमका माग काढला होता. ओढ्याच्या पात्रांतील वाळूंत माझ्या कुत्रीचा विद्रूप मृतदेह पडला होता. वाघानें तिला तोंडांत धरून बहुधा लोळवीत आणल्यामुळें तिच्या अंगावर फरफटल्याच्या खुणा दिसत होत्या. आम्ही नीट पाहिलें. तिच्या नरड्याला तेवढे वाघाचे दांत लागलेले दिसत होते; नि मानगूट पुढच्या दोन पायांत घुसेल इतकी मुडपली होती. वाघानें तिला मानेला धरून लोंबवीत आणलें याचा तो परिणाम होता. एरवीं तिच्या सबंध शरिराला कुठेंहि ढका लागला नव्हता. रात्रीं बॅटरीनें आम्ही केलेल्या पाठलागाची चाहूल लागूनच बहुधा वाघानें ती कुत्री तशीच टाकून पळ काढला असावा.

नुसतें रक्त पिऊन गेलेला तो वाघ पुन्हां आजच्या रात्रीं कुत्रीच्या मांसावर ताव मारायला येणार ही गोष्ट स्वच्छ होती. पण तोंपर्यंत कुत्रीच्या या शरिराची रखवाली करणें आवश्यक होतें. मारलेल्या शिकारीची जरा जरी हालवाहालव झाली तरी वाघाला तें ताबडतोब समजतें. तो लगेच संशय धरतो. निर्वेधपणें तो शिकारीला तोंड लावीत नाहीं. आणि वाघच असा सावध राहिला तर त्याच्या पाळतीवर राहणाऱ्या बरकंदाजांला तें त्रासदायक होतें. या ओढ्यांतील खबदाडींत नेहमीं कोल्हीं नि खोकडें लपलेलीं असतात; नि दिवसाकांठीं ओढ्यांतील खेकडे नाहींतर बेडक्या खायला तीं ओढ्यांत वावरत असतात. त्यांना या मेलेल्या कुत्रीचा वास लागला तर बघायला नको होतें. मीं भद्या महाराला म्हटलें, " भदोजी, रात्रीं हा पठ्या गवसणार आपल्याला ! पण या मढ्याची राखण केली पाहिजे. तूं पलीकडल्या डगरीवर संध्याकाळपर्यंत बसून रहा; कोल्हीं, गिधाडें आलीं तर हांकल. दुपारीं तुला धरून भाकऱ्या पाठवून देतों."

भद्या महारानें माझी सांगी ऐकली; नि आम्हीं सारें घरीं परतलों. शिवरामनें विचारलें—" माचाण बांधायला हवें ना दुपारीं ?—"

" नको; पलीकडे एक काजूचे झाड बघून ठेवलें आहे मीं—त्याच्यावरून सुरेख काम साधेल. तूं बॅटरींतले सेल्स तेवढे बदलून ठेव—नवे घाल."

दुपारीं दोन एक वाजतां मीं पुन्हां एकदां ओढ्यावर चक्कर टाकली. घरापासून फार तर तीन फर्लांग जायला हवें होते. दुरून पाहिलें. कुत्रीवर माशा घोंघावत होत्या. पलीकडे चांदवडाच्या सावलींत भग्या महार बांबूची टोपली वळत बसला होता. सारा परिसर निवांत होता.

संध्याकाळीं तालुक्याहून आलेल्या देवी डॉक्टरांशीं जरा गांवाच्या हवापाण्याविषयीं बोलत होतों. तेवढ्यांत भग्या महार धांवत धांवत येऊन पुढ्यांत दाखल झाला. तो इतका उरींपोटीं दौडला होता कीं, प्रथम कांहीं सांगायचें सोडून तो फक्त धांपा टाकीत उभाच राहिला! मी त्याला हडसून खडसून विचारलें तशी तो बोलूं लागला—" भाऊनूं–वाघ येऊन हजीर झाला आहे! मी जरा खालल्या बाजूला झाड्याला गेलों होतों–नि परत यायला लागलों तंवर वाऱ्याबरोबर घाण परमाळली? म्हणतांना लांबूनच बघितलं–हा एवढा हळदीच्या अंगाचा वाघ कुत्रं फाडतो आहे! मी मागल्या मागं पळालों तो वळसा घेऊन थेट इथं आलों–चला चला,–बेगीन, ठोका भडव्याला–"

मीं क्षणार्धहि न गमावतां बंदूक घेतली, काडतूस भरलें नि पट्टा खांद्याला अडकवीत बाहेर पडलों. देवी डॉक्टर बापडा बघतच राहिला!–

जातां जातां मीं भग्या महाराला सूचना दिली–" तुम्ही सारे गडी जमा नि हत्यारें घेऊन व्हाळाला वेढा द्या. फार नजीक येऊं नका–"

वाघ अपेक्षेपेक्षां लवकर आला होता; कारण दिवस बुडायला अद्याप कितीतरी अवधि होता.

मीं सातआठ मिनिटांतच व्हाळाच्याजवळ येऊन पोंचलों. कुठल्या बाजूनें नेमकें पुढें व्हावें हें लक्षांत येईना. रात्रीं ज्या झाडावर बसायचें मीं ठरविलें होतें, त्याच्या अगदीं उलट बाजूनें मी आलों होतों. एक गोष्ट मात्र तेथें माझ्या फायद्याची होती; ती ही कीं, वाघ खालीं ओढ्यांत होता नि मी वर दरडीवर होतों. मला वाघ दुरून दिसणें शक्य होतें. मीं बंदूक सांवरीत खालीं बसलों नि उक्षीच्या जाळींतून वाट काढीत बसत बसत

ओढयाचा कांठ जवळ करूं लागलों. उक्षीचा झाडोरा माझ्यापेक्षां उंच होता. अगदीं ओढयाला भिडेपर्यंत वाघाला माझी चाहूल लागणार नाहीं, याची दक्षता घेणें मला जरूर होतें. मी डगरीच्या कडेला आलों. बंदूक शिस्तींत धरली नि डाव्या हातानें उक्षीच्या डहाळ्या हलकेंच दूर करत डोकें पुढें काढून खालीं ओढयांत नजर टाकली.

आणि तो माझा कर्दनकाळ वैरी माझ्या सरळ दृष्टिपथांत आला. चांगला ताठ वाघ दिसत होता तो. एखादें बारकें वाघूट नव्हतें. पिवळसर कबऱ्या रंगाचें सुरेख कातडें देवानें त्याला दिलें होतें. चारी पाय दुमडून तो स्वस्थ बसला होता नि आरामांत आपलें भक्ष्य खात होता. जवळ-जवळ सगळी कुत्री त्यानें खाऊन संपवली होती. नि आतां त्याची कुत्रीच्या डोक्याशीं खटपट चालली होती. आपल्या दोन्ही बळकट पंजांत तें विद्रूप डोकें धरून दातांनीं कडकडा फोडण्याचा त्याचा उद्योग चालला होता. तो त्या कार्यक्रमांत इतका रमला होता कीं, आजूबाजूच्या जगाचें भान जणूं तो तेवढ्यापुरतें विसरला होता. मला आश्चर्य वाटलें. वाघाची जात इतकी पाडक असते कीं, जरा कुठें खुट्ट झालें तरी तो शंकित होतो....समोरच्या झाडावर चार कावळे जमून सारखी कावकाव करीत होते...नि तरीदेखील हा पठ्या आपला कुत्रीचें डोकें फोडण्यांत मग्न झाला होता. त्याला ह्या गोंगाटाची मुळींसुद्धां पर्वा दिसत नव्हती. मीं मनांत म्हणालों– "गड्या, मला सांपडलास ! समोर तूं जिच्चीं हाडें रुचीनें फोडतो आहेस, त्या माझ्या गुणाच्या कुत्रीनें तुझ्या तोंडीं ज्या मरणयातना काल भोगल्या, त्याच यातनांची चव तूंहि थोडी आतां घेऊन बघ—"

वाघ आणि मीं यांत फार तर पंचवीस– चाळीस फुटांचेंच अंतर होतें. असेल...मी मनांत आणीन त्या ठिकाणीं त्याला गोळी लावूं शकत होतों....मीं त्याचें एवढ्या जवळून मस्तक फोडायचें ठरविलें...तोहि समोर माझ्या कुत्रीचें मस्तकच फोडीत होता.

दरम्यान माझ्या माणसांनीं चहूंबाजूंचें रान पकडलें असेल याची मला खात्री होती.

वाघ किलकिले डोळे करून मोठ्या खुषींत खात होता. त्याच्या शेपटीचीहि अधूनमधून वळवळ चालली होती...इतर गोष्टींकडे फालतू

लक्ष न पुरवितां मीं बंदूक गुडघ्यावर सांवरून धरली, नि शिस्तींत नेम धरला. हाडें फोडण्यांत एकदां किंचित् या बाजूला तर नंतर दुसऱ्या बाजूला असें त्याचें भलें मोठें डोकें सारखें हालत असल्यामुळें मला नेम धरणें थोडें कठीणच जात होतें...पण तरीहि मला खात्री होती. दोन्ही डोळ्यांच्या किंचित् वर मीं टार्जेट पॉइंट धरला...

नि काड्दिशीं काडतूस फुटलें !—

एका रुद्रभीषण आरोळीनें सारा आसमंत दुमदुमून गेला.

गोळी लागतांच त्या वाघानें बसल्या ठिकाणींच सुमारें पुरुषभर उंच उडी घेतली नि दाण्दिशी तो खालीं आदळला. मीं ताबडतोब वर उठलों नि चपळाईनें बंदूक पुन्हां लोड केली.

त्याच्या मस्तकाचा छेद जरी माझ्या गोळीनें घेतला असला, तरी तो मजबूत वाघ तेवढ्यानें बधला नाहीं. त्यानें चवताळून प्रचंड धडपड आरंभिली. आपला शत्रू नेमका कुठें आहे, तें त्याला समजत नव्हतें—पण जागच्या जागींच तो गरगर फिरत मनाला येईल त्या दिशेला झेंप घेत होता. पुन्हां पुन्हां रोंरावत होता—रक्तानें त्याचें थोबाड माखलें होतें नि त्याचें रौद्ररूप इतक्या जवळून अतिशय भीतिकारक वाटत होतें.

आणि त्यानंतर तो खरा जिवावरचा प्रसंग माझ्यावर चालून आला... ज्या दरडीच्या कडेवर उभा राहून मीं दुसरी गोळी झाडणार होतों, त्या दरडीचा माझ्या पायाखालील भाग कसा कुणाला ठाऊक, पण अचानक कोसळला नि मी काय होतें आहे हें कळण्यापूर्वींच खालीं ओढ्याच्या वाळूंत कोसळलों. या अनपेक्षित कोसळण्यानें मीहि फार गोंधळून गेलों. कांहीं नाहीं. तरी, सातआठ फुटांवरून मी बंदुकीसह खालीं आलों होतों नि आतां माझ्यांत नि त्या जखमी पशूंत जेमतेम तीन वावांचेंहि अंतर राहिलें नव्हतें ! मीं धाडकन् खालीं कोसळल्याचा आवाज त्यानें ओळखला नि सरळ तो चवताळलेला वाघ मुसंडी घेऊन माझ्यावर चालून आला ! माझ्या शरिरावरील केंसन् केंस सरसरून उभा राहिला. क्षणभर वाटलें, आतां मरण दूर नाहीं...पण दैवानें खैर केली. बंदूक हातांत घेऊन मागच्या मागेंच मीं धडपडत जिवाच्या आकांतानें जेवढें अंतर पळतां

येईल तेवढें पळण्याचा प्रयत्न केला नि माझ्या पायांनीं मला आणी-बाणीच्या वेळीं मुळींच दगा दिला नाहीं. ते मुळींच लटपटले नाहींत. वाघ आंधळेपणानें जिथल्या तिथेंच मला धुंडींत राहिला नि मीं माझ्याजवळ जेवढें धाडस होतें तेवढें एकवटून बंदूक खवाट्याला जोडली. वाघाच्या काळजाचा वेध घेतला नि चाप ओढला....

या आवाजाबरोबर मात्र तो वाघ आडवा झाला. त्याचें रोरावणें मंद झालें. ओढ्याच्या कोरड्या पात्रांतील रेतींत लोळतां लोळतांच त्यानें प्राण सोडला.

त्यानंतर मीं नजर वर करून त्या दरडीकडे पाहिलें. ती अशी कशी अकस्मात् कोसळली बरें?...बघतों तर काय...पावसाळ्यांत पुराच्या पाण्याच्या धडाक्यानें त्या दरडीच्या खालची माती वाहून जाऊन तिथें केवळ पोकळ डोलाराच शिल्लक राहिला होता. इतका वेळ त्या तकलादू जागेनें टिकाव धरला हेंच माझें नशीब...बघतां बघतां धाडकन् दुसरेंहि एक मोठे ढेकूळ माझ्या पुढ्यांत येऊन कोसळलें.

अंगांतील शर्ट काढून मीं घाम जरा पुसतों, तोंच भद्या महारानें दुरून कुकारा दिला "उऽऽहूऽऽहू—काय झालें गा?"

मीं त्याला कुकाऱ्यानेंच उत्तर दिलें..."काम फत्ते—" पांच मिनिटांतच सारे गडी येऊन दाखल झाले. त्यांत माझा धाकटा भाऊहि होता. त्यानें त्या मेलेल्या वाघाकडे क्षणभर पाहिलें नि तो रुद्ध स्वरांत म्हणाला, "दादा, तूं वाघ मारलास...पण आपली कुत्री गेली ती गेलीच! गड आला पण सिंह गेला—!"

मीं एक खोल सुस्कारा सोडला नि मनांत म्हणालों—"खरेंच, हा लहान मुलगा किती नेमकें बोलला! गड आला पण माझें सिंहासारखें जनावर गेलें—"

◎ ◎ ◎

राजे ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम
दिनांक
क्रमांक
वि. नि.
वाचनालय शाखा

# ४ : घायाळ

चैत्रांतली दुपार. उकाड्यानें जीव उबगला होता. थंड पाण्याच्या घागरींवर घागरी पाणी अंगावर ओतून घ्याव्या, नाहीं तर नदीच्या डोहांत जाऊन डुंबत रहावें असें वाटत होतें. पण यापैकीं कांहीं न करतां मीं अंगणांतल्या आंब्याच्या सांवलींत आरामखुर्चींत पडलों होतों नि भीमा धनगराची आतुरतेनें वाट पहात होतों. भीमानें सकाळींच गांवच्या देवळा-मागच्या राईत भेकऱ्यांचा—एका विशिष्ट जातीच्या हरणांचा—माग काढला होता. नि आतां चारी बाजूंनीं राईची नाकेबंदी करून तो मला सांगावयास येणार होता. मीं बंदूक भरून तयार ठेवली होती. सारा सरंजाम तयार होता. भीमा आला कीं मी बाहेर पडणार होतों. चेंडूगत टणाटण उडत पळणाऱ्या त्या अति चपळ गतीच्या हरणांवर निशाण धरून गोळ्या झाडायला मीं अगदीं आतुरलें होतों. खूप दिवसांनीं पळत्या जनावरांची शिकार करण्याची संधि आली होती; नि माझे हात सळसळत होते.

अखेरीस भीमा आला. त्याचे सोबत धनगरवाड्यांतली आणखी तीन चार उमेदवार मुलें होतीं. लंगोट्या लावलेलीं. भर उन्हांतून ल्हा ल्हा करीत शिकारीच्या आशेनें आलेलीं. एका चलाख पोरानें तर उंच भाला पण बरोबर घेतला होता....

त्यांच्याबरोबर राईच्या दिशेनें चालतां चालतां मीं विचारलें—

" भिम्या, लेका जनावरं आहेत ना खरींच ? कां आपली हूलच आहे ?–"

" न्हाई धनी; अक्षी ह्या नदरेनं खुद्द म्यां बघितलीं—"

" किती नग होतील ?—"

" तीनाचा येक कळप म्या राईंत घुसलेला पाह्यला नि मागून दोन कुरुंद आले म्हणत होता शिवनाक महार—"

" बरं; मग बंदोबस्त कसा ठेवलायस ?—"

" समदी राई चारी बाजूनीं कोंडून धरलीय...सकाळधरनं मानसं उभी राह्यल्यात् !—"

" पण माणसं नुस्तीं जमिनीवरच उभीं केलीं आहेस कीं—"

" तसं कसं जी ? मी काय शिकारींत नवा हाय व्हय ? तुमच्यासंगच त्तर इत्की वरसं काढलीं व्हय ? राईजवळच्या समद्या उंच झाडांवर टेहेळे ठेवले हाईत. जनावर कुठं गेलं तरी उमगल्याबिगर न्हानार न्हाई-"

भीमा धनगर शिकारीच्या कामांत खरंच मोठा तरबेज गडी होता. शिकार साधी ससाची असो किंवा पटाईत बिबल्या वाघाची असो; त्याची मला नेहमींच पक्की मदत होत असे. हांका उभारायला, टेहेळ्यांचे मोर्चे बांधायला नि जनावरांचा नेमका माग काढायला भीमा धनगर बेरकी इसम होता. त्याचे अंदाज अचूक असत नि पारधीच्या कामांत त्याचा उत्साहहि उदंड असे...आजहि असेंच झालें होतें. सकाळीं दहाच्या सुमारास त्यानें ही चुकार भेकरें गांवच्या राईंत शिरतांना पाहिलीं नि लगोलग त्यानें राईभोंवतीं माणसांचा भक्कम पहारा बसवला, टेहेळे नेमके नि जनावरें राईंत चांगलीं स्थिर झाल्यावर मला निरोप पाठवला.

" राईच्या कुठच्या अंगानें भेकरीं घुसलींत ?—"

" रामेश्वराच्या मागं खैराचं रान हाय् का...त्येच्या उजव्या अंगाला—"

" म्हणजे म्हाताऱ्या किंजळीवर टेहेळा ठेवला पाहिजे. तिथून पार डांबऱ्याच्या खरकलाटापर्यंत माग मिळेल—"

" आपला संभा जगदाळे हाय् त्या झाडावर. झालंच तर रोंग्या धनगर माळावरच्या नांदरुखीवर हाय्...पावशा आंब्यावर नारायेन दळवी हाय्-"

" म्हणजे ताठ बंदोबस्त केलायस...आतां जनावरं हुसकून अंगावर आणा म्हणजे बघूं—"

" तुमच्या नेमबाजीवर आमचा इस्वास हाय् धनी; आवाज मोफत जानार न्हाई—"

" बघूं आतां—"

अर्ध्या मैलाचें अंतर रखरखीत उन्हांतून तुडवून आम्हीं राईजवळ आलों. लांब-दूरच्या साऱ्या उंच उंच झाडांवर टेहेळे तयार होते. एक-मेकांना कुकारे घालीत टेहळणी करीत होते. राईच्या चोहोंबाजूंनीं माणसें लपून छपून उभीं होतीं. चवदार मांसाचीं चार अश्राप हरणें मारण्यासाठीं सारे सज्ज झाले होते. मीं बंदुकीनिशीं येऊन दाखल झालेला पहातांच जवळच्या सात्विणावरील टेहेळ्यानें हरळी दिली—" तात्या बामन नळी घेऊन आले हो ऽ ऽ सावध, सावध ऱ्हावा समद्यांनी—"

भेकरीं ज्या एका विशिष्ट सरीवरून बाहेर पडण्याचा अधिक संभव होता, त्या सरीच्या तोंडाशीं, राईच्या बाहेर एका उक्षीच्या जाळींत मीं अंग छपवून बसलों. नि भीमा धनगरास इशारत दिली. माझ्या इशारती-सरशीं रानकाढे ताबडतोब राईत घुसले नि ज्या ठिकाणीं जनावरें स्थिर झालीं होतीं त्या बाजूकडे राईच्या घनदाट झाडींतून टाळ्या वाजवीत चाल करून येऊं लागले.

मीं बसलों होतों ती जागा गोळीबारास अतिशय अनुकूल होती. वरच्या किंवा खालच्या दोन्ही बाजूंनीं मीं सहज बंदूक चालवूं शकत होतों. जनावरें जर अपेक्षित ठिकाणाहून बाहेर पडतीं—तर मीं लागोपाठ गोळ्या झाडून किमान एखाददुसरें हरीण खात्रीनें जायबंदी करूं शकलों असतों. माझ्या निशाणबाजीवर माझा जबरदस्त विश्वास होता. नि भेकऱ्याची उडी कशी टिपावी हें शास्त्र मला चांगलें अवगत होतें.

मीं सावधगिरीनें चाहूल घेऊं लागलों, समोरच्या गच्च राईतलें पांखरूंहि माझ्या नजरेस पडत नव्हतें. पण आंतील रानकाढ्यांची हालचाल कानीं येत होती. हरणांच्या अशा शिकारींत तोंडानें शब्द काढायचा नसतो. केवळ टाळी वाजवून जाग द्यायची. मागून येणाऱ्या टाळीसरशीं हरीण बिचकत बिचकत पुढें सरकतें नि आयतें बरकंदाजाच्या तावडींत सांपडतें.

घटकाभर वेळ असाच गेला नि माझ्या वरच्या बाजूनें सात्विणाच्या झाडावरील टेहेळ्यानें हलक्या आवाजांत ओरडून सांगितलें—" जनावरें चाळवलीं आहेत नि आतां केव्हांहि तीं बाहेर पडतील...सावध रहा—"

नि मग एकाएकीं समोरच्या झाडींत खसखस झाली नि एका पाठोपाठ तीन भेकरें ताड् ताड् उड्या मारीत बाहेर पडलीं...वरच्या सात्विणावरील टेहेळ्यानें पुढच्या टेहेळ्यास हरळी दिली. त्यानें त्या पुढच्यास हाकाटलें, नि राईतील रानकाळ्यांचा गलका एकाएकीं स्तब्ध झाला...दुपारच्या तळपत्या उन्हांत तीं तळपत्या अंगांचीं हरणें फुट्बॉलच्या वेगानें समोरून पळूं लागलीं. मी अतिशय चापल्यानें बंदूक जोखून त्यांच्या उड्यांचा वेध घेऊं लागलों—

सगळ्यांत पुढें पळणारा जो जवान आणि ठळक नग होता तो, शिंगांना फांटे फुटलेला कुरंग ( नर ) होता. तो एव्हांना माझ्या बंदुकीच्या रेंज़च्या पलीकडे गेला होता. पण मधलें हरीण मात्र मी नीट वेधूं शकलों. तें पळण्यांत किंचित् मंद होतें. त्याच्या तीन उड्या मी टार्जेट पॉइंटवर नीट जुस्तपणें पकडल्या नि चवथ्या उडीला, त्या हरणाचें मस्तक धरून मी चाप ओढला. पळत्या जनावराचे बंदुकीनें किरण टिपतांना साधारण-पणें मस्तकाचा वेध घेतला म्हणजे धडाला गोळी लागते....माझा बार झाला नि तें हरीण किंचित् लचकलें...पळतां पळतां त्यानें मुरड मारली नि त्याचा वेग मंदावला. मी ओळखलें. माझें निशाण अचूक लागलें आहे. पांचपन्नास यार्ड अंतर जिवाच्या आकांतानें काटून हें भेकर आतां खालीं कोसळलें...

माझें काडतूस फुटतांक्षणीं, राईतलीं रानकाढीं माणसें भराभर बाहेर आलीं—झाडावरील टेहेळ्यांत एकमेकांना इशारती देण्याची गडबड सुरू झाली. भीमा धनगर उत्सुकतेनें माझ्याजवळ येऊन विचारूं लागला—

“ लागलाय् न्हवं बार ?—”

“ बहुतेक लागलाय्...पण मोठा नर निसटलाय्...मादी तेवढी निशाणांत सांपडली असें वाटतें.”

“ हरकत न्हाई, चला व्हारं म्होरं—धांवा, धांवा—लई लांब जाऊं देतां नये त्याला—” भीमानें बरोबरीच्या माणसांना सूचना दिल्या नि ते सारेजण त्या जखमी हरिणाच्या मागून धांवूं लागले. मीहि बंदुकींत दुसरें काडतूस भरून त्यांच्या पाठोपाठ धांवूं लागलों.

एवढ्यांत एका टेहेळ्यानें ओरडून सांगितलें, तिन्हीं जनावरें मध्यें न थांबतां डांबऱ्याच्या रानांत घुसलीं आहेत....जखमी झाल्यागत वाटणारें

भेकरसुद्धां तिकडेच गेलें; मध्यें कोसळलें नाहीं. मार निसटता लागला असावा——

टेहेळ्याची ही खबर ऐकून मी चकित झालों. मी फार दुरून गोळी घातली हें खरें होतें...पण आवाज फुकट जाणार नाहीं याची खात्री होतांच मी चाप ओढला होता. माझ्या अंदाजाप्रमाणें जनावर जास्तींत जास्त म्हणजे एखादा फर्लांग जाऊन पडायलाच हवें होतें. पण हा टेहेळ्या ज्याअर्थीं असें सांगतो, त्याअर्थीं माझें कांहीं तरी चुकलें असावें. गोळी कारणीं न लागतां भलतीकडेच लागली असावी...न पेक्षां डांबऱ्याच्या रानाएवढें, म्हणजे सुमारें मैलभर अंतर तें हरीण काटूं शकतेंच ना. खरें म्हणजे आतां मी धांवपळ करायला हवी. तें जखमी हरीण असेल तेथें त्याचा माग काढून पुन्हां गोळी घालायला हवी...मी घामानें थबथबलेल्या अवस्थेंत धांवूं लागलों——

सगळे रानकाढे पुन्हां डांबऱ्याच्या रानाभोंवतीं जमले. कशी फळी धरायची हें भीमा धनगरानें पुन्हां साऱ्यांना समजावून सांगितलें. जनावरें नेमकीं कुठेंशीं मुरलीं आहेत हें टेहेळ्यांकडून विचारून घेतलें, नि पुन्हां सारा खटाटोप सुरू झाला. माणसें रानांत घुसलीं. रान काढूं लागलीं. पण जनावरें बाहेर पडेनात. तें छोटेसें रान दोनदां भांगलून काढलें तरी जनावरांचा पत्ता लागेना. सारेजण निराश झाले. आयती हातातोंडाशीं आलेली शिकार हुकली म्हणून सारे हळहळूं लागले....आणि सर्वांत माझी अवस्था मोठी विलक्षण झाली. सकाळपासून हीं सारीं माणसें शिकारीच्या आशेनें धडपडत होतीं; तीं माझ्या नेमबाजीवर विश्वासून...आतां जर यांना मी जनावर मारून देऊं शकलों नाहीं तर खरेंच मोठी नासुष्की होती....

ते सारे असामी जवळच्या झरीवर पाणी प्यायला गेले, तशी मी भीमाला म्हटलें——“ भीमा, आतां तूं नि मी दोघेचजण शिरूं या रानांत नि बघूं या कुठें माग लागतो का जनावरांचा...जखमी झालेलें हरीण कुठें तरी गारव्याला म्हणून पडतें नि तिथेंच हातपाय ताठ करतें——चल बघूं खटपट करून——”

भीमाला हा विचार पटला. आम्ही दोघेच जण हलकेच समोरच्या रानांत शिरलों नि इकडची तिकडची बारकाईनें चाहूल घेत फिरूं लागलों....

रानांत बराच दूरपर्यंत आम्हांला कांहीं माग लागेना. पण मध्येंच एके ठिकाणीं रक्ताचे ताजे थेंब एका झुडुपाच्या पानांना लागलेले भीमाच्या चलाख नज़रेनें पाहिले नि त्यानें मला खूण केली. जखमी हरीण तिथून जातांना लागलेलें तें रक्त होतें, हें मी लागलीच ओळखलें. आणि मग त्याच मार्गानें आम्ही पुढें जाऊं लागलों. भीमा धनगर माग काढण्यांत खरोखरच पटाईत इसम. त्याच्या बारीक नजरेनें, रक्त जसजसें सांडत गेलें होतें तसतसा बिनचूक माग काढला नि आम्ही थोड्याच वेळांत एका दाट झाडीच्या, वेली-झुडुपांनीं गच्च भरलेल्या ठिकाणीं येऊन पोंचलों. भीमानें माझ्या हाताला धरून ओढलें. तो हात लांब करून मला कांहींतरी दाखवीत होता...मी पाहिलें; तों काय आश्चर्य ? तिन्हीं भेकरें मानेंत मान घालून एका जाळींत निवांत उभीं होतीं. त्यांचें लक्ष आजूबाजूला कुठेंहि नव्हतें. आडोशाला राहून पण अतिशय जवळून आम्हीं त्यांना पहात होतों...पण त्यांना त्याची चाहूलहिं नव्हती—

त्या मादीच्या पुठ्याला गोळी लागली होती. तेथल्या मांसल भागांतून रक्त भळभळत होतें; नि तिचा तो उमदा प्रियकर आपल्या जिभेनें तिची जखम चाटीत होता; सुमारें दीडफूट उंचीच्या त्याच्या ऐटबाज शिंगांना एकच डौलदार फांटा फुटला होता, नि त्या पुष्ट आणि कांतिमान कुरंगाला तो कोंवळा शिंगाडा शोभिवंत दिसत होता. मोठमोठ्या पाणीदार डोळ्यांनीं आपल्या जोडीदारणीच्या दुःखाकडे बघत तो केविलवाणेपणानें तिची जखम चाटीत होता. नि त्याची ती लहानसर बांध्याची मादी स्वतःच्या काळ्याभोर डोळ्यांतून घळघळा आंसवें गाळीत होती. समोर खालीं मान घालून उभ्या असलेल्या पाडसाला वरचेवर ढुशा मारीत होती नि पुन्हां पुन्हां त्या कुरंगाच्या मस्तकाला आपलें गोजिरवाणें मस्तक भिडवीत होती. त्याला हुंगीत होती.... तिचें निरीक्षण करतांच माझ्या लक्षांत आलें कीं ही मादी गाभण आहे... तिचें पोट टुडुंबलें होतें. कास फुगलेली दिसत होती. तिच्या लवचिक शरीराला गर्भपूर्ण उदराचें ओझें पेलवत नव्हतेंसें वाटत होतें; नि त्यामुळें आणि पाठीला झालेल्या जखमेनें ती निरपराध हरिणी कासावीस झाली होती.

गरीब जातीच्या भेकऱ्यांच्या त्या दुःखी कुटुंबाला तशा विकल अवस्थेंत पाहून मी विरघळलों...एकाएकीं मला माझ्या बाळंतपणासाठीं माहेरीं

गेलेल्या पत्नीची तीव्रतेनें आठवण झाली. तिचे दिवस भरत आले होते; नि तिच्याकडच्या पत्राची मी गेले चार दिवस उत्कंठेनें वाट बघत होतों... मला गहिंवरून आलें. उभ्या शिकारी आयुष्यांत असें करुण दृश्य मी पाहिलें नव्हतें...भावनांचा असा कल्लोळ मी कधीं अनुभवला नव्हता.

पण भीम्या धनगंर हें कांहीं ओळखत नव्हता. त्याला घाई झाली होती. तो कानांत कुजबुजला–" बघताय् काय....पेटवा लवकर—"

" भिम्या, मादी गाभण आहे...मी बंदूक उचलणार नाहीं–"

" पाया पडतों तुमच्या; असा खुळेपणा करूं नका...पेटवा लवकर...." भिम्या पुन्हां कुजबुजला, " न्हाईतर माझ्याकडे ती द्या बंदूक–" असें म्हणत भिम्यानें माझ्या हातांतील बंदुकीला हात घातला—

" नाहीं, भीम्या–तें शक्य नाहीं ! " मी केवळ्यानें तरी ओरडलों. नि त्यासरशीं त्या तिन्ही हरीणांनीं कान उभारून, भयचकित होऊन माझ्याकडे पाहिलें...त्यांची आमची दृष्टिभेट होतांच, वाट फुटेल त्या तीन दिशांनीं तीं तिघेंजणें उडालीं....बघतां बघतां नाहींशी झालीं.

भीम्या धनगरानें आणि दरोबस्त साऱ्या शिकारी मंडळींनीं, सोन्यासारखी शिकार हातची गमावली म्हणून मला खुळें; ठरवलें; पण माझ्या एका खुळ्या प्रश्नाचें उत्तर मात्र अद्याप कोणीच देऊं शकलेला नाहीं. त्या गर्भवती हरिणीचें पुढें काय झालें असेल ?—

◎ ◎ ◎

# ५ : वेध

काळोख पडतांपडतां गांवांतल्या दोन तरुणांनीं घराबाहेर पडून जंगलाचा रस्ता धरला. एकाच्या खांद्यावर बंदूक होती. नि दुसऱ्याच्या हातांत खूप लांबलचक टॉर्च होता. दोघेहि भराभर वाट चालत होते. प्रथम माळ लागला. उघडा-बोडका. कितीतरी वेळ न संपणारा. तिन्हीसांजेला या माळावर मोकळे वारे भणभणत होते. दोघांच्याहि अंगावर त्या वाऱ्यानें झर्रकन् शहारा उठला. तो हातानें चोळून टाकीत ते झपाट्यानें चालले होते. दोघेहि कांहीं बोलत नव्हते. बराच वेळ चालून झाल्यावर त्यांतला एकजण काळोखांत ठेचाळला नि अडखळून पडला. त्याला वर उठवीत दुसरा बोलला—"आजचा दिवसच वाईट आहे. खरं म्हणजे किशा धनगराची गाय वाघानें खाल्ल्याची बातमी आपल्याला सकाळींच मिळाली. पण त्या वेळेपासून या वेळेपर्यंत आपला एकहि बेत धड पार पडला असेल तर शपथ...माचाण बांधायचें तर इतक्या लांबवर कोणी मजुरीनें यायला तयार नाहीं...बरें, माचाणाशिवाय बसायचें म्हटलें तर चांगली बॅटरी मिळेना....अडचणी तरी किती...एक का दोन—"

"तर काय? नि आयत्या वेळेला बाहेर पडतांना तरी किती अडथळे! आम्ही नवशिके शिकारी असलों तरी अनुभव घेतल्याशिवाय धाडस अंगीं येणार कसें? घरच्या माणसांची समजूत घालण्यांतच निम्मे रक्त आटून गेलं—"

खालच्या आवाजांत मग ते दोघेहि असेंच बोलणें करीत चालत राहिले. आज बाकी झालें होतें तसेंच. हे दोघेहि तरुण त्या गांवांतील ताज्या दमाचे बरकंदाज होते. अद्याप त्यांना मोठ्या शिकारीचा अनुभव नव्हता! कधीं

गांवकऱ्यांबरोबर रानडुकरें, हरणें, ससे यांच्या शिकारी त्यांनीं केल्या होत्या. पण वाघाच्या शिकारीची त्यांना अद्याप संधि आली नव्हती. त्यामुळें आज सकाळींच जेव्हां किशा धनगराची पार्डी वाघानें मारल्याची बातमी त्यांना मिळाली तेव्हां लगेच त्यांनीं माचाण बांधून रात्रीं वाघाच्या शिकारीला जायचा बेत पक्का केला. पण दोघांच्याहि घरच्या माणसांनीं त्यांच्या ह्या बेताला जोराचा विरोध केला होता. तुम्हांला अद्याप वाघाच्या शिकारीची संवय नाहीं, नि त्यांतहि रात्रीच्या शिकारीचा तर मुळींच अनुभव नाहीं... तुम्ही ह्या फंदांत पडूं नका, असें परोपरीनें त्यांना घरच्या माणसांनीं सांगितलें होतें. पण हे दोन्ही तरुण खरोखरीचे धाडसी गडी होते. त्यांनीं सर्वांची समजूत काढली होती....अर्धवट खाऊन टाकलेल्या आपल्या भक्ष्यावर रात्रीं वाघ पुन्हां येणार, तेव्हां त्याला बॅटरीच्या प्रकाशांत रोखून बंदुकीनें टिपायचा बेत त्यांनीं निश्चित केला होता. पण त्यांतहि पुन्हां नाना अडचणी आल्या होत्या. चांगल्या झगझगीत प्रकाशाचा टॉर्च त्यांचेजवळ उपलब्ध नव्हता....तेव्हां मुद्दाम इसम पाठवून बाजारच्या गांवाहून पांच सेल्सचा टॉर्च आणवून घेईपर्यंत काळोख पडायची वेळ आली होती. नि आतां सारा सरंजाम जमल्यावर ते दोघे उत्साहानें बाहेर पडले होते.

"काय रे, आपण माचाणाचा आधार न घेतां, उघड्यावर वाघाशीं मुकाबला करणार आहों खरे; पण—"

"हे बघ, आतां पणबीण कांहीं मध्यें आणूं नकोस तूं...आपण आतां बाहेर पडलों आहोंत नि वाघाला मारणार आहोंत...तूं बॅटरीची कामगिरी नीट पार पाड...मग मी बघतों, माझ्या बंदूकीसमोर तो कसा टिकतो तें–"

त्या दोघांनीं असें बोलत बोलत माळ मागें टाकला नि ते वाघानें जिथें मारा केला होता त्या ठिकाणाच्या जवळ आले. लगेच एकानें दुसऱ्याला हातानें ढोसून खूण केली नि ते दोघेहि निमूट झाले. सावधगिरीनें इकडे-तिकडे बघत हलके हलके पावलें टाकूं लागले.

आतां रात्र चांगलीच फांकली होती. अमावास्येच्या अलिकडचे दिवस होते....त्यामुळें आकाशांत चंद्र नव्हता. पण आकाश नक्षत्रांनीं झगमगत होतें. नि त्यांचा अंधुक प्रकाश सगळीकडे पसरला होता. आजूबाजूच्या टेकड्या नि झाडें यांचा त्या अस्पष्ट प्रकाशांत अंदाज येत होता. जिथें

वाघानें अर्धवट खाल्लेल्या त्या पाडींचा मृतदेह पडला होता ती जागा अगदीं उघडीबोडकी होती. जवळ एखादें झाड नव्हतें कीं दरड नव्हती. लांब दूरवर थोडीशी झाडी होती नि अलिकडे एक अर्धवट आटत आलेला ओढा होता. त्या ओढ्याच्या कडेला मात्र मोठमोठे दगड उभे होते. त्या दोघांहि तरुणांनीं पूर्वींच ती जागा निश्चित करून ठेवली होती. दुपारींच ते त्या जागेची पहाणी करून गेले होते. ओढ्याच्या पलीकडे एका उंच दगडावर बसून ते वाघाची वाट पहाणार होते. एकतर ती जागा मारगिरीला जवळची होती नि सुरक्षितपणा म्हणजे मध्यें त्या ओढ्याचें पात्र होतें. दुसरा त्यांचा कयास असा होता कीं कदाचित् वाघ पाणी पिण्यासाठीं जर आधींच आला तर तो या ओढ्यावरच येणार...दोन्ही दृष्टीनीं त्यांनीं ती जागा पसंत करून ठेवली होती.

पाऊलभर पाण्यांतून हळूंच एकमेकांच्या हातांना पकडून त्यांनीं ओढ्याचें पात्र ओलांडलें नि ते एका भल्या रुंद खडकावर बसून राहिले. आजूबाजूला कसली जाग नव्हती. रातकिडेहि ओरडत नव्हते. आकाशांतून उडत जाणाऱ्या एखाद्या रात्रपक्ष्याच्या पंखांचा आवाज तेवढा कानांवर येत होता——

पांच-दहा मिनिटें शांतपणें गेलीं. मग बंदूकवाल्या तरुणानें आपल्या जोडीदाराला हातानें ढोसलें नि त्याच्या कानांत तो कुजबुजला——" जरा लाईट मार बघूं आजूबाजूला; कांहीं आढळतें का पाहूं——"

लागलीच त्याच्या दोस्तानें टॉर्च वर धरला नि बटन दाबलें. झगझगीत प्रकाशाचा झोत समोर पसरला नि त्या प्रकाशांत ती मरून पडलेली गाय स्पष्ट दिसूं लागली. क्षणभर टॉर्च तिथेंच रोखून त्यांनीं पाहिलें पण त्या जागीं अद्याप कसल्याच जनावराचा पत्ता नव्हता. मग क्रमाक्रमानें टॉर्चचा प्रकाशझोत सभोंवारच्या प्रदेशांत फिरूं लागला. त्या पिंवळ्या-पांढऱ्या लख्ख प्रकाशांत रात्रीच्या वेळीं स्तब्ध असलेलीं झाडें एका निराळ्याच दुनियेंत उभीं असल्यासारखीं दिसत होतीं. 'लाईट हाऊस' मधील प्रकाशाचा पट्टा जसा सभोंवार फिरतो, तसा प्रकाशझोत फिरत होता. नि कुठेंच स्थिर होत नव्हता....पण मग एकाएकीं तो क्षणभर स्थिर झाला. दूर अंतरावर एके जागीं कुणाचे तरी दोन तांबूस डोळे लकाकूं लागले. तत्क्षणीं बंदूकवाल्या तरुणानें बंदूक सांवरली. टॉर्चवाल्यानें टॉर्च त्या जागीं

नीट रोखला नि ते सावधतेनें अंदाज घेऊं लागले. अद्याप तें जनावर होतें तिथेंच उभें होतें. तें कोणतें जनावर असावें याचा अंदाज इतक्या दूरून येत नव्हता. मग टॉर्चवाल्यानें नेहमींची विशिष्ट युक्ति अंमलांत आणण्याचें ठरविलें....रात्रींच्या शिकारीला टॉर्च दाखवणाऱ्या प्रत्येक शिकाऱ्याला ही युक्ति ठाऊक असावी लागते. दूर अंतरावर उभें असलेलें जनावर जवळ-बंदुकीच्या कक्षेंत आणण्यासाठीं ही युक्ति योजावी लागते. प्रथम लाईट विझवावयाचा नि क्षणार्धांत तो पुन्हां पेटवून त्याचा फोकस जनावराच्या डोळ्यांवर स्थिर न करतां तो किंचित् अलिकडे स्थिर करावयाचा....असें केलें म्हणजे इतका वेळ दिपून स्तब्ध राहिलेलें तें जनावर कुतूहलानें पुढें पुढें येऊं लागतें. हा प्रकाश आहे तरी कसला; हें जाणण्याची विलक्षण ओढ त्याला लागून रहाते नि जसजसा फोकस अलिकडे सरकेल तसतसें तें जनावर अलिकडे चालत येऊं लागतें...तें आपल्याला हवें तेवढ्या अंतरावर येऊन उभें रहातांच, बॅटरीवाल्या इसमाला बंदुकवाला इसम खूण करतो, कीं आतां त्याला तिथेंच रोख...मी बंदूक पेटवतों...नि मग पुन्हां लाईट क्षणार्धांत विझतो. पुन्हां पेटतो नि फोकस त्या जनावराच्या डोळ्यांवर नेमका स्थिर होतो. जनावराचे डोळे दिपतात नि तें जाग्याला खिळून उभें राहतें. तेवढ्यांत चाप ओढला जातो...कडाड् आवाज होऊन इतका वेळ प्रकाशाची मौज पहात उभें असलेलें तें खुळें जनावर रक्ताच्या थारोळ्यांत तडफडूं लागतें...दूरच्या जनावराला जवळ खेंचून घ्यायची युक्ति ही अशी असते. आतांहि त्या तरुणानें तसेंच केलें. त्यानें फोकस थोडा अलिकडे स्थिर केला नि ते तांबडे डोळे मोहिनी पडल्यासारखे जवळ येऊं लागले. तें जनावर जणूं उड्या मारीत पुढें येऊं लागलें. टॉर्चच्या प्रखर प्रकाशाला एखादा पतंग भुलावा तसें तें जनावर भुललें नि भराभर पुढें येऊं लागलें. नि मग एकदोन मिनिटांतच सारा उलगडा झाला. एक पांढरा गुबगुबीत ससा होता तो. सशाची जात टॉर्चच्या प्रकाशाला इतकी भाळते कीं, एकेक शिकारी एकेका रात्रींत दहा-दहा पंधरा-पंधरा ससे टॉर्चवर रोखून ठोकूं शकतो....तो ससा आहे, हें समजून येतांच त्यांनीं ताबडतोब बॅटरी विझवली नि निराश होऊन ते खालीं बसले. समोरच्या मेलेल्या गायीच्या दिशेनें तोंड करून ते बसले नि एकमेकांच्या कानांत कुजबुजूं लागले—

" वाघ जवळपास असला नि ह्या लाईटला बुजून नाहींसा झाला नसला म्हणजे मिळविली...मूर्खपणा झाला आपला ह्या फडतूस ससासाठीं लाईट पेटवून ! "

दिवसभर शेजारच्या घळींत झोंपलेला वाघ काळोख पडतां पडतां उठला. उठतांक्षणीं त्याला आठवण झाली कीं, आज आपल्याला विशेष मेहनत करायला नको आहे. शिकारीसाठीं वणवण करण्याची आज आवश्यकता नाहीं. काल मारलेल्या गायीचा अर्धाअधिक हिस्सा अजून शाबूत आहे. त्यावर जाऊन निर्वेधपणें ताव मारायचा...या आठवणीसरशीं त्याला एकदम हुषारी वाटली; नि अंगाची कमान करीत त्यानें आळस दिला. तोंडानें थोडा खुषीचा गुरगुराट केला...आपल्या लाल-लाल पातळ, जिभेनें अंग चाटतां-येईल तेवढें चाटलें. पंजानें मिशा साफसूफ केल्या नि तो थोडावेळ पुढील दोन्ही पाय पसरून नि मागील पाय दुमडून स्वस्थ बसून राहिला. तोंडा-भोंवतीं गुईंगुईंणाऱ्या माशा हांकलण्यापुरतें तो आपलें मुंडकें इकडचें तिकडे हलवीत होता, एरवीं, तसेंच स्वस्थ बसून त्यानें विश्रांति घेतली नि मग तडकाफडकीं तो उठून उभा राहिला. आतां काळोख चांगलाच पसरला होता. तो मग ताठ पावलांनीं चालत हलके हलके घळीच्या बाहेर आला. नि भेदक नजरेनें इकडे-तिकडे पाहूं लागला. पांच-एक मिनिटें त्यानें संथपणें निरीक्षण करण्यांत घालवलीं. दूर अंतरावर एक कोल्हें जमीन हुंगीत होतें. अलिकडे एका बांधाच्या मुळाशीं दोनचार पाजवे उंदीर पाठशिवणीचा खेळ खेळत असल्यासारखे बिळांतून त्या बिळांत असे पळत होतें. बाकी सगळीकडे शांत होतें. कुठें कसली जाग नव्हती. धोक्याचें तर मुळींच चिन्ह नव्हतें. तो मग हलकेंच चालत चालत बाहेरच्या उघड्या मैदानांत आला. त्याला पाहून तिथें एका पायावर उभी असलेली एक टिटवी किंचाळत उठली नि थोडें पळत जाऊन तिनें पंख पसरले नि झपाट्यानें अंतराळ गांठलें. तिच्या त्या वेड्याबागड्या हालचालींकडे उपेक्षायुक्त कुतुहलानें पहात तो पुढें चालूं लागला. थोडें अंतर चालून जातांच एक जीभ खवळून टाकणारा वास वाऱ्याबरोबर त्याच्या नाकाच्या बोंडीवर येऊन आदळला नि त्याला पुन्हां रात्रीं मारलेल्या गाईची आठवण झाली. रात्रींच्या प्रसंगाच्या त्या आठवणीनें तो नखशिखांत उत्तेजित झाला.

गेल्या रात्रीं तो असाच फिरतफिरत गांवदरीला उतरून इकडे-तिकडे हिंडत कांहीं शिकार मिळते का याचा तलास घेत होता—नि एका-एकीं ती कोंवळी पाडी एका उन्हाळी शेतांत चोरटेपणानें चरत असलेली त्याच्या नजरेस पडली. खरें तर त्या दिवसांत गुरांना राखण असते. सगळीं जित्राबें गोठ्यागोठ्यांतून दावणीला जुंपलेलीं असतात. पण ही चोरटी गाय हिरव्या पिकाच्या आशेनें दावें तोडून दुसऱ्याच्या पिकांत घुसली होती; नि मजेंत चरत होती...वाघानें तिला पाहिलें नि मनांत कांहीं विचार केला...आजवर त्यानें गुरांवर कधीं तोंड टाकलें नव्हतें. शेत-कऱ्यांच्या बकऱ्या, कुत्रीं नि यांपैकीं कांहींच साधलें नाहीं तर सकाळच्या प्रहरीं उपाशीं पोटानें उघड्या बखळींत चरणारीं कोंबडीं यांवरच त्यानें अधूनमधून तोंड टाकलें होतें. अद्याप गाय, बैल असल्या भारी जनावरांवर त्यानें हल्ला केला नव्हता...नव्हे, तशी संधीच त्याला लाभली नव्हती. त्यामुळें ती एकाकी गाय पाहून त्यानें संधि साधायचें ठरवलें. लपतछपत तो बांधाच्या आडून तिच्याजवळ गेला नि किरण साधून त्यानें उडी घेतली. कोंवळें पीक दातांखालीं चघळणाऱ्या त्या गाईचा घांस नीट घशाखालींहि जाऊं न देतां त्यानें तिचें नरडें फोडलें...आपले तीक्ष्ण सुळे तिच्या मानेंत रुतवून तिला हंबरडा फोडायलाहि सवड न देतां त्यानें तिचें रक्त प्यावयास सुरुवात केली—त्या उष्ण रक्ताचे दोन घोट पोटांत जातांच तो बेभान झाला नि तिच्यावर तुटून पडला. पांच-दहा मिनिटांत ती गाय त्यानें ठार केली...तिच्या पुठ्याचें नि मानेकडलें मऊमऊ मांस त्यानें खाववेल तेवढें खाल्लें नि मग तिचा देह उचलून घेऊन तो तिथून निघाला होता. त्या शेतापासून चार सहा फर्लांगावर त्यानें त्या गाईचें उष्टें शरीर आणून टाकलें होतें...तेथून त्याची घळ जवळच होती...राहिलेला भाग त्याला आज खावयाचा होता...त्या मृत शरीराचा वास त्याच्या नाक-पुड्यांत घुसला नि तो गेल्या रात्रीच्या ह्या आठवणी मनांत घोळवीत झपाट्यानें चालूं लागला. आतां त्याला दुसरें तिसरें कांहीं सुचत नव्हतें. कधीं एकदां त्या ठिकाणीं जातों नि पोटांत खवळलेली भूक शांत करतों, असें त्याला झालें होतें. गेल्या रात्रीच्या रक्त-मांसाची चव अजून जिभेवर घोटाळत होती नि आतां भूकहि फार लागली होती.

सावधगिरीनें चाहूल घेत पण शक्य तेवढी त्वरा करीत तो गायीजवळ येऊन पोंचला. आतां गाय फक्त वीस-पंचवीस कदमांवर होती. त्याला आपलें भक्ष्य स्पष्ट दिसत होतें. त्यानें आजूबाजूला पाहून कानोसा घेतला. कुठेंहि धोक्याची खूण नव्हती. वारा सळसळत होता नि पानांचा आवाज होत होता एवढेंच. त्या मृतदेहाभोंवतीं कोल्हे, खोकडसुद्धां जमले नव्हते. त्याला आनंद झाला. तो आतां पाऊल टाकणार तोंच त्याला वाटलें कीं, आधीं थोडें पाणी पिऊन घ्यावें. आपल्याला तहानहि बरीच लागली आहे. तो मग त्या गाईच्या मुडद्याजवळ आला. तोंड खालीं करून एकवार त्यानें आपली शिकार हुंगून पाहिली. नि तो वास नाकांत सांठवून तो तसाच पाठीमागें फिरला नि ओढ्याच्या बाजूला वळला. ओढ्यावर येऊन त्यानें पाण्याला तोंड लावलें. लपलप करीत तो पाणी पिऊं लागला नि एकाएकीं त्याला कसलातरी संशय आला. ओढ्याच्या पलीकडे कसली तरी धोकेबाज हालचाल झाल्याचा त्याला भास झाला. कान टवकारून त्यानें मान वर केली नि तो एकटक पाहूं लागला....पण त्याच्या दृष्टीला कांहीं पडलें नाहीं. नाक फुगवून त्यानें वास घेण्याचा प्रयत्न केला, पण त्याला कसलाहि वास आला नाहीं...मग त्यानें पुन्हां मान खालीं केली नि तो स्वस्थपणें पाणी पिऊं लागला....

पाणी पिऊन होतांच त्यानें पलिकडच्या बाजूचा पुन्हां एकदां अंदाज घेतला. कसली तरी निराळीच खुसबुस त्याच्या कानीं नक्की पडली होती... जंगलांत कधीं ऐकूं न येणारी कुजबुज त्याच्या तीक्ष्ण कानांनीं निश्चितच ऐकली होती....कसली होती ती कुजबुज? कोण होतें त्या बाजूला? दिसत तर कोणीं नाहीं....त्यानें थोडा वेळ थांबून वाट बघितली. पण आतां कांहीं ऐकूं येत नव्हतें. त्याला वाटलें, आपल्याला उगाच भास झाला. आपल्या या सुरक्षित राज्यांत कोण कशाला येतें आहे आपल्याला त्रास द्यायला? जावें झालें सरळ नि सुरूं करावा फराळ—

तो माघारीं वळला नि गायीजवळ येऊन उभा राहिला. पुन्हां एकदां त्यानें तिला हुंगली नि मग पुढील नि मागील पाय दुमडून तो आरामांत बसला. उजव्या पंज्यानें गायीच्या पाठीला दाबून धरीत त्यानें आपले दांत तिच्या मांसांत रुतवले नि थोडेसें मांस त्यानें एका झपाट्यांत

खाऊन टाकलें. मग तो किंचित् पुढें सरकला नि कण्याचें हाड जबड्यांत धरून मोठ्या आवेशानें तो तें फोडूं लागला...कड्कड् असा हाडें फोडण्याचा आवाज ऐकूं येऊं लागला—

खडकावरील चुळबूळ आतां वाढली होती. मघाशीं जेव्हां वाघ समोर पाणी प्यायला आला होता, तेव्हांच बॅटरीवाला तरुण खुणेनें आपल्या जोडीदाराला सुचवीत होता कीं मी लाईट टाकतों; तूं काडतूस पेटव... पण बंदूकवाल्यानें मोठ्या मिनतवारीनें त्याला त्या घाईच्या निर्णयापासून परावृत्त केलें होतें. वाघ आतां आपल्या भक्ष्यावर आला होता, हें त्यांनीं हाडें फोडण्याच्या आवाजावरून ओळखलें; नि नशीबाची परीक्षा घ्यायचें निश्चित केलें...

बंदूकवाल्यानें एकदां नळीवरून हात फिरवला. ट्रिगर, हॅमर पुन्हां पुन्हां हाताळले...मानेवर जमलेला घाम निपटून टाकला...धडधडणाऱ्या छातीला उजव्या दंडाचा नेट दिला नि त्या दंडावर बंदुकीचा दस्ता नीट रोंवून त्यानें जोडीदाराला खूण केली—कीं, “ लाईट ऑन ”—

मग बॅटरीवाल्यानें बॅटरी रोखली नि बटण दाबलें. पुन्हां एकदां झगझगीत प्रकाशझोत पडला. त्या प्रकाशांत तो लांबलचक पट्टेरी वाघ त्या दोघांच्याहि डोळ्यांनीं नीट पाहिला. आयुष्यांत प्रथमच ते असा वाघ पहात होते.

निमिषार्धांत वेध घेतला गेला नि काडतूस फुटलें. कडाड् धूम् असा आवाज झाला—

नि कडकडा हाडें फोडणाऱ्या नि अंगावर प्रकाशझोत पडतांच विस्मयानें नि रागानें टॉर्चच्या दिशेनें रोखून बघणाऱ्या त्या वाघाच्या छातींत तत्क्षणीं एक तीव्र सणक उठली...आपलें काळीज कोणीतरी जाळीत आहे, कोण्या दुसऱ्या बलिष्ठ वाघानें त्याचे सुळे आपल्या काळजांत रुतवलें आहेत असें त्याला वाटलें. ती कळ असह्य होऊन त्यानें एकदां जोरानें गर्जना केली... नि दुसऱ्याच क्षणीं त्यानें त्वेषानें जागच्याजागीं टिपण घेऊन प्रकाशाच्या दिशेनें एक उंच झेंप घेतली...

तोच पुन्हां मघांचाच आवाज झाला. आतां आपल्या शरीरावर शंभर वाघ हल्ला करीत आहेत असें त्याला वाटलें नि गांगरून तो खालीं

कोसळला....त्याची छाती, त्याचें डोकें, त्याचें सारें शरीर छिन्नभिन्न झालें होतें. नि रक्तांत माखून तो धडपडत होता...अद्याप तो आपल्या त्या शत्रूकडे...त्या डोळे दिपवून टाकणाऱ्या सूर्यासारख्या प्रकाशाकडे डोळे विस्फारून पहाण्याचा यत्न करीत होता....उलटा-पालटा होत वेध घेण्याची धडपड करीत होता.

तोंच पुन्हां एकदां तो पूर्वींचाच कानठळ्या बसवणारा आवाज त्याच्या कानांत शिरला....त्या आवाजाबरोबर त्याचें मस्तक दुभंगून गेलें नि त्याला पुढें कांहीं ऐकूं येईनासें झालें···कांहीं दिसेनासें झालें...कांहीं कळेनासें झालें.

अद्याप बॅटरी पेटलेलीच होती. अद्याप नळी रोंखलेलीच होती. मग वाघाची सगळी हालचाल नाहींशी झाली याची खात्री होतांच बंदुकवाला म्हणाला—" लाईट ऑफ "

बटणावरचें बोट सरकलें. नि लाईट ऑफ झाला. पूर्वींसारखा चिडीचीप काळोख सगळीकडे पसरला.

# ६ : पारध

दुपार कलंडून गेली तशी गांवचा सोमनाक महार महारवाड्यांतून निघाला तो त्यानें थेट देवळाचा रस्ता सुधारला. देवळांत बाबल्या गुरव त्याची वाट बघतच बसला होता. तो लगेच म्हणाला—" मंडळींचा अजून पत्त्या नाय्....एकदां " नौबत " कर—"

मग सोमनाकानें जाळ पेटविला. दोरीला टांगून ठेवलेला भला मोठा ढोल खालीं काढून त्यानें त्याच्या दोन्ही बाजू चांगल्या शेकल्या नि कातडें खरपूस शेकलें याचा, त्यावर बोटें फिरवून अंदाज घेत तो उभा राहिला. पट्टा खांद्यावर अडकवून त्यानें तो ढोल पोटावर सांवरून धरला नि दुसऱ्याच क्षणीं ढोलावर काठी वाजली...ढ्यॅन् ढ्यॅन् च्यौ, ढॅन् ढॅन् च्यौ...

किर्र राईत वसलेल्या रामेश्वराच्या देवळांत ढोल कडाडूं लागला. त्याचे प्रतिसाद राईत चारी अंगांनीं घुमूं लागले. देवळाच्या आढ्याला चिकटलेलीं वाघळें नि राईत झाडांच्या शेंड्यावर बसलेलीं माकडें, यांच्यांत चाळवा-चाळव सुरू झाली. त्या एका ढोलाच्या गर्जनेनें आजूबाजूचें अचेतन वातावरण जिवंत झालें.

ढोलाचा आवाज गांवांत पोंचतांच गांवकरी मंडळींत हालचाल सुरू झाली. आज देवळांत गांव जमायचा होता. गांवचा 'देव' पारधीला जाणार होता. नि त्यासाठीं देवाचा 'कौल' घेऊन पारधीची तयारी करायची होती. गांवच्या पद्धतीप्रमाणें 'देवाची पारध' शिमग्याच्या आंत व्हायलाच हवी होती. नाहींतर गांवावर संकटें कोसळलीं असतीं. देवाला संतुष्ट ठेवण्यासाठीं पारधीचा मांड मांडायलाच हवा होता...

दक्षिण कोंकणांतील खेड्यांतून अद्याप ही परंपरागत पद्धत चालू आहे. कोंकणांतील खेडीं एका विशिष्ट ग्रामव्यवस्थेनें बांधलीं गेलीं आहेत. गांवचें देऊळ नि त्या देवळांतला देव, हें साऱ्या गांवाचें श्रद्धास्थान. गांवचें देवस्थान हें गांवचें प्रगट व्यासपीठ. गांवचा न्यायनिवाडा इथेंच चालतो. गांवचें तंटेबखेडे इथेंच मिटतात. गांवावरचें संकट, इथेंच देवाला सांकडें घालून सोडवलें जातें. नि गांवचे सारे उत्सव याच देवळांत पार पडतात. असें देवस्थानचें इथें महत्त्व. ह्या देवस्थानच्या कांहीं चालीरीती असतात. कांहीं वार्षिक 'देवकार्यें' असतात. तीं उभ्या गांवानें एक होऊन याच देवळांत पार पाडायचीं असतात. तीं पार पडलीं म्हणजे गांवगाडा सुरळीत चालतो. देव गांवाचें रक्षण करतो. ही समजूत पोरापासून थोरापर्यंत सर्वांच्या मनांत दृढ ठसलेली असते.

'देवाची पारध' हेंहि एक असेंच वैशिष्ट्यपूर्ण 'देवकार्य'. ह्या पारधी कांहीं गांवांतून वर्षांतून तीनदां होतात...कांहीं गांवांतून फक्त एकदांच होतात. पारध करायचें ठरलें, म्हणजे देवाचा 'कौल' घेऊन दिवस ठरवायचा; गांवोगांवचे बरकंदाज बोलवायचे, दारूगोळ्याची तजवीज करायची, नि गांवच्या एकूण एक पुरुषांनीं चार दिवसांची पीठपोटगी बरोबर घेऊन शिकारीसाठीं बाहेर पडायचें. अमुक एका ठिकाणचें रान काढायचें असें ठरलें म्हणजे रानांतच पाण्याची सोय बघून तेथें तळ टाकायचा नि 'देवाचा हुकूम' घेऊन रान धरायचें.

देवाचें नांव घेऊन प्रचंड उत्साहानें धरलेली ही पारध बहुधा निष्फळ होत नाहीं. एखाद दुसरा माजलेला रानडुक्कर मिळाला म्हणजे वाजत-गाजत त्याला गांवांत आणायचें नि त्याची 'देवाचा प्रसाद' म्हणून सगळ्या गांवांत वांटणी करायची. एखादेवेळीं जनावर सांपडलें नाहीं, तर त्याचें कारण 'देवाला' विचारायचें. कारण खुद्द देवच पारधीसाठीं बाहेर पडलेला असतो. मग देव सांगेल ती उपाययोजना करून पुन्हां रान धरायचें, पोटगी संपून उपासमार झाली तरी चालेल, पण रिकाम्या हातांनीं गांवांत परत फिरायचें नाहीं, अशी जिद्द प्रत्येकजण बाळगून असतो. मग जीवाच्या करारानें शिकार खेळली जाते...निशाणबाज आपल्या कसबाची पराकाष्ठा करतात. रानकाढे बेदरकारपणें जाळीजाळींत

घुसतात... नि असें झालें म्हणजे किमान ‘ बारकीचा ’ नाहींतर ‘ आठकीचा ’ ( जो उचलायला बारा किंवा आठ गडी लागतात असा ) मदमस्त रान-डुक्कर सहज तडाक्यांत सांपडतो....हरहर महादेवाच्या गर्जनेंत विजयी गांवकरी गांवांत परततात...

गांवानें आजहि अशाच पारधीचा बेत आंखला होता. देवळांत ढोल कडाडत होता नि एकेक गांवकरी डोकीला मुंडासें गुंडाळून देवळाची वाट चालत होता.

थोड्याच वेळांत देवळाचा सभामंडप पूर्ण भरला. लोक दाटीदाटीनें बसले, नि बाळाजी खोत काय बोलतो याची वाट बघूं लागले. बाळाजी खोत गांवाचा जसा पुढारी होता तसा इथें देवळांतहि त्याचा पहिला मान होता. देवाचा तो पहिल्या मानाचा ‘ वस ’ (वंश ) होता. त्यानेंच देवाशीं बोलणें करायचें, हा संकेत होता.

बारा-पांच मानाचे सगळे मानकरी जमलेले बघतांच बाळाजी खोत उठला नि गुरवाला म्हणाला,—“ बाबल्या, धूप घाल—”

बाबल्या गुरव हातपाय धुवून आला नि त्यानें धुपारतींत धूप पेटवून रामेश्वराच्या पिंडीसमोर धुपारती फिरवली. इकडे महारांनीं पुन्हां ढोलावर काठी टाकली. रामेश्वरासमोर धूप फिरवून होतांच सभामंडपांतील मधल्या मोकळ्या जागीं शुचिर्भूत होऊन उघड्या अंगांनीं उभ्या राहिलेल्या पांचहि ‘ झाडां ’समोर त्यानें धुपारती फिरवली. हीं ‘ झाडें ’ म्हणजे ज्यांच्या अंगांत देवाचें वारें ‘ संचारतें ’ ते पांच इसम. त्यांच्या अंगांत ‘ अवसर ’ भरला म्हणजे त्यांच्या मुखांनीं रामेश्वर बोलणार असतो...

धुपाचा सुगंध जिकडे-तिकडे दरवळला. धुपारतीचा धूर सभामंडपांतील हवेंत वळणें घेत फिरूं लागला. ढोलांची नि ताश्यांची लय वाढली. मध्येंच मोगरशिंग ललकारी देऊं लागले; नि त्या स्तब्ध वातावरणांत ‘ देवाची ’ हालचाल सुरू झाली. पांच ‘ झाडांपैकीं ’ दोन ‘ झाडांनीं ’ अंग धरलें. त्यांच्यांत रामेश्वराचा संचार झाला. खांद्यावरील देवाचे ‘ तरंग ’ सावरीत ते मागेंपुढें फिरूं लागले. त्यांचें अंग थरथरूं लागलें. नजर निश्चल झाली. कसल्यातरी विलक्षण शक्तीनें त्यांना खेंचून घेतलें नि त्यांच्या थरथरणाऱ्या, घामाघूम झालेल्या, हाश-हुश करणाऱ्या देहांकडे अवघा सभामंडप उभा राहून एकाग्रपणें पाहूं लागला.

देवाचें आगमन झालेलें पाहून बाळाजी खोतानें महारांना हातानें खूण केली नि एका क्षणांत वाद्यें थांबलीं. महारांनीं ढोल खाली ठेवले नि तेहि देवाच्या तोंडून बाहेर पडणारे शब्द ऐकण्यासाठीं आतुरतेनें उभे राहिले.

घुमत घुमत देवानें विचारलें–" कित्या बोलावनां केलंस् ? "

बाळाजी पुढें झाला नि जमिनीला हात लावून नमस्कार करीत बोलला—" म्हाराज्या, वर्साची ' पारध ' धरूचो इच्यार मनांत ठेवून तुकां बोलावनां केलां—"

देव किंचित्काळ तसाच मागेंपुढें फेऱ्या घालीत राहिला नि मग थांबत थांबत बोलूं लागला—

" पारध करा...पारध होव्कच्च होयी—"

" पन द्येवा; आमी मानसानी बेत ठरवून काय उपेग ? तुजी देवाची मदत होयी...बारापांचाचा संगठन होवून तूं आमचेबरोबर भायेर पडूक होयस—"

" तुमी फुडे चला; पाठसून मी येतंय्—"

" तसां नुको म्हाराज्या.. तूं फुडे चल; आमी पाठसून येतों—"

देव बराच वेळ बोलला नाहीं. घुमत घुमत मागें–पुढें फिरत राहिला. गांवकरी मंडळींत चुळबूळ सुरू झाली. देवाची ही सांकेतिक भाषा होती. ती सगळ्यांना समजत नव्हती...पण देवाच्या मनांत कांहींतरी वेगळें आहे, एवढें सगळ्याजणांनीं ओळखलें. नाहींतर देव असें वांकडे बोलला नसता–

मग देव पुन्हां बोलूं लागला—

" पूर्वसमंध, राजसत्ता, मूळ पुरुस, शींवधडे, या सगळ्यांक गाऱ्हानां करा...त्येंची मदत मागा....त्येंचे हात बांधून व्येवा; मगे मी फुडे चलतंय् - तुमी पाठसून येवा....काम फत्ते करून घेवा—"

ताबडतोब गुरवानें आंब्याचीं पानें देवाच्या पुढ्यांत मांडली. बाळाजी खोत गाऱ्हाणें सांगूं लागला. नि मागून सारे गांवकरी " होय म्हाराज्या ऽऽ—" म्हणून ओरडूं लागले. सर्व संबंधित ग्रामदेवतांना अशीं गाऱ्हाणीं घालून झाल्यावर बाळाजीनें देवाला विचारलें—" मग आम्हीं बाहेर पडूचे ? पहिल्या रानाक, पहिल्या पेटाक काम फत्ते होयूत ? "

"होयत्—" देवानें आश्वासन दिलें. पहिल्याच रानांत नि पहिल्याच बंदुकीच्या आवाजांत 'पारध' होणार होती. प्रत्यक्ष देवानेंच आश्वासन दिलें होतें.

देवाचें काम संपलें. मग महार पुन्हां ढोल वाजवूं लागला. आतां ढोलाची चाल वेगळी होती. मधांशीं ऐकणाऱ्याच्या अंगांत वीरश्री यावी, अशा गतीनें ढोल कडाडत होता....आतां अंगांतलें चैतन्य ओसरावें असा ढोल धीम्या लयींत उदासपणें वाजत होता.

पांच मिनिटांत देवानें 'अंग' सोडलें.

मंडळी घरोघर परतली. उद्यां सकाळीं पीठपोटगी घेऊन रानांत शिरायचें होतें. बाळाजी खोत आणि गांवांतली इतर पुढारी मंडळी देवळांतच मागें राहिली नि पारधीची तयारी करूं लागली. पारधीच्या खर्चासाठीं गांवावर किती वर्गणी बसवायची, कोणकोणत्या बरकंदाजांना चिठ्ठी पाठवून मदतीला बोलवायचें, कुठलें रान धरायचें, याचा विचार सुरू झाला. कणकवलीहून दारूगोळ्याचें परमीट आणण्यासाठीं कोणाला पाठवायचें तें ठरलें. नि दुसऱ्याच दिवशीं सकाळीं रानांतच परस्पर एकत्र व्हायचें, एवढें ठरल्यावर देऊळ रिकामें झालें.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं घरांघरांतील प्रत्येक धडधाकट बाप्या पारधी-साठीं बाहेर पडला. प्रत्येकानें आपापली तयारी पाठीवर घेतली होती. कंबरेला धारदार कोयता बाळगला होता. नि हातांत बांबू घेतला होता. रामेश्वराचें नांव घेऊन सगळेजण घराबाहेर पडले नि मजल दरमजल करीत त्यांनीं सह्याद्रींतील फोंडाघाटाच्या कुशींतलें 'निवळाचें पाणी' गांठलें. ही जागा तळ ठोकण्यास अतिशय सोयीची होती. नजीकच सह्याद्रीच्या पाठीवर घनदाट अरण्य पसरलें होतें. नि विशेषतः या जंगलांत माजलेल्या रानडुकरांचा सुकाळ होता. दरवर्षी किमान एकदां तरी कुठल्या ना कुठल्या गांवचे 'पारधी' या निवळाच्या पाण्यावर तळ ठोकतात नि एखाददुसरा प्रचंड 'वराह' वाशाला बांधून वाजतगाजत गांवीं घेऊन जातात.

शिवाय या ठिकाणचें इतर वैशिष्ट्य असें कीं, इथून आजूबाजूच्या पांच-सहा मैलांच्या परिसरांत शिकारीसाठीं एकाहून एक उत्कृष्ट अशीं

ठिकाणें होती. रानडुकरांचें आगर समजलें जाणारें ' मानबेट ' इथून जवळ होतें. सह्याद्रीच्या पाजेवरील ' दाजीपूर ' नि ' हसनें ' हीं, जिथें केवढेंतरी शिंगाडे असलेले देखणे सांबर आढळतात; अशीं ठिकाणें होतीं. तीन-चार दिवस ह्या परिसरांत शें-शंभर गड्यांनीं हैदोस घातला तर लयलूट शिकार सांपडण्यास बिलकूल हरकत नव्हती.

निवळाच्या पाण्यावर सगळ्यांची जमाजम होईपर्यंत दुपारचे बारा वाजले. बाळाजी खोतानें सगळ्यांची मोजदाद केली. एकंदर एकशेंबारा रानकाढे, सतरा मझललोड ( गांवठी ) नि चार ब्रीचलोड ( काडतुसी ) बंदुका एवढी तयारी त्याला आढळली. या एकवीस बरकंदाजांपैकीं साकेडीचे माईणकर, डांबऱ्याचे पटेल, हरकूळ येथील नारायण हुले नि फोंडाघाटचे सापळे नि पटेल ही मंडळी निष्णात बरकंदाज होती. जनावर पहावें नि मनाला येईल तिथें हमखास त्याला गोळी भिडवावी, असें यापैकीं प्रत्येकाचें निशाणबाजीचें कसब होतें. बाकी बरकंदाज मंडळी आपली सर्वसाधारणपणें गोळीबार करायला उपयोगी पडेल अशी होती. बाळाजी खोत स्वतः एक उत्कृष्ट नेमबाज गडी होता. एकंदर पारधीची तयारी मनासारखी झालेली पाहतांच तो खूष झाला. आतां ' पारध ' फत्ते झाल्याशिवाय रहात नाहीं, याची त्याला खात्री पटली.

थोड्या वेळानें मंडळींनीं भाकरी सोडल्या. खाणेंपिणें झाल्यावर कुणी लवंडले; कुणी गप्पांसाटीं कोंडाळीं केलीं. प्रत्येकाच्या तोंडीं शिकारीच्याच गोष्टी होत्या. एखाद्या मोहिमेवर बाहेर पडावें, त्या भावनेनें मंडळी बाहेर पडली होती. नि त्यांच्या तोंडीं, हातांत घेतलेल्या कामगिरीशिवाय दुसरें बोलणें नव्हतें.

तीन प्रहर कलंडल्यावर बाळाजी म्हणाला, " निवडक मंडळींनीं आजूबाजूच्या रानाची पाहणी करणें सोयीचें होईल. नेमका कुठला भाग शिकारीसाठीं धरायचा तें नक्की केलें म्हणजे तेवढेंच रान सकाळीं पकडतां येईल. "

सगळ्यांनाच ही सूचना पटली. नि मग अनुभवी अशी वीस-पंचवीस मंडळी बाहेर पडली. या मंडळींना कसल्या सूचना देण्याची आवश्यकता नव्हती. ते सगळे शिकारीच्या कामांत मुरलेले होते. आतां ते पायींपायीं

आजूबाजूचा चार-पांच मैलांचा टापू निरनिराळ्या दिशांनीं एकेकटे हिंडणार होते. जिथें जिथें जनावरांच्या रहिवासाच्या, बिळांच्या खाणाखुणा आढळतील, त्या त्या जागा नीट हेरून ठेवणार होते. उद्यां सकाळीं रानकाढ्यांनीं रान धरण्यापूर्वीं बरकंदाजांची रचना करी करावयाची ते ठरवणार होते. रानांत रानडुकरांचा वावर कुठल्या भागांत आहे, सांबरें कुठें कुठें आढळतील नि वाघांचा रहिवास रानांत कितपत आहे, याचा नीट अंदाज ही ‘ टेहळे ’ मंडळी घेऊन येणार होती....

दुपारीं गेलेली मंडळी तिन्हीसांजा परत आली. तोंपर्यंत बाकीच्या माणसांनीं दगडाच्या चुली पेटविल्या होत्या. बरोबर आणलेल्या अलिमीनच्या, पितळेच्या टोपांतून तांबड्या–रात्या तांदुळाचा भात खदखदूं लागला होता. रात्रीच्या जेवणाची तयारी तळावर जोरांत चालली होती....रानाचा अदमास घेऊन आलेल्या मंडळींचें म्हणणें पडलें कीं, ‘ मानबेट ’च्या बाजूनें जाण्यापेक्षां समोर ‘ वलवण ’ च्या सह्याद्रीच्या फाट्यांत घुसणेंच जास्त फायद्याचें होईल. तिथें रानडुकरांचा माग सगळ्यांनाच लागला होता. म्हातारा शंकर जगताप तर म्हणत होता कीं, त्यानें पाहिलेली रानडुकराची ‘ पावलट ’ जवळ जवळ लहानशा रेड्याच्या पावलाएवढी मजबूत होती !

मग सगळ्यांच्या मतानें सकाळीं समोर दिसणारे ‘ वलवण ’चें जंगल धरायचें ठरलें नि घास घास भातपिठलें पोटांत ढकलून मंडळी कांबळी पसरून आडवी झाली. मध्यभागीं भली मोठी शेकोटी पेटवली होती नि सगळेजण शेकोटीकडे पाय करून वर्तुळाकार झोपले होते.

सकाळ झाली तशी सगळेजण उत्साहानें उठले. आदल्या दिवशींच्या, घरून आणलेल्या भाकरी अद्याप शिल्लक होत्या. त्यांची न्याहारी झाली नि रामेश्वराला एकवार जोराचें गाऱ्हाणें करून सगळेजण बाहेर पडले. बाळाजी खोतानें ‘ फुली ’—‘मागोरी’ नीट समजावून दिली....बरकंदाज आपापल्या नेमलेल्या जागांवर निघून गेले, नि सूर्य कासराभर वर येतो न येतो तोंच, उभ्या पुतळ्यासारखा निश्चल असलेला तो सह्याद्रीचा पहाड रानकाढ्यांच्या आवाजानें गजबजून गेला....

रानकाढे धीम्या चालीनें पुढें सरकत होते. प्रत्येक जाळी, प्रत्येक झुडूप, नि प्रत्येक घळ चाळवली जात होती. रानाचा एवढासुद्धां भाग स्पर्श

झाल्यावांचून राहूं नये, याची प्रत्येक रानकाढ्या खबरदारी घेत होता. जिथें निबिड रान माजलें असेल, तिथें दगड टाकून हलवाहलव करण्यांत येत होती...जिथें माणसाचे पाय पोंचणार नाहींत, तिथें कुत्रीं माग काढून येत होती...सगळा पहाड नि त्या खालची घनदाट रानानें माखलेली दरी ढवळून निघत होती.

बाळाजी खोत नि विष्णु पाटील हे दोघे बरकंदाज एका सात्विणाच्या झाडाखालील भल्या मोठ्या उंच खडकावर बसून राहिले होते. ते 'फुली'च्या बाजूला होते. म्हणजे रानकाढे ज्या दिशेनें रान काढीत येत होते, त्यांच्या आघाडीलाच त्यांनीं जागा धरली होती. रान हलवलें जातांच, लपून बसलेलें जनावर पुढें पुढें सरकत जातें नि या बाजूच्या बरकंदाजाच्या आयतें तावडीत सापडतें....तेवढी जबाबदारी 'मागोरी'च्या (पिछाडीच्या) बरकंदाजावर नसते. त्यामुळें बाळाजी नि विष्णू दोघेहि आपापल्या नळ्या जुस्त धरून चाहूल घेत सावध होऊन बसले होते. कोणत्याहि क्षणीं जनावर त्यांच्या समोर आलें असतें. रानकाढ्यांच्या भीतीनें जीव घेऊन पळत असलेलें जनावर अचूकपणें टिपणें ही खरी करामत होती.

ते जिथें बसले होते तिथून खालच्या दरीचा घसरता भाग नि वरील पहाडाचा चढाव, दोन्हींकडे त्यांची नजर सहज पोंचत होती. त्यांनीं मुद्दामच ती जागा निवडली होती. कारण 'फुली'वर पळणारें जनावर चढउतार न बघतां कसेंहि दौडत असतें नि त्यामुळें तेथून अशा पळणाऱ्या जनावरावर गोळी चालवणें त्यांना अधिक पसंत वाटत होतें.

बाळाजी खोताच्याच सरळ रेषेंत खालच्या बाजूला फर्लांगभर अंतरावर दुसरा बरकंदाज जागा धरून बसला होता. नि तसेच इतर 'फुली'वरचे बाकीचे बरकंदाज तिथून पुढें सारख्या अंतरावर बसले होते. या प्रकारच्या रचनेनें कुणाच्याहि अंगावरून गोळी खाऊन पुढें चाललेलें जनावर त्या-पुढच्या बरकंदाजाच्या तावडींत सांपडणार होतें.

अकरा वाजण्याचा सुमार झाला तरी रानांत जनावराचा मागमूस आढळेना. विष्णू पाटील बाळाजीकडे विडी मागणार तोंच रानकाढ्यांत एकाएकी कलबलाट उडाला. रानकाढे ओरडले. "बाळाजी खोत! डुकरांलो कळप उठचो...फुलीवर येताहा...सावध...."

दोघांनींहि बंदुका शिस्तींत तोलल्या नि ते डोळ्यांत तेल घालून समोर पाहूं लागले. तेवढ्यांत मागच्या ऐनाच्या झाडावरील 'टेहेळ्या' ओरडला—"मोठो डुक्कर 'मागोरी' वर पळालों....'कोळट' नि तिची पोरां तेवडी 'फुली' वर येतहत....'मागोरी' वरल्या बरकंदाजा...सांभाळ—"

टेहेळ्यानें बरोबर पाहिलें होतें. त्याच्या उंचावरून ओरडण्याचे पडसाद आजूबाजूच्या पहाडांतून उठतात न उठतात तोंच लांब तिकडे मागोरीवर गोळीबार झाला. कडाड् कड् असे लागोपाठ दोन आवाज झाले. बाळाजी नि विष्णू दोघेहि बसल्या जागींच स्तब्ध राहिले....'डुक्कर' रानकाळ्यांना हुलकावणी देऊन पिछाडीस पळाला होता. नि तिकडेच त्याच्यावर दोन आवाज झाले होते. त्या आवाजानंतर सगळीकडे एकाएकी शांत झालें... रानकाढेहि कसली तरी चाहूल घेऊं लागले. दोन आवाज झाले, पण जनावर पडलें कीं नाहीं? कांहीं अदाज येत नव्हता. तोंच, सगळी हालचाल सूक्ष्म दृष्टीनें टेहळीत असलेला टेहेळ्या झाडावरून पुन्हां ओरडला—"डुक्कर जखमी होवून पुन्नां पाठी फिरलो...."फुली" वर येताहा...बाळाजी खोत...सावध....तुमच्या अंगावर येताहा—"

समोरच्या झाडींत कसली तरी खसखस झाली. कुणी जनावर धांवत येत आहे याचा सराव ऐकूं आला...दोन्ही बंदुका पुन्हां तोलल्या गेल्या... नि मग एक भलीमोठी 'कोळट' (डुकराची मादी....देशावर हिला 'डाडर' म्हणतात.) धांपा टाकीत धांवत येत असलेली दोघांनींहि पाहिली...ती डुकरीण धांवत धांवत आली नि दोन्ही बरकंदाजांच्या समोरच पन्नास यार्डांवर सरळ उभी राहिली... मागें वळून कुणाची तरी चाहूल घेऊं लागली. तिचें पोट खपाटीला गेलेलें दिसत होतें नि अंगावरील केंस झडल्यामुळें अंग तांबूस-पांढरें दिसत होतें. हाडें बाहेर पडलेली ती मादी, आपल्या कुटुंबाची फासळाफासळ होतांच जिवाच्या आशेनें पुढें पळाली...पण तिचीं वीत वीत उंचीचीं तान्हीं पिल्लें मात्र तिच्याबरोबर धांवूं शकलीं नव्हतीं... दोन-तीन मिनिटांतच सुमारें सात-आठ पिल्लें एकमेकांच्या पायांत पाय गुंतवीत, धडपडत, कोलमडत, तिथें येऊन दाखल झालीं; नि मग त्या आपल्या पिलावळीला घेऊन ती डुकरीण सुखानें आपला पुढील मार्ग आक्रमूं लागली. तिचा नर मात्र मागें कुणाच्या तरी गोळीच्या

तडाख्यांत सांपडला होता.... नि त्याच्यासाठींच बाळाजी नि विष्णू दोघेहि बंदुका सरसावून बसले होते. ह्या मादीकडे त्यांनीं दुर्लक्ष केलें. मादीलाहि त्यांच्या अस्तित्वाची चाहूल लागली नाहीं...

पुन्हां टेहेळ्या ओरडला—" खोतानूं, जनावर भक्कम हा...तुमच्या अंगावर येताहा....सोडूं नुको—"

एवढें कानांवर येतें न येतें तोंच, एखाद्या शिसवी लांकडाचा ओंडका गडगडत यावा तसा तो माजलेला काळाकभिन्न रानडुक्कर आपले पिवळट सफेत सुळे परजीत समोरच्या झाडींतून धांवत बाहेर पडला. इकडे तिकडे न बघतां तो सुसाट पुढें पळत होता. पण त्याला वेगानें पळतां येत नव्हतें. मागोरीवर झालेल्या गोळीबारानें त्याचा पुढचा एक पाय तुटला होता. नि त्यामुळेंच तो हतबल होऊन पुन्हां पुन्हां थांबत होता...दम खाऊन पुन्हां पळत होता. बाळाजीनें त्याला पाहतांक्षणीं बंदूक रोखली नि त्याच्या धडाचा वेध घेऊन चाप ओढला...पाठोपाठ विष्णूच्या बंदुकींतीलहि काडतूस फुटलें नि त्यासरशीं तो मत्त वराह पालथा झाला. त्यानें एकवार आपले सुळे मातींत आवेशानें घुसवले. भुईशीं निकरानें, मुसंडी मारल्यासारख्या झट्या घेतल्या नि प्राण जातां जातां एकवार भेसूर चीत्कार करून तो गार झाला. त्याच्या मानेवरचे रांठ केंस एकदम मलूल झाले...

रक्ताच्या थारोळ्यांत तो रानडुक्कर खालीं कोसळलेला पाहतांच बाळाजी नि विष्णू दोघेहि पुढें धांवले नि रामेश्वराचें नांव घेऊन दोघांनींहि जयजयकार केला..." हरहर महादेव—"

ऐनावरील टेहेळ्यानें सगळ्यांना ओरडून सांगितलें—" डुक्कर पडलो... काम फत्ते—"

अर्ध्या तासाच्या आंत सगळे रानकाढे नि बरकंदाज एकत्र जमले. 'रामेश्वरानें' वचन दिल्याप्रमाणें आपला शब्द पाळला होता...'पारध' यशस्वी केली होती. साऱ्यांनीं रामेश्वराचा जयजयकार केला...ताबडतोब एकदोघांनीं शेजारचीं चार बळकट शेलाटीं झाडें तोडलीं...कांहीं मजबूत रानवेली कापून आणल्या....नि तें रानडुकराचें प्रचंड धूड वाश्याला उलटें बांधून आठ जणांनीं खांद्यावर घेतलें नि करकर वाजणाऱ्या त्या नुकत्या तोडलेल्या वाश्यांवरून तें सावज त्यांनीं तळावर आणलें.

लागलीच महार तांतडीनें गांवीं रवाना झाला. गांवीं पोंचतांच तो चव्हाट्यावर उभा राहून ढोल वाजवणार होता....असा खुणेचा ढोल वाजला म्हणजे ‘ पारध ’ यशस्वी झाली हें उभ्या गांवाला समजणार होतें...घरोघरचीं माणसें ‘ सावज ’ बघण्यासाठीं चव्हाट्यावर जमणार होतीं...मग चार दोन तासांत ढोल-ताश्यांच्या कडकडाटांत नि ‘ हरहर-महादेवा ’च्या गर्जनेंत मारलेलें ‘ सावज ’ चव्हाट्यावर येऊन पोंचणार होतें. त्या मृतपशूला देवाचा ‘ प्रसाद ’ समजून सगळेजण भाविकपणें नमस्कार करणार होते. त्याला चाफ्याच्या फुलांच्या माळा घालणार होते. बायका औषधासाठीं त्याच्या अंगावरचे केंस ओरबाडून घेणार होत्या——

मग एका बाजूला उभा गांव एकत्र होऊन त्या रानडुकराच्या सागोतीच्या वांटण्या करणार होता. नि गांवकऱ्यांच्या बायका घरोघर ‘ देवाचा प्रसाद ’ रांधण्यासाठीं ताजा तयार मसाला करण्यांत मग्न राहणार होत्या....

( प्रस्तुत लेखकाचें दक्षिण कोंकणांतील ‘ करूळ ’ हें खेडें अद्याप ह्या ‘ पारधी ’ पार पाडीत आहे. अशा एका पारधीचें वर्णन म्हणजेच ही शिकार कथा....)

◎ ◎ ◎

## १७ : मत्स्यवेध

बारा वाजतात. ऊन रणरणूं लागतें. आरशासारख्या लखलखीत आभाळांत क्वचित् एखादी घार तरंगत असते. बाकी आकाशाखालचा जंगलप्रदेश अगदीं निवांत असतो. सकाळपासून सळसळणारीं वेळूचीं बनें आतां शांत झालेलीं असतात. वाळलेल्या कळकांचा वाऱ्याबरोबर होणारा कुई कुई आवाज आतां थांबलेला असतो. सागवानाचें वाळलेलें पण वजनदार पान खालीं पडत नसतें, नि त्याचाहि आवाज होत नसतो. बाकीचीं जांभळी, किंजळी नि ऐन यांचीं झाडें पुतळ्यासारखीं स्तब्ध असतात. सबंध जंगलावर कुणीतरी भूल टाकावी तसें तें चिडीचीप झालेलें असतें. ससा पळत नसतो, भेकर उंडारत नसतें,...फार काय, झाडांझाडांवरून शेपटा फुलारून उगीच धांवणारी खारसुद्धां कुठें दडून बसलेली असते कुणास ठाऊक...

गडनदीच्या पात्राला मात्र अशी शांतता ठाऊक नसते. तसें पाहिलें तर नदीचें पात्र पावसाळ्याचे दिवस सोडले तर एरवीं शांतच असायला हवें. पण नाहीं. गडनदीच्या पात्राला या फाल्गुन महिन्यांत दुपारच्या वेळीं शांतता कसली तें, या पात्रांत पाणी वाहूं लागल्यापासून ठाऊक नसतें. मग काय या पात्रांत गांवचीं पोरें येऊन डुंबत असतात? कीं गाई-म्हशी धुवायला आणून गुराख्यांनीं हैदोस मांडलेला असतो? छेः छेः तसें कांहीं घडत नसतें. नदी गांवापासून इतकी दूर आहे कीं या ठिकाणीं हैदोस माजवायला गांवचे बाप्येहि बाहेर पडून येणार नाहींत, तिथें पोरट्यांचें काय? तर मग गडनदीच्या या पात्रांत एवढी कसली खळबळ माजून राहते?

ही खळबळ असते माशांची ! जांघेएवढे मोठे काळसर तांबूस रंगाचे मरळ जातीचे असंख्य मासे गडनदीच्या ह्या पात्रांत या दिवसांत, भर दुपारची प्रचंड खळबळ माजवून सोडतात. दिवस वर येऊं लागला नि हवा तापूं लागली म्हणजे डोहाच्या खबदाडींतून, फटीफटींतून एवढा वेळ-पर्यंत निवांत राहिलेले हे मासे एकामागून एक हळूहळू बाहेर पडूं लागतात. आपले रुंद कल्ले हलवीत, शेपटीची हालचाल करीत, संथपणें हे मासे डोहाच्या तळाकडून पृष्ठभागावर येऊं लागतात. कधीं सरळ उभ्या गतीनें, कधीं हलके हलके इकडे तिकडे फिरत, कांठाकडील उथळ पाण्याचा कानोसा घेत, कधीं दुसऱ्या माशाला ढुश्या मारीत एकेक मासा वर येऊं लागतो...

हे महाकाय मत्स्यराज डोहांत जागे झाले म्हणजे डोहांतील आधींच्या बारीक सारीक मासळींत हलकल्लोळ माजतो. खरचे, खवले, मळवे, शेंगट्या, ठिगूर असल्या जातीची बारीक मासळी तोंपर्यंत डोहांत इतस्ततः स्वच्छंद हिंडत फिरत असते...पण त्यांचे भाईबंद हे राक्षस जागे होतांच ती बिचारी बापुडवाणी होऊन कुठल्याकुठें लांब पळून जाते; किंवा जवळपास गुपचूप राहून त्यांना आपला उपसर्ग होणार नाहीं याची दक्षता घेत भिऊन वेळ काढते.

प्रथम एक मासा एकटाच वर येतो. दबकत, चाहूल घेत, हळूहळू तो तळापासून पृष्ठभागापर्यंत येतो नि कसला धोका नाहीं याची खात्री पटतांच, संथ उभा राहतो. थोडा वेळ जाऊं देऊन मग तो आणखी वरती येतो... जवळ जवळ पाण्याच्या पृष्ठभागाला भिडतो. पाण्यांत परावर्तित झालेल्या सूर्यकिरणांत त्याचा तांबडा-काळा रंग पिंपळाच्या पालवीसारखा चकचकीत दिसतो. तिथें तो सरळ उभ्या रेषेंत स्थिर होतो. कल्ल्यांची तेवढी किंचित् हालचाल करीत तो क्षणकाल स्तब्ध राहतो नि अलदपणें एक बुडबुडा सोडतो. सोनेरी रंगाचा तो सुपारीएवढा बुडबुडा पृष्ठभागावर येतो नि पुटकन् फुटतो. मग त्याच्या मागोमाग दुसरा बुडबुडा येतो...लागोपाठ बुडबुड्यांची मालिका सुरू होते. तो मासा क्षणार्ध पाण्याच्या पृष्ठभागाल तोंड भिडवतो; पुन्हां किंचित् खालीं जातो नि तिथून असे बुडबुडे सोडीत राहतो. पुन्हां पुन्हां तो असा वरती येत असतो, हवा खात असतो नि

खालीं जाऊन पुन्हां असे बुड्‌बुडे सोडीत राहतो...मग त्याच्या मागोमाग त्याचे इतर भाईबंद एकामागून एक असे अवतीर्ण होऊं लागतात. हां हां म्हणतां सारा डोह मरळ जातीच्या त्या प्रचंड माशांनीं गजबजून जातो... बराच वेळ स्तब्धतापूर्वक हवा खाऊन झाल्यावर मग त्यांना मस्ती सुचते. इतका वेळ स्थिर असलेला एखादा मासा मग हलकेंच चाळवचाळव करतो नि शेजारच्या दुसऱ्या माशाला उगीच ढुशी देतो. तो मग तिसऱ्याला ढुशी देतो नि मग असा शिवाशिवीचा खेळ सुरू होतो. अगदीं पृष्ठभागावरच हा खेळ चालत असल्यामुळें, डोहांत खळबळ माजते. पाणी चाळवतें. डोहावर लाटा उठतात. डुबुक् डुबुक् असा आवाज येऊं लागतो. मध्येंच एखाद्या माशाला लहर येते नि पोहतां पोहतां तो एकदम सुरकांडी घेतो नि डोहाबाहेर उडी घेऊन पांच-दहा पावलांवर पुन्हां डोहांत नाहींसा होतो. त्याचें अनुकरण आणखीहि त्याचे कांहीं दोस्त करतात. रणरणत्या उन्हानें तापलेल्या डोहांत त्या माशांनीं अशी गजबज उडवून दिलेली असते.

बाकी रान सारें शांत असतें. पक्षी पानांपानांतून गारव्याला विसावलेले असतात. जनावरें जाळींतून—गुहांतून निजलेली असतात. फक्त गडनदीच्या ह्या डोहांत तेवढा जिवंतपणा भरून राहिलेला असतो.

◆ ◆ ◆

तो जिवंतपणाच केवळ डोळ्यांत सांठवून घेण्यासाठीं टपून बसलेला एक इसम, डोहाच्या कांठावरील झुडुपाच्या आडोशापलीकडून हळूंच उठतो, नि झपाझप पावलें टाकीत गांवाच्या दिशेनें चालूं लागतो. त्याला हवें तें सांपडलेलें असतें. ज्याचा माग काढण्यासाठीं तो तिथें सकाळपासून तिष्ठत बसलेला असतो, तें त्यानें पाहिलेलें असतें. मनांतला आनंद चेहऱ्यावर न दाखवतां तो झपाट्यानें चाललेला असतो...तासाभरांत तो गांवांत येतो. इनामदाराच्या वाड्यांत मंडळी जेवून खाऊन नुक्ती कुठें लवंडलेली असते. इनामदार आणि त्यांचे जिल्ह्याच्या ठिकाणाहून मुद्दाम शिकारी-साठीं आलेले दोस्त, या माणसाची वाट पहात सोप्यावर पत्त्यांचा डाव मांडून बसलेले असतात.

“ राम राम मालक—”

दोघेहि हातांतले पत्ते टाकून पाहतात. ज्याची वाट ते बघत असतात तो येऊन दाखल झालेला असतो.

" काय रे, आहे का कांहीं चाहूल ? "

" मालक, लवकर आटपा, इतका म्हामूर मासा आलाय डोहांत कीं, तुम्ही माराल तेवढा थोडा...काडतुसं कमी पडतील तुमची—पन मासं कमी हुयाचं न्हाईत...चला बिगीबिगी. लई रंगांत आलंत् गडी—"

इनामदार नि त्यांचे मित्र ताडकन् उठतात; खुंटीवरच्या बंदुका खालीं घेतात. कपाटांतून काडतुसांचे पट्टे बाहेर निघतात. बुलेट्सची नि छर्‍यांचीं काडतुसें घाईघाईनें पट्ट्यांत अडकवून ते दोघेहि बाहेर पडतात.

त्या माणसाला त्यांच्याबरोबर भर उन्हांतून पुन्हां तीच वाट परत चालावी लागते. डोहापासून अर्ध्या फर्लांगावर येतांच, तो त्या दोघांनाहि खुणेनें जागा दाखवतो. तो जिथें मघाशीं बसला होता ती....ते त्याच्या कानांत कुजबुजतात, तशी तो मान हलवतो. नि मग ते तिघेहि हलके हलके पावलें टाकीत, खुट्सुद्धां आवाज होणार नाहीं, याची दक्षता घेत डोहाचा कांठ जवळ करूं लागतात....कांठावर येतांच दोघेहि बरकंदाज माना मुडपून खालीं बसतात. बंदुका सावरतात. त्या दोघांच्या पाठोपाठ तो तिसरा इसम तसाच दबून बसतो. एव्हांना त्यानें अंगावरचे कपडे उतरून ठेवलेले असतात. त्याच्या अंगावर एक लंगोट तेवढा राहिलेला असतो.

थोडें थोडें अंतर एकमेकांमध्यें ठेवून झुडपांच्या आडोशानें दोघेहि बरकंदाज नीट सांवरून बसलेले असतात. दोन पोलादी नळ्या अधोमुख होऊन उन्हांत चकचकत राहतात. आग ओकण्यासाठीं आतुर होतात. त्या नळ्यांच्या चापावरचीं बोटें हुळहुळत असतात. नि त्या बोटांच्या मालकांच्या तीक्ष्ण नजरा पाण्यांत वेध घेत असतात.

पूर्वीचाच खेळ पाण्यांत चाललेला असतो. एकहि मासा एका जागीं स्थिर नसतो. सारखी हलवाहलव, पळापळ चाललेली असते. निर्धास्तपणें ते गरीब जीव क्रीडा करीत असतात. आपल्या जिवावर दोन पोलादी नळ्या टपलेल्या आहेत...मोका मिळतांच त्या कडाडणार आहेत नि आपल्यापैकीं कांहींजणांना ह्या डोहाला, ह्या स्वच्छंद क्रीडेला कायमचें

मुकावें लागणार आहे याची कल्पना त्या निर्भर मत्स्यांना काडीमात्र नसते. मरणाचें ओझें पाठीवर घेऊन ते खेळत असतात.

दोन नळ्यांमागचे चार डोळे अद्याप वेध घेतच असतात. क्षणार्ध संधि मिळते असें वाटतांच बंदूक किंचित् कलती होते...चापावरचें बोट स्थिर होतें...पण तेवढ्यांत 'लक्ष्य' हुकतें. इकडचें तिकडे होतें नि चापावरच्या बोटांचा मालक चरफडतो...पुन्हां नजर वेध घेऊं लागते. पुन्हां तीच एकाग्रता....तीच धडपड, तीच उत्सुकता...नि पुन्हां तीच निराशा....

कितीतरी वेळ फुकट जातो. दोन्ही नळ्यांपैकीं एकीलाहि गरम होण्याची संधि लाभत नाहीं. दोन्ही बरकंदाज अधीर होतात. अस्वस्थ होतात. शिकार समोर दिसत असते. पण तिचें संधान साधत नसतें. ही नेहमीं-सारखी जमिनीवरची शिकार नसते. जमिनीवरील जनावराचा कसाहि वेध घेतला तरी गोळी हमखास लागते...चुकली तर पुन्हां दुसरी झाडतां येते...तसा प्रकार इथें नसतो. ही पाण्यांतील शिकार असते. हिचीं तंत्रें वेगळीं, हिचे बारकावे वेगळे; आणि म्हणून हिची गंमत वेगळी. इथें 'लक्ष्य' नजरेंत नीट पकडल्याशिवाय चाप ओढतां येत नाहीं. हलत्या लक्ष्यावर इथें गोळी चालवून धोका पत्करायला कुणी तयार नसतो. गोळी चुकली की सारा खटाटोप फुकट गेला. सगळे मासे त्या आवाजानें भयभीत होऊन डोहाच्या तळाला भिडले म्हणजे मग दुसऱ्या दिवसाशिवाय पुन्हां यायला नको. त्यामुळें, इथें शिकार साधावी लागते ती एकाच क्षणांत...एकाच गोळींत. एकदां संधि हुकली म्हणजे पुन्हां दुसरी मिळत नाहीं.

वेळ भराभर संपतो आहे. आस्ते आस्ते माशांची हालचाल कमी होते आहे. एकेक मासा हळूहळू नाहींसा होतो आहे. क्रीडा संपवून पोटा-पाण्याच्या उद्योगाला लागण्यासाठीं एकेक मासा इथून तळाशीं जातो आहे...हें सारें कांठावर टपून बसलेल्या बरकंदाजांच्या ध्यानांत येतें आहे, नि ते कमालीचे अस्वस्थ होत आहेत....अजून कशी शिस्त लागत नाहीं? अजून कसा मोका मिळत नाहीं? मनांतल्या मनांत दोघेहि तीळतीळ तुटत आहेत...स्वतःवर आणि समोर दिसणाऱ्या पण स्थिर न राहणाऱ्या माशांवर चडफडताहेत, चिडताहेत.

पण तरीहि नशीब शिकंदर असतें. अलिकडच्या बरकंदाजाला मोका मिळतो. त्यानें ज्या माशाचा वेध घेतलेला असतो, तो मासा आतां निश्चल राहिलेला असतो. आतां अधिक वेळ गमावतां उपयोगी नाहीं, हें ओळखून नळी किंचित् खालीं झुकते. डावा डोळा मिटला जातो. नळीच्या टोंकावरील माशी नि पाण्यांतील मासा हे दोन बिंदु एकत्र वेधले जातात. नि......बार फुकट जाणार नाहीं याची खात्री होतांच चापावरचें बोट ओढलें जातें.—

कडाऽऽड...ऱ्यांऽऽऽ—

इतका वेळ चेंबरमध्यें जणूं धुसमत असलेलें काडतूस अखेरीस फुटतें. आजूबाजूच्या शांत वातावरणांत पडसाद उठतात. कावळे एकदम हांकाटी करतात नि लगेच गप्प होतात....गोळी पाण्याला भिडतांच पाणी किंचित् वर उडतें....डोहांत क्षणभर खळबळाट होतो नि मग डोह एकाएकी शांत होतो....पण मिनिटभरच...बंदुकीच्या आवाजासरशीं, आपल्या तीक्ष्ण नजरेनें मार लागलेल्या माशाचा माग घेत असलेला तो तिसरा माणूस धाड्दिशीं डोहांत उडी ठोकतो...त्याच्या डोकीचे केंस एकवार पाण्यांतून दिसतात नि लागलीच तो डोहातळीं अदृश्य होतो...कुठें तरी अज्ञात दिशेनें पोहत सुटतो—श्वास रोखून राहिलेल्या दोन्ही बरकंदाजांची नजर साऱ्या डोहावर भिरभिरत असते. तो कुठल्या ठिकाणाहून वर येतो तें शोधीत असते.

नि त्यानें पाण्यांत जखमी झालेल्या माशाचा अचूक माग काढलेला असतो. मर्मस्थळीं गोळी खाल्लेला तो मासा झांज येऊन डोहांतच एके ठिकाणीं थरथरत उभा राहिलेला असतो. त्याच्या मस्तकाच्या चिंध्या झालेल्या असतात. लाल लाल रक्तानें आजूबाजूचें पाणी गढूळ होत असतें, नि पाण्यांत जन्मलेला तो मासा पाण्यांतच मरण भोगीत असतो. पाणी त्याच्या नाकातोंडांत घुसलेलें असतें...नि आतां पांच-सात मिनिटांतच तो उलटा होऊन वर तरंगत येणार असतो....त्याचा पांढरा पोटवळ मग पृष्ठभागावर दिसेल नि कुणाची नजर लवकर गेली नाहीं तर त्याचेच भाईबंद त्याला टोंचून-बोचून, लचके तोडून खाऊन टाकतील...

पण पाण्यांत बुडालेल्या त्या माणसाला तसें व्हायला नको असतें. माशाचा माग लागला एवढें कळून येतांत तो दम खाण्यासाठीं एकवार वरती येतो. कांठावरील बरकंदाज़ांना हात वर करून खूण करतो नि क्षणांत पुन्हां बुडी मारतो.. या वेळेस तो तीरासारखा पोहत त्या माशाच्या अंगाशीं भिडतो. त्याच्या अजून उष्ण असलेल्या बुळबुळीत शरीराला डाव्या हाताचा घट्ट विळखा घालतो. त्यासरशीं तो बळकट मासा एकवार जोराची धडपड करतो. श्लेष्मल कातडीमुळें तो त्या जोरासरशीं, विळख्यांतून निसटतो नि उलटापालटा होत जरा दूर उभा राहतो. पुन्हां तो माणूस दम घेण्यासाठीं वरती येतो. त्याच्या कुशीला नि हाताला त्या माशाचे खवले चिकटलेले असतात. त्याच्या शरीरावर असलेला द्रवपदार्थ चिकटलेला असतो. पुन्हां तो माणूस जिद्दीनें बुडतो. आतां त्याला माशाचा नेमका अंदाज आलेला असतो. ताबडतोब तो माशाला पुन्हां विळखा घालतो नि माशानें कितीहि धडपड केली तरी आतां तो त्याला सोडीत नाहीं. त्याच्या बळकट मिठींत, आधींच अर्धमेला झालेल्या त्या माशाचें कांहीं चालत नाहीं...मोठ्या कष्टानें तो माणूस पायांनीं पाणी खालीं लोटतो नि मग एका उसळीसरशीं वर येतो. काखेंत मासा गच्च पकडून तो पोहूं लागतो नि हां हां म्हणतां कांठ गांठतो—

पाण्यांत उभा निथळत तो कांठाला पाय लावतो नि तें माशाचें धूड त्याच्या खाकेंतून खालीं कोसळतें. मातीवर पडतांच तो मासा एकवार तडफडाट करतो....त्याचे कल्ले जोरजोरानें हलतात. छाती भात्यागत फुगते नि त्याचें शरीर हलके हलके गार पडूं लागतें.

कुशीला लागलेलें रक्त हातानें निपटून टाकीत तो माणूस हाशहुश करीत म्हणतो—“ लई दमवलं मुक्काळीच्यानं...आतां तडफड म्हणावं भुईवर—”

ते दोघेहि बरकंदाज आनंदानें उड्या मारीत जवळ येतात. त्यांतील एकजण त्या माशाच्या शेपटीला दोन्ही हातांनीं पकडून तें धूड तोलीत म्हणतो—“ मोअर दॅन फिफ्टीन पौंडस्—”

त्याच्या जोडीदाराला तें खरें वाटत नाहीं. मग तो आपल्या हातांनीं अदमास घेतो नि मान हलवीत म्हणतो—“ ओ ऽऽ इट्स मोअर दॅन दॅट—”

◆ ◆ ◆

पांच वाजत येतात. ऊन कोंवळें होऊं लागतें. आरशासारख्या लख्ख आभाळांत चुकार ढग जमतात. नि आकाशाखालचा जंगलाचा परिसर पुन्हां जिवंत होतो. वेळूंचीं बनें सळसळूं लागतात. सागवानाचीं पानें गळूं लागतात. सायंकाळच्या वाऱ्यावर झाडें-वेलीं हलूं डोलूं लागतात. खारी शेपटा फुलारून उड्या मारूं लागतात...

नि दुपारपासून जत्रेसारखा गजबजणारा गडनदीचा डोह आतां शांत झालेला असतो. इतका शांत, कीं, कुणाला वाटावें, या डोहांत मासळी आहे कीं, नाहीं ?—

◎ ◎ ◎

## ८ : कुर्रर् कुर्रर् घुम्....

भाद्रपद महिना सुरू होतो. पावसाची रिपरिप थोडकी कमी होते. मळ्यामळ्यांतून हळवीं भातें पिकूं लागतात. पावसाच्या सरी चुकवून भाताची कापणी करतांना कुळवाड्यांची धांदल उडूं लागते. महान् भातांतून आतां दूध भरूं लागतें. दाणा टचटचींत होऊं लागतो. गणपतीच्या अकरा दिवसांत सारीं पावसाळीं पिकें जोमाला येतात. नाचणा पोटरीला येतो. वरीचा गोंडा फुटूं लागतो. रानोमाळ पसरलेल्या कुर्डूचा शुभ्र रंग बदलून ती नव्या नवरीगत कंच गुलाबी दिसूं लागते. तिळाच्या वाफ्यांत चुकार पिवळीं फुलें हसूं लागतात.

सगळीकडची सृष्टि असा रंग पालटूं लागते आणि एके दिवशीं सकाळींच सालाबादप्रमाणें फांसेपारध्यांचें लमाण गांवांत येऊन उतरतें. तळ्याजवळच्या ब्राह्मणाच्या देवळांत ते आपला मुक्काम ठोकतात. या फांसेपारध्यांत एकहि स्त्री नसते. असतात ते सारे बाप्येच. प्रत्येकाच्या खांद्यावर एक लांब काठी. ह्या काठीच्या टोंकाला एक पेरूच्या आकाराचा, बुरुडांनीं विणलेला बांबूचा उभट करंडा बांधलेला नि त्या बंद करंड्यावर एक मुठीएवढें गोजिरवाणें पांखरूं बसलेलें ! कसलें असतें तें पाखरूं ? पोपट ? साळूंकी ? दयाळ ?.... पावशा ?...छे. तो असतो कोंकण प्रांतांतल्या पाखरांचा राजा ‘ कवडा ’ ! बारीक नि लवचिक मानेचा, चमकदार लालबुंद डोळे नि नाजुक लालबुंद पाय असलेला. राखी रंगाच्या मऊ पिसांची अंगभर नक्षी असलेला; चपळ पंखांचा नि कंठांत अति करुण स्वर असलेला ‘ कवडा ’ !...

कुर्रर् कुर्रर् घुम्...

कुद्दर्र् कुद्दर्र् घुम्....

आलेले फांसेपारधी आपला संसार देवळाच्या ओवरींत मांडतात. त्यांच्यापैकीं एकजण चूल सांभाळण्यासाठीं मागें राहतो नि बाकीचे खांद्यावर आपापले करंडे घेऊन बाहेर पडतात. त्यांतील प्रत्येकाची दिशा ठरलेली असते. एकजण जाईल त्या बाजूला दुसरा जाणार नसतो. सगळ्यांनीं गांवच्या भातशेतीच्या नाना वाटा पकडलेल्या असतात. त्यांतील एखादा राईजवळच्या भातशेतींत जातो...तर दुसरा लांब कुठें तरी नदीकांठच्या शेतींत जातो. जिथें जिथें भातशेती पिकूं लागली आहे, तिथें तिथें हे फांसेपारधी नेमके जातात. कंबरेच्या कोयत्यानें एखाद्या झाडाच्या चार डहाळ्या तोडून त्या शेतांत, हळवी कापणी केलेल्या मोकळ्या जागीं मध्येंच रोवून त्याचा आडोसा करतात. त्या आडोशांत आपण बसण्यापूर्वीं तो करंडा दूर नेऊन ठेवतात...घोड्याच्या केसांनीं विणलेलें तें बळकट जाळें, करंडा नि आपण छपून बसणार असलेला आडोसा; यांमध्यें व्यवस्थित पसरतात नि मग हलकेच येऊन आडोशांत लपून बसतात...

थोडा वेळ असाच जातो नि मग करंड्यावर बसलेला तो कवडा प्रथम क्षीण स्वरांत घुमूं लागतो..."कुद्दर्र घुम्....कुद्दर्र घुम्...या रे या, जवळपासच्या झाडामाडांतून बसलेल्या माझ्या भाईबंदांनो, या...मी तुम्हांला साद घालतों आहे! कुद्दर्र् कुद्दर्र् घुम...कुद्दर्र् घुम—"

सुरुवातीला हळूहळू ओरडत असलेला तो कवडा थोड्या वेळांत मग तालांत येतो नि एखाद्या माजाला आलेल्या पारव्यासारखा जोरजोरांत घुमूं लागतो. आपल्या विशिष्ट ओरडण्यानें आसमंतांत असलेल्या यच्चयावत् कवड्यांचें लक्ष आपणांकडे वेधून घेतो नि मग एकेक कवडा शेजारपाजारच्या झाडांवरून, पंख उभारून त्याच्या दिशेनें बेबंद झेंप घेतो...त्याच्या माथ्यावर दोनचार घिरट्या संशयानें घेतो नि मग संशय फिटल्यासारखा एकाएकीं भर्रदिशीं खालीं उतरतो...त्या करंड्यावर बसून ओरडत असलेल्या कवड्याशेजारीं ऐटबाज बैठक घेतो नि एवढें होतांच पलीकडे आडोशांत लपलेला फांसेपारधी हातांतल्या दोरीचें टोंक हळूच खेंचून घेतो...बस्स. त्या देखण्या पांखराचे गोजिरवाणे पाय कायमचे बद्ध होतात. त्याचे अंतराळांत झेंपावणारे पंख जागच्याजागींच फडफडतात नि क्षणापूर्वीं दिमाखदार

दिसणारें तें पांखरू एकाएकीं दीनवाणें होऊन जातें...जणूं पुढचें सारें भविष्य ओळखून मलूल होऊन जातें.

असे आणखी एकदोन कवडे येऊन तिथें बसतांच, त्या करंड्यावर बसलेल्या कवड्याला जणूं चेव येतो....नि तो घुमायचें सोडून नुसता आक्रोश करूं लागतो....छाती फुगवून बसल्या जागींच इकडे तिकडे तोंड फिरवीत नाचूं लागतो...म्हणूं लागतो—"ऊठ ग सीते...कवडा पोर पोर पोर...ऊठ ग सीते—कवडा पोर पोर....कुट्टर्र् कुट्टर्र्....घुम्.... कुट्टर्र् घुम्—"

मग चेव आल्यासारखे आणखी कितीतरी कवडे तेथें येऊन उतरूं लागतात. एका मागोमाग एक...जवळपासच्या चिंचेवर, आंब्यावर, चिवारीवर, ऐनावर बसलेले कवडे जणुं भूल पडल्यासारखे बसल्या झाडावरून फडफडत उडूं लागतात नि त्या आक्रोशाला बळी पडून, पटापट येऊन त्या जाळ्यावर झेंप घेऊं लागतात. खालीं बसतांक्षणींच त्यांच्या पायांना हिसका बसूं लागतो...

संध्याकाळ होते. आडोशांत लपून बसलेला फांसेपारधी समाधानानें बाहेर पडतो. इतका वेळ निश्चळ बसून बसून त्याच्या हातापायांना रग लागते. विडी-काडीहि त्याला ओढतां आलेली नसते. बाहेर पडतांच तो एक झकासपैकीं आळस देतो. उभा राहून उघडी पाठ खराखरा खाजवतो. हाताचीं बोटें कडकडां मोडतो....थोडा ताजातवाना होतो नि आरामशीरपणें विडी शिलगावतो. झुरके घेतां घेतां एकूण किती पांखरें जाळ्यांत अडकलीं, त्याचा अंदाज घेतो... रुपयाला जोडी या दरानें विक्री केली तरी निदान किती रुपये कनवटीला लागतील याचा बोटें मोजून नीट हिशेब करतो नि मग सावकाशपणें, पायाखालीं दाबून धरलेली जाळ्याची दोरी ओढायला सुरुवात करतो. भिऊन नि भेदरून गेलेले ते पक्षी पायांना जोराचा हिसका बसतांच थोडा वेळ फडफडाट करतात...तसें करतांना ते एकमेकांच्या अंगावर धडपडतात. रागानें एकमेकांना चोंची मारतात... पण अखेरीस तो कसबी फासेपारधी त्या साऱ्यांना बरोबर गुंडाळतो नि रिकाम्या करंड्यांत बंदिस्त करतो!

...दुपारपासून घुमून घुमून कंठशोष केलेला तो शिकवलेलां पाळीव कवडा आतां दमून निवांत बसलेला असतो; नि जड झालेला तो करंडा खांद्यावरून नेत असतांना फांसेपारध्याच्या हालचालींना एक उन्माद चढतो....

सकाळीं गांवाच्या चार दिशांनीं पारधीसाठीं गेलेले ते सगळे फांसेपारधी मग कातरवेळेस गांवांत यशवंत मेस्त्रीच्या हॉटेलासमोर एकत्र होतात. कवडे विकणारे फांसेपारधी गांवांत आलेले आहेत, ही बातमी एव्हांना गांवांत सगळीकडे पसरलेली असते. रुचकर मांस जिभेला लावण्यासाठीं सतत धडपडणारी गांवकरी मंडळी फांसेपारध्यांच्याभोंवतीं कोंडाळें करून जमा होते नि कवड्यांच्या दरदामाची घासाघीस सुरू होते.

बंदूक खांद्यावर टाकून आणि चार नि सहा नंबरचीं छर्र्यांचीं काडतुसें पट्ट्याला बांधून, सकाळीं मीहि कवड्यांच्या शिकारीला बाहेर पडलेला असतों. हा हंगामच कवड्यांच्या शिकारीचा. पांखराच्या जातींत मटन खावें तर कवड्याचेंच. जसें पाखरूं दिसण्यांत शोभिवंत तसें चवीलाहि टेसदार !...कवडा नेमका हेरतां यावा नि तो रेंजच्या टप्प्यांत येतांच फटकवावा; यासाठीं मीहि दिवसभर वणवण केलेली असते. पण उभ्या दिवसांत तें चपळ पांखरू माझ्या वासवाऱ्यालाहि उभें राहिलेलें नसतें. पट्ट्याला अडकवलेलीं काडतुसें जशींच्या तशींच शाबूत राहिलेलीं असतात. नि मी रिकाम्या हातानें, यशवंत मिस्त्रीच्या हॉटेलासमोरून घरीं परतत असतों—

हॉटेलांत बसलेला कुणीतरी मला कुत्सितपणें विचारतो, "काय वो बरकंदाजानूं ! किती कवडे मारलास ?"

मी विषण्णपणें हंसतों नि उत्तर देतों—"अरे, कधीं शिकार तर कधीं भिकार ! चालायचेंच—– "

चांदीचा रुपया मोजून विकत घेतलेली कवड्यांची जोडी हातांत फडफडावीत तो पुढें म्हणतो—"नायतर ह्या फांसेपारध्याकडे बघा ! भिकार कधीं नायच ? रोज आपली शिकारच..."

पायांची चाळण होईपर्यंत वणवण करून मी एकसुद्धां पक्षी मारूं शकलेला नसतों; पण ह्या ऐदी फांसेपारध्यांनीं मात्र एका जागीं बसून

पंचवीस पक्षी गोळा केलेले असतात, या गोष्टीचें मला भारी वैषम्य वाटतें. मनुष्यस्वभावानुसार मला त्या फांसेपारध्यांचा नि त्यांच्या त्या शिकवलेल्या कवड्याचा विलक्षण राग येतो नि मग एक चमत्कारिक विचार माझ्या मनांत डोकावून जातो.... एक छऱ्यांचें काडतूस बंदुकींत भरून, करंड्यावर बसून कुट्टर्‌ घुम्‌ कुट्टर्‌ घुम्‌ करणाऱ्या त्या हरामजाद्या पांखराच्या चिंध्या उडवल्या तर ?

◎ ◎ ◎

# ९ : भैरवगडचा नरभक्षक

फोंडाघाटाच्या दक्षिणेला सह्याद्रीचे जे विस्तीर्ण फांटे मुख्य पर्वतापासून पश्चिम दिशेला फुटले आहेत, त्यांपैकीं एका दुर्गम फांट्यावर शिव-प्रभूंनीं बांधलेला 'भैरवगड' अजून काळाशीं झुंजत उभा आहे. फोंडा-घाटापासून सुमारें पंधरा मैल दक्षिणेला घोटगीचा घाट येतो. या भागांतील गांवांचें देशावरील गांवांशीं दळणवळण या दोन घाटांतून होतें. पैकीं फोंडाघाट रहदारीस उत्तम आहे. मोटारी, ट्रक्स सारीं वहानें या घाटांतून पसार होतात. पण घोटगीच्या घाटाला अजून माणसाचीं पावलें नि बैलांचे खूर याशिवाय तिसरी चाल ठाऊक नाहीं. घोटगीच्या घाटाअलिकडे 'नरडवें' नि त्याच्या अलिकडील एका उत्तुंग पहाडावर 'भैरवगड.' या पुरातन किल्ल्याबद्दल खालच्या तळकोंकणांतील लोकांच्या मनांत अपार श्रद्धा नि अपार भीतीहि पण. श्रद्धा गडावरील नवसाला पावणाऱ्या देवीविषयीं नि भीतीचें कारण म्हणजे भैरवगडावरील भीषण निसर्ग. नि त्या भीषणतेंत जिवंतपणा ठेवून दिवसाउजेडी फिरणारे ढाणे नि बिबटे वाघ ! अख्ख्या सह्याद्रींत, या पहाडांत आढळून घेतात तसे ढाणे वाघ कुठें आढळत नाहींत. भैरवगडावर श्वापदांना रहावयास मोठीं झकास ठिकाणें आहेत. एक तर हा डोंगरी किल्ला शहरवस्तीपासून इतका दूर आहे कीं, कधीं कोणी शिकारी या भागांत आल्याचें कुणाला ठाऊक नाहीं ! नि गडावर जायची वाट इतकी दुर्गम कीं केवळ गडाखालच्या रांजणवाडीचे लोकच तेवढे आजकाल भैरवगडाला पाय लावूं शकतात. इतर ठिकाणच्या इसमाला तें शक्य नाहीं, असा लौकिक. गडावर मनस्वी वाढलेलें अरण्य

नि त्यांत रहिवास करून असलेलीं वाघ, अस्वलें, रानडुकरें नि क्वचित् गवे, यांसारखीं जनावरें.

—पण अशा या बाह्य जगाला अज्ञात असलेल्या नि सह्याद्रीच्या अवघड शिखरावर वसलेल्या या भैरवगडावर, आम्हांला एका ढाण्या वाघानें बोलावून आणलें होतें. हा ढाण्या वाघ अलिकडे मोकाट सुटला होता. पिसाट झाला होता. रांजणवाडी, दिगवळें, नरडवें, घोटगें नि जांभवडे या डोंगरी खेड्यांतून त्यानें हैदोस मांडला होता. कणकवली महालाच्या या भागांत त्यानें कमालीचें भीतीचें वातावरण पसरवलें होतें. प्रथम प्रथम त्यानें धनगरांच्या बकऱ्या मारल्या. मग कुळवाड्यांचीं जनावरें मारलीं नि गेले कांहीं महिने तो दोन हातांच्या नि दोन पायांच्या माणसांवर झडप घेऊं लागला होता! आतांपर्यंत त्यानें चार माणसें नाहींशीं केलीं होतीं नि आतां त्याच्या भीतीनें माणसें घराबाहेर पडेनाशीं झालीं होतीं. उभ्या दशक्रोशींतल्या खेडुतांना त्यानें नुसत्या गोगलगायी बनवून टाकलें होतें.

या भागांतील लोक तसे भित्रे नाहींत. सह्याद्रीच्या छातीवर वावरणारे ते लोक. बिबट्या वाघाला कुऱ्हाडीनें तोडणारे धनगर याच भागांत वस्ती करून राहतात नि आठ-पंधरा दिवसांनीं, सागोतीं खावीशीं वाटली म्हणजे चोरट्या गांवठी बंदुका घेऊन रानडुकरांना घळींतून बाहेर काढून निजविणारे निधडे कुळवाडीहि याच डोंगरी गांवांतून आढळतात. पण या बिलंदर वाघापुढें कोणाचें कांहीं चालत नव्हतें. बरोबरच आहे. वाघ वाघासारखा वागत आहे, तोंपर्यंत त्याचें शत्रुत्व कोणीहि पत्करील. त्याच्याशीं कोणीहि लढाई देईल. पण तो सैतानासारखा वागूं लागला म्हणजे मग माणसाचें कांहीं चालत नाहीं...मग वाघाचा सैतान केव्हां होतो?—हां बरा सवाल विचारलात. वाघाच्या दाढेला जोंवर माणसाचें रक्त लागलें नाहीं तोंवर तो सैतान होत नाहीं. एकदां का त्यानें माणसावर तोंड टाकलें, कीं मग तो वाघ डरत नाहीं—तो सैतान बनतो! या वाघाचें तसें झालें होतें. त्याला माणसें मारायची चटक लागली होती. नि म्हणूनच त्याच्याशीं कोणी मुकाबला करूं शकत नव्हता. तसा आतांपर्यंत त्या भागांतल्या बरकंदाज लोकांनीं आपल्या परीनें त्याला ठोकायचा खूप प्रयत्न केला होता.

पण कोणाचीच गोळी त्यानें अंगाला भिडवून घेतली नव्हती. अडाणी लोक म्हणत होते कीं हा काय 'देवचाराचा' (भुताटकीचा) आहे, म्हणून त्याला बंदुकीची गोळी शिवत नाहीं! तो आतां अशीच लागोपाठ एकवीस माणसें ठार करून खाणार नि मग एके दिवशीं आपोआप नाहींसा होणार! भैरवगडावरील देवीचा हा कोप होता....लोक मनाला येईल तो तर्क करीत...तोंडाला येईल तें बोलत.. संध्याकाळ जवळ आली कीं भीतीनें दारें लावून घरांत बसत...नि दुसरे दिवशीं सकाळीं खूप उशीरा-पर्यंत घराबाहेर पडत नसत....

वाघानें मोठा धुमाकूळ माजवला होता. स्थानिक शिकाऱ्यांचे प्रयत्न हरले होते. वर्तमानपत्रांत बातम्या येत होत्या. सरकारनें या वाघाचा बंदोबस्त करावा, असे अर्ज कलेक्टरकडे येऊं लागले. शेवटीं सरकारनें वाघ मारण्यासाठीं घसघशीत बक्षीस लावलें; नि लागोपाठ आमच्या पोलीस-खात्यालाहि हुकूम सोडला कीं पोलीसखात्यानें आपले लोक पाठवून हा वाघ ठार करावा....बक्षिसाच्या आशेनें कोणी शिकारी पुढें न आला तरी सरकारला आपलें कर्तव्य पार पाडायलाच हवें होतें—

माझी रत्नागिरी जिल्ह्यांत डेप्युटी सुपरिंटेंडेंट ऑफ पोलीस म्हणून नुक्तीच नेमणूक झाली होती. माझी आजवरची शिकारी क्षेत्रांतील कामगिरी माझ्या खात्यांतील वरिष्ठांना चांगली परिचित होती. एके दिवशीं डी. एस्. पी. साहेबांनीं मला बोलावून घेतलें नि म्हटलें, "आय् वुड लाईक टु डेप्युट यू टु भैरवगर टू किल् द ब्लडी मॅन ईटर–वुड यू लाईक टू—'

'ओह, शुअरली, सर–' मी आनंदानें होकार दिला नि दुसऱ्याच दिवशीं मी माझ्या दिमतीला दिलेल्या एक डझन हत्यारबंद शिपायांना घेऊन जीप गाड्यांनिशीं रांजणवाडीच्या दिशेनें निघालों.

हरकूळ, कनेडी, नाटळ अशीं रस्त्यावरचीं गांवें मागें टाकीत आम्ही सह्याद्रीच्या पायथ्याशीं 'दिगवळें' गांवांत येऊन ठेपलों. पाणी पिण्यासाठीं एका धनगराच्या खोपटासमोर आम्ही थांबलों, तेव्हां बरोबरच्या वाटाड्यानें (तो रांजणवाडीचा पोलीसपाटील होता.) हात लांबवून म्हटलें—'तो पहा भैरवगड, त्या पैलाडच्या पाजेवर—'

पाजेवर म्हणजे डोंगराच्या सुळक्यावर. मी पाहिलें, तो उत्तुंग सह्याद्रीचा एक भला रुंद फांटा किंचित् खालीं झुकला होता. नि त्या फाट्याच्या माथ्यावर, शेतकऱ्यानें पागोटें बांधावें तसा एक काळ्याभोर पाषाणांनीं बांधलेला किल्ला उभा होता. किल्ल्याच्या पूर्वेकडे, पिछाडीला नैसर्गिक असा पहाड आधारला होता. दक्षिणेस एखाद दुसऱ्या कड्याचा सुळका येऊन भिडला होता. पश्चिमेकडील बाजू—म्हणजे आमच्याकडील बाजू दाट जंगलांत रुतली होती. सह्यपर्वत एखाद्या प्रचंड करवतीसारखा या टोंका-पासून त्या टोंकापर्यंत पसरला होता. या करवतीचे कांटे म्हणजे लहानमोठीं टोंकदार शिखरें, गर्द झाडीनें माखलेलीं—काळ्याकभिन्न खडकांनीं वेढलेलीं. अशाच एका बळकट कांट्यांवर शिवप्रभूंनीं किल्ले भैरवगडाची स्थापना केली होती. आम्ही पर्वताच्या पायथ्याशीं येऊन पोंचलों होतों. रांजणवाडी तेथून अदमासें मैलभर दूर होती. पुढें मल्हारी नदीचा प्रवाह होता. जीप गाड्या पुढें नेणें शक्य नव्हतें. इथेंच कॅंप टाकावा असा मी मनाशीं विचार केला. कॅंपसाठीं ही मोठी सुरेख जागा होती. प्यायचें पाणी जवळ होतें नि शिकारीचें ठिकाणहि फार दूर नव्हतें.

गाड्या नीट पार्क करून आम्ही तंबूच्या खुंट्या ठोकायला सुरुवात केली. शिपायांसाठीं दोन तंबू नि माझी एक वेगळी राहुटी. कॅंप तयार झाला. गाड्यांमधलें सामान आम्ही उतरवलें. स्टोव्ह, भांडीं, अंथरुणें वगैरे सामान नीट रचलें. बंदुका उभ्या करून ठेवल्या....समोर नदीचा डोह पाहतांच मला पोहण्याची सुरसुरी आली. सकाळपासून ठेंचाळत प्रवास करून अंग शिणलें होतें. त्यावर धुळीचीं कैक पुटें चढलीं होतीं. माझे सहकारी जेवणाची व्यवस्था लावीत होते तेवढ्यांत मी नदी गांठली नि तासभर मनमुराद पोहून परत आलों. मन आणि शरीर कसें प्रसन्न झालें होतें.

जेवणखाण होतांच मी सतरंजीवर पडल्या पडल्या समोरच्या सह्याद्रीकडे पाहूं लागलों. या माघाच्या महिन्यांतसुद्धां हिरवीगार वनसंपदा अंगावर मिरवणारा हा श्रीमंत पर्वत. याचे हे विशाल बाहूवत् भव्य पहाड, तुटलेले कडे नि त्यांच्या कुहरांतून वस्ती करून राहिलेलीं हिंस्र जनावरें—यांचे विचार माझ्या मनांत येऊं लागले. त्यांपैकींच एका जबरदस्त जनावराचे प्राण घेण्यासाठीं मी इथें आलों आहे. हें जनावर मला लाभेल काय? हा

अनुक्रम ३०७७०

उग्र पर्वत मला त्याच्या अंगाखांद्यावर खेळणाऱ्या एका वाघाची शिकार करूं देईल काय ? कीं हा पर्वत माझ्याऐवजी त्या वाघाची बाजू घेऊन माझा पराभव करील ? मी असे वेडेवांकडें विचार करूं लागलों. समोरच्या डोंगराला माणूस कल्पून त्याच्याशीं मनांतल्या मनांत बोलूं लागलों. नि त्या विचारांच्या भरांत माझा कधींच डोळा लागला.

—संध्याकाळ झाली नि मी झोंपून उठलों तेव्हां राजणवाडीचे समस्त गांवकरी माझ्या झोंपून उठण्याची वाट बघत तंबूबाहेर मोकळ्या मैदानांत बसून राहिलेले मला आढळले. वाघाच्या भीतीनें त्रस्त झालेलें ते गरीब खेडूत मोठ्या आशेनें माझ्याकडे आपलीं गाऱ्हाणीं घेऊन आले होते. मी म्हणजे त्यांना जणूं देवदूतच वाटत होतों. आमच्या शिपायांनीं बाहेर ओळीनें उभ्या करून ठेवलेल्या बंदुका पाहून ते खूष झाले होते. आतां वाघ मारला जाणार, याची त्यांना खात्री वाटत होती.

त्यांच्याबरोबर बोलतांना मला आवश्यक ती सारी माहिती मी काढून घेतली. वाघ केवढा मोठा आहे, हें मात्र नक्की कोणीच सांगू शकत नव्हता. एकजण म्हणाला—

—"माजो बैल तेनां येकट्यानें ओढून नेल्यान; म्हंजे तो केवढो मोठो आसात् तां तुमी बगा ! सरासरी तीन वाव लांब नि छातीयेवडो उंच तरी आसूक होयो—"

"छ्या: छ्या: काय तरी काय सांगतस् मेल्या ! मी पैज लावून सांगतंय्, वाघ आसा लहानच...बिबट्या वाघापक्षी जरा थोर...पुन जातीचो लय् चंडाळ—"

आतां मला सांगा, ह्या दोन गांवकऱ्यांपैकीं खरें कोणाचें मानायचें ? एकजण म्हणतो–वाघ तीन वाव लांब ( म्हणजे पंधरा फूट ! ) नि छातीएवढा उंच असला पाहिजे ! ( बेट्यानें वाघ कसला असतो तें बापजन्मीं तरी पाहिलें होतें कीं नाहीं, कुणास ठाऊक ? ) नि दुसरा पैजेवर सांगतो, कीं वाघ बिलकूल छोटा आहे ! आहे कीं नाहीं मौज ?...पण खेड्यावरच्या लोकांची ही संवय मला ठाऊक होती. एकजण सांगेल त्याच्या नेमकें उलटें दुसरा सांगणार–"

एक गोष्ट मात्र सत्य होती कीं हा वाघ भलताच धीट होता. आजकाल तो सरळ गांवांत घुसत असे. माणसाच्या अंगावर चाल करून जात असे. जनावरें मारीत असे नि सरळ ओढून नेत असे. वाघ भला मोठा होता नि कमालीचा डांबीस होता...त्याच्याशीं सामना देणें ही गोष्ट तेवढीशी सोपी नव्हती, एवढें मात्र मी गांवकऱ्यांशीं बोलतांना उमगून चुकलों... मनाशीं म्हणालों; ठीक आहे; काय होतें तें पहावें. भरंवशानें मी इथें आलों आहे नि एकदां कामगिरी पत्करल्यावर तींत माघार घेणें हें मला माझ्या आईवडिलांनीं शिकविलें नव्हतें. हा वाघ जर एवढा माजला असेल तर त्याला ठोकल्याशिवाय इथून परतायचें नाहीं—काय होईल तें होवो—!

ऐन माघांतली थंडी रात्रीं भारी झोंबूं लागली. तशी आम्ही बाहेर जाळ पेटवला नि त्याच्या सभोंतीं बसून गप्पा मारूं लागलों. चार-सहा गांवकरीहि आमच्या सोबतीला आले होते. गोष्टी अर्थात्‌च शिकारीच्या चालल्या होत्या. पौर्णिमा दोन दिवसांवर आली होती. चांदणें झकास पडलें होतें. गप्पा रंगल्या होत्या. तेवढ्यांत समोरच्या भैरवगडाच्या बाजूनें मला आवाज ऐकूं आला. सारें चुपचाप झालें. नि मग पुन्हां एकदां तो आवाज घुमला. प्रथम किंचित् हळू नि मग चढत्या क्रमानें स्प्रिंग ताणली जावी तशी त्या आवाजाची स्प्रिंग ताणत गेली. नि शेवटीं पटकन् आंखडली गेली...मी जें गुरगुरणें अपेक्षिलें होतें तेंच गुरगुरणें मी ऐकत होतों. वाघाचें गुरगुरणें कधीं दीर्घ नसतें. तें मध्येंच तुटतें. अंगावर वसकन् आल्यासारखें वाघाचें गुरगुरणें असतें. वाघ भैरवगडावर डरकाळत होता नि त्याचे पडसाद आजूबाजूच्या पहाडांतून उमटून तो आवाज अधिकच घुमत होता—अधिकच भीषण वाटत होता.

"असो गुलाम गेले चार रात्रीं गुरामताहा...रातभर अस्सो ओरडत आसता—"गांवकऱ्यांपैकीं एकानें माहिती दिली.

मला थोडेंसें आश्चर्य वाटलें. कारण; वाघ कसलाहि असो, तो असा विनाकारण कधीं गुरगुरत नसतो. वाघाची मादी जेव्हां माजाला येते नि तिला तिचा दादला सांपडत नाहीं तेव्हां बेभान होऊन ती अशी ओरडूं लागते. किंवा गोळी खाल्लेला जखमी वाघ कांहीं चाहूल लागली म्हणजे असा गुरमतो...बैचेन झालेला वाघ एरवीं सहसा रोंरावत नाहीं. मग

मला गांवकऱ्यांनीं अधिक माहिती पुरवली. दोन दिवसांनीं माघी पूर्णिमेला भैरवगडावर वार्षिक जत्रा भरणार होती; नि त्यामुळें गडाचे मानकरी नि रांजणवाडींतले इतर लोक यांनीं गडावर रहिवास केला होता. वर्षभरांत गडावर चुकून न जाणारा माणूस या जत्रेंत तेवढा गड चढतो. या जत्रेला खेडूत लोक फार मानतात. या वर्षींहि वाघाच्या भीतीला न जुमानतां कांहीं भाविक लोक गडावर गेले होते. त्यांनीं गडावर साफसफाई चालवली होती. दिवाबत्ती लावली होती. त्यामुळें गडावरील निबिड आणि शांत वातावरणांत एक प्रकारची हालचाल निर्माण झाली होती. गडाभोंवतीं वस्ती करून राहणाऱ्या त्या वाघाला हा विक्षेप सहन झाला नव्हता. नि म्हणून तो चिडून गेला होता. रागावून धुसफुसत होता. गुरगुरत होता.

रात्रीं बराच वेळपर्यंत आम्ही अशा गप्पाटप्पा करीत शेकत बसलों होतों. थोड्या वेळानें वाघाचें गुरमणें कमी झालें. बहुधा तो गड उतरून खालीं गांवदरीला आला असावा. ज्याला ठार करण्यासाठीं मुद्दाम मी आलों होतों, त्या वाघानें आल्या दिवशींच आपला आवाज माझ्या कानीं घातला होता; आणि एका परीनें सांगितलें होतें कीं, गड्या आलास; ठीक आहे—भेटूं सावकाशीनें. तोंपर्यंत जरा या माझ्या मुलुखाची हवा थोडी चाखून बघ—

दुसऱ्या दिवसापासून आमच्या मोहिमेला प्रारंभ झाला. प्रथम एकटें एकटें हिंडून रानाची नि आजुबाजूच्या प्रदेशाची पहाणी करावयाचें मी ठरविलें. आम्ही बाहेर पडणार, तोंच रात्रीं कँपवर झोपायला असलेला धाकू कदम आपली गांवठी बंदूक खांद्यावर टाकून ऐटींत माझ्यासमोर येऊन उभा राहिला नि म्हणाला, "मांका 'फरमीसन' द्येवा—मीपुन येतंय् तुमच्याबरोबर—"

धाकू कदम या भागांतला नांवाजलेला बरकंदाज होता. या पिसाटलेल्या वाघावर गोळी घालण्यासाठीं त्याचेहि हात फुरफुरत होते. त्याचा उत्साह-भंग करणें मला शक्य नव्हतें. पण माझ्या डोक्यांत कोणता विचार आला देव जाणें, मी पोलिस ऑफिसरच्या आवाजांत धाकूला म्हटलें, "धाकू, बंदूक घेऊन निघालास खरा. पण लायसेन्स आहे काय बरोबर ?"

लायसेन्सचें नांव निघतांच तो भाबडा शिकारीगडी बावरला. आपण एका पोलिसच्या माणसासमोर चोरटी बंदूक शिकारीच्या नादांत घेऊन आलों, हें त्याच्या आतां कुठें लक्षांत आलें. नि विलक्षण वरमून तो म्हणाला—" सायेब, पकडीत असलास तर पकडा बापडे ! पुन आमच्या ह्या मुलखांत बंदुकीसाठीं लायसेन् काडीत नाय् आमी कदीं—"

कायदेभंगाची कारवाई करून शिकारीच्या एकंदर खेळाचा सत्यानाश करण्याची माझी इच्छा नव्हती. मी बिनपरवान्याच्या बंदुका पकडण्याच्या मोहिमेवर यावेळीं आलों नव्हतों. माणसें खाणारा वाघ मारण्याची कामगिरी माझ्या गळ्यांत खात्यानें घातली होती. मी त्याच्या पाठीवर थाप मारून म्हणालों,- " दोस्त, शिकारीच्या कामांत मला तुझी चांगली मदत झाली पाहिजे. बस्स. तुझी बंदूक कसली आहे तें यावेळीं माझ्या नजरेला दिसत नाहीं, समजलें ? "

" मेहेरबानी साहेब, "—धाकू कदम वांकून रामराम करीत खूश होऊन म्हणाला—

माझ्याबरोबरचे सगळे पोलीस शिपाई चांगले शूर होते. निधड्या छातीचे आणि उत्तम निशाणबाज गडी होते. त्यांतील चौघांना भैरवगडाच्या पिछाडीस नरडव्याच्या दिशेनें पाहणी करण्यासाठीं जाण्याचा मी हुकूम दिला; बाकीच्यांना दुसऱ्या बाजूस पाठवलें नि एकट्या धाकूला घेऊन मी भैरवगडाचा पहाड चढूं लागलों.

सह्याद्रीवरचे सगळे मोठे किल्ले मी यापूर्वीं पाहिले होते. त्यांचे चढाव स्वतः पायांनीं चढलों होतों. पण ह्या गडाची स्थापना त्या सगळ्यांपेक्षां अडचणीच्या ठिकाणीं केलेली मला आढळून आली. दगडांच्या खबदाडी हातांनीं पकडून तोल सांवरीत चढावें लागत होतें. बरोबर धाकूसारखा माहीतगार इसम घेतला हें बरें केलें, असें वाटूं लागलें. सुमारें दीड तास अत्यंत अवघड अशी चढण आम्ही चढून गेलों नि गड हाताशीं गवसला असें वाटूं लागलें...पण कसचें काय? मध्यें एक कडा पुन्हां तुटला होता.....त्याच्या पोटाशीं बिलगून दरींत उतरायचें होतें नि पुन्हां पलीकडची दरड चढून जायचें होतें.—मगच गडाला पाऊल लागलें असतें.

ह्या मधल्या दरींत दाट झाडी होती. वाळलेल्या पाचोळ्याचा आवाज करीत आम्ही जपून पावलें टाकीत होतों. तेवढ्यांत खालच्या दरींत कांहींतरी खसबसलें. मी रायफल सांवरली नि धाकूकडे पाहिलें—एकाग्रतेनें दरींत निरखून पहात तो कुजबुजला—'अस्वल मारनार ? तीं बघा...दोन हत पळतहत—'

दोन काळींभिन्न अस्वलें खालच्या दरींतून पळत पलीकडच्या जंगलांत जात होतीं. त्यांना आमची चाहूल लागली होती. मी रायफल खवाट्याला जोडली नि लगेच पुन्हां खालीं उतरली. मनाशीं विचार केला; ह्या निरुपयोगी पशूवर आवाज घालून फायद्यापेक्षां तोटाच व्हायचा...वाघ जवळपास कुठें असला तर सावध होऊन दडी मारायचा.

आम्ही गडावर पोंचलों, तेव्हां दुपारचे बारा वाजले होते. कालिकामूर्ति कादंबरींतल्यासारखें भयाण वातावरण गडावर होतें. जत्रेच्या तयारीसाठीं गडावर आलेले चार-सहा गडकरी गुहेंतून राहाणाऱ्या लुटारू ठगांसारखे वाटत होते. भर दुपारीसुद्धां रात्रीसारख्या कभिन्न छाया गडावर वावरत होत्या. जुनाट झाडीं, जुनाट गड, नि जुनाट वातावरण. एवढा धीट काळजाचा गडी मी. पण मनाशीं थोडा थरारून गेलों.

गडाच्या एका बुरुजावरून दुर्बिणींतून खालच्या तळकोंकणची चांगली पाहणी करतां येण्यासारखी होती. कुठें जंगल दाट आहे, कुठें दऱ्या आहेत, गुहा आहेत याचा तलास माझ्या लांब पल्ल्याच्या दुर्बिणीनें लागणार होता. दुर्बीण डोळ्यांना लावून मी पाहूं लागलों. गडाखालून वाहणारी नदी, कांठचें 'दिगवळें' गांव, पलीकडच्या छोट्या छोट्या वस्त्या, सारें कांहीं स्वच्छ दिसत होतें. एका पठारावर बरीचशीं गुरें चरत होतीं....बघतां बघतां मला तीं गुरें एकाएकी उधळलेलीं दिसून आलीं. गुराख्यांत गडबड उडाली. माणसांचा गलबलाट इतक्या उंचावरहि स्पष्ट कानीं आला. स्तब्ध वातावरणांत एकाएकी चलबिचल निर्माण झाली. मी ताबडतोब धाकूला म्हणालों— 'धाकू, खालीं कसलीतरी गडबड उडाली आहे....बघ ह्या भिंगांतून—'

जन्मांत प्रथमच दुर्बीण डोळ्यांना लावणाऱ्या धाकूला कांहीं समजेना. तो बावचळून भलतीकडेच पाहूं लागला.

खालीं पठारावर लागोपाठ बंदुकीचे दोन आवाज झालेले ऐकूं आले. मी जवळ जवळ हिसकावूनच धाकूच्या हातून दुर्बीण घेतली नि पाहूं लागलों.

एक भलामोठा वाघ मैदानांत उतरला होता...गुरें जीव घेऊन पळत होतीं. गुराखी गांवच्या दिशेनें आरडाओरडा करीत पळत सुटले होते.... मैदानांत कोणीच उरलें नव्हतें. वाघ चिडलेला दिसत होता. इकडे तिकडे शोधक नजरेनें पहात होता. कुणाची तरी चाहूल घेत होता....कुणासाठीं तरी टपलेला दिसत होता...गोळीबाराला तो लवलेशहि भ्यालेला दिसत नव्हता.

तोंच पलिकडच्या झाडींत वाघापासून बऱ्याच दूर अंतरावर मला माझे पोलीस लपत छपत त्या वाघावर गोळ्या झाडण्यासाठीं योग्य अशी जागा शोधीत असलेले आढळले. शाब्बास; माझ्या आधींच माझ्या बहाद्दर दोस्तांशीं वाघाची गांठ पडली होती तर ! मी आतुरतेनें पहात होतों.

मग कांहीं मिनिटांतच पुन्हां एकवार गोळीबार झाला नि इतका वेळ मैदानांत असलेला तो वाघ लांब लांब टांगा टाकीत पसार झाला. मला आश्चर्य वाटलें. हा आवाज पहिल्या दोन आवाजासारखा झाला नव्हता. पहिले दोन्ही बार फुकट गेले होते, हें मी त्यांच्या आवाजावरूनच ओळखलें होतें. पण हा आतांचा आवाज तसा नव्हता. मग हा आवाज अंगाशीं भिडूनहि वाघ हातचा का निसटावा !...हां, बरोबर होतें. पोलिसांनीं फारच दुरून फायरिंग केलें होतें. वास्तविक ही चूक त्यांनीं करायला नको होती....पण प्रसंगीं माणूस उतावीळ होतो. सगळ्यांनाच धीर धरणें साधत नाहीं. गोळी खाऊन वाघ निसटला असेल तर ती गोष्ट कांहीं चांगली झाली नाहीं. त्याला बंदुका जवळपास फिरत आहेत हें कळून चुकलें होतें. आतां त्याला गांठणें अधिक कठीण होतें... मी व्हिसल काढली नि खूप जोरानें फुंकली. कंबरेला गुंडाळलेलें खुणेचें निशाण जवळच्या एका उंच काठीला गुंडाळलें नि जोरजोरानें हलवूं लागलों. पुन्हां एकदां शिट्टी फुंकली...साथीदारांना आपण कुठें आहों, हें कळावें म्हणून योजिलेली ही आमची नेहमींची युक्ति होती.

माझा ठिकाणा खालच्या पठारावरील माझ्या साथीदारांना लगेच कळून आला. त्यांनींहि खुणेच्या शिट्ट्या फुंकल्या. तिन्ही बाजूंच्या पहाडांतून

त्या दीर्घ शिट्ट्यांचे प्रतिध्वनि घुमले. मग मी कँपवर तांतडीनें एकत्रित होण्याचा शिट्टीनें इशारा दिला नि तशा दमलेल्या अवस्थेंतहि धाकूला घेऊन गड उतरूं लागलों. गड चढण्यापेक्षां उतरणें अधिक जिकिरीचें होतें. पायांत गोळे येत होते. दमछाक होत होती. पण ज्या उद्देशानें मोहिमेवर निघालों होतों, तो उद्देश सफळ होण्याचीं लक्षणें दिसत होतीं. वाघ आमच्या नजरेस पडला होता. त्याची आमची ओझरती का होईना, मुलाखत झाली होती. आतां आमचें कौशल्य आणि त्याची हुषारी यांची कसोटी लागणार होती.

मी उमेदीनें गडाची उतरण उतरून कँपवर आलों. सगळे पोलीस येऊन हजर झाले होते. कँपवर मागें राहिलेल्या दोघांनीं जेवणाची तयारी पुरी केली होती. कँपवर येतांच मी धाकूला गांवांत पिटाळलें नि येतांना मिळतील तेवढे गांवकरी रान काढण्यासाठीं घेऊन ये म्हणून सांगितलें.

शिपायांनीं मला रिपोर्ट दिला कीं, त्यांनीं झाडलेल्या गोळीनें वाघ खात्रीपूर्वक जखमी झाला होता. पण गोळी कारणीं लागली नव्हती. गोळी फार दुरून घातली गेली नि ती बहुधा निसटती,–पोकळ अंगीं लागली असावी. वाघाच्या शक्य तितक्या नजीक जाऊन शिस्तीनें गोळीबार करण्याइतपतहि त्यांना सवड न देतां तो फरारी झाला होता. वाघ त्यांना वाटलें त्याहून भक्कम होता नि कमालीचा चपळ होता.

आमचें जेवणखाण होईपर्यंत चाळीसपन्नास गांवकरी लाठ्याकाठ्या, भाले नि ठासणीच्या बंदुका घेऊन आले. धाकूनें आपलें काम चोख बजावलें होतें. एवढ्या गड्यानिशीं रानाचा कोंपरान् कोंपरा चाळणें सहज शक्य होतें.

मी आतां गंभीरपणें विचार करूं लागलों; कीं हें माझें करणें बरोबर आहे का? जखमी झालेल्या नि नरमांसाची चटक लागलेल्या ढाण्या वाघाला मारण्यासाठीं हांका घालणें कितपत योग्य होतें? समजा, हा सैतान उलटला नि त्यानें या गरीब खेडुतांपैकीं कांहींजणांना इजा केली, कांहींजणांना ठार केलें तर त्याची जबाबदारी कोणावर? केवळ माझ्या नि माझ्या जोडीदारांच्या शौर्यावर विश्वासून हे इतके लोक हांका

घालण्यासाठीं जमा झालें आहेत; त्यांच्या जीविताची मी हमी देऊं शकेन काय ?....बरें तसें न करावें तर हा सावध झालेला वाघ थोडी सवड मिळतांच, पांच-दहा मैलांचा टापू पार करून दुसऱ्या कुठल्यातरी दिशेला जाईल, आमच्या साऱ्या परिश्रमांवर पाणी पडेल नि त्याचा पुन्हां माग काढण्यासाठीं एक नवीच मोहीम हातीं घ्यावी लागेल. कदाचित् हा मग आमच्या दृष्टीस पडणारहि नाहीं. त्याला तसा नाहींसा होण्यासाठीं योग्य अशीं कितीतरी ठिकाणें समोरच्या सह्याद्रींत आहेत. काय करावें ? कांहीं डोकें चालेना. पण कांहीं झालें तरी चटकन् निर्णय घेणें भाग होतें. सारा सरंजाम जय्यत होता. वाघ टप्प्यांत आलेला होता. माझ्या हुकुमासाठीं माणसें अधीर झालीं होतीं. वाघाचीं शंभर वर्षें भरलीं असेंच जणूं तीं धरून चाललीं होतीं. नि मी जबाबदारीच्या ओझ्यानें दबून गेलों होतों. एवढीं माणसें आधींच जखमी झालेल्या नरभक्षकाच्या अंगावर सोडणें हेंहि मला योग्य वाटत नव्हतें. जन्मांत मी असा कधीं गोंधळून गेलों नव्हतों. दरवडेखोरांची सशस्त्र टोळी पकडतांनादेखील माझें डोकें इतकें कधीं गोंधळलें नव्हतें.

शेवटीं परमेश्वराच्या नांवानें मी निर्णय घेतला. हांका घालून वाघाला बाहेर काढायचें नि त्याला ठार करायचें, असेंच शेवटीं मी ठरविलें.

सगळ्या गांवकऱ्यांना मी प्रसंगाची कल्पना दिली. रान हांकण्याची माझी पद्धति त्यांना मी समजावून दिली. अगदींच आणीबाणीची पाळी आल्याशिवाय गांवकऱ्यांतील एकाहि बरकंदाजानें आपल्या नळीचा उपयोग करावयाचा नाहीं, असें पुन्हां पुन्हां बजावलें. हांका घालणाऱ्यांनीं 'फुली' नि 'मागोरी' या दोन फळ्या कशा धरावयाच्या, तें समजावून दिलें. 'फुली' म्हणजे ज्या दिशेनें रान काढीत चाल करून जावयाचें ती दिशा. नि 'मागोरी' म्हणजे रानकाढ्यांच्या पिछाडीची दिशा. ह्या दोन फळ्या सांभाळणारे जे बरकंदाज त्यांना 'फुली' नि 'मागोरी'चे बरकंदाज म्हणायचें. या 'फुली' 'मागोरी' वर मी माझे निष्णात पोलीस ठेवायचें ठरविलें नि मी स्वतः रायफल घेऊन रानकाढ्यांच्या संगतीनें प्रत्यक्ष रानांत शिरायचें ठरवलें. मला चुकवून जनावर जरी 'फुली' किंवा 'मागोरीवर' निसटतें, तरी त्याच्यावर आवाज झाल्यावांचून राहता ना. —रानकाढ्यांच्या दोन टोळ्या बनवल्या. उमेदवार पोरेंसोरें गंमत म्हणून रान काढायला

आलीं होतीं. त्यांना तडक घरीं पिटाळलें. नजीकपासच्या उंच उंच झाडावर धाकू कदमाच्या सल्ल्यानुसार चलाख नजरेचे टेहेळे ठेवले रानकाव्यांना दिलेल्या सूचनांची पुन्हां एकदां उजळणी केली नि आम्ही सगळे निघालों.

चार वाजण्याचा सुमार झाला होता. आतां जेमतेम अडीचतीन तासच रान धरणें शक्य होतें. एवढ्या अल्प मुदतींत वाघाची गांठ न पडली तर ?...पण असे अभद्र विचार मनांतून झटकून काढीत मोठ्या उत्साहानें आम्ही निघालों. दुपारीं ज्या रानांत वाघ नाहींसा झाला होता, तेवढ्याच रानाचा तुकडा आज भांगलून काढायचा असें मी ठरवलें होतें. माझ्या अंदाजाप्रमाणें वाघ एवढ्या वेळांत दुसरीकडे कुठें जाईल, असें वाटत नव्हतें. झालेल्या गोळीबारानें भेदरून जाऊन तो तिथल्याच एखाद्या घळींत काळोख पडेपर्यंत दडून बसेल, असा माझा कयास होता.

चला, घोडामैदान समोर ठाकलेंच आहे. आतां अंदाज कसले ? आतां होईल तें सगळें प्रत्यक्ष....घडेल तें सगळें सत्य...

हां हां म्हणतां आम्ही त्या सुमारें अर्धा पाऊण मैल लांबीरुंदीच्या जंगलाच्या तुकड्याला पद्धतशीर वेढा दिला. माझ्याबरोबरच्या शिपायांनीं 'फुली' नि 'मागोरी' सांभाळून धरली नि मी रानकाव्याबरोबर रानांत शिरलों. माझ्या इशाऱ्यासरशीं रानकाव्यांनीं आवाज द्यायला सुरुवात केली. जाळीजाळींतून दगड पडूं लागले. टाळ्या वाजूं लागल्या. कुकारे घुमूं लागले. आपटबारांनीं रान दुमदुमून गेलें. झाडाझाडांतून असलेलीं पांखरें घाबरून फडफडाट करूं लागलीं. मोकळ्या आभाळांत भराऱ्या घेऊं लागलीं. कावळ्यांनीं कल्लोळ मांडला. माकडांच्या चीत्कारांनीं रानकाव्यांच्या गोंगाटांत भर घातली. घटकेपूर्वीं चिडीचीप असलेलें तें अरण्य गजबजून निघालें. तळापासून ढवळून निघालें.

रानकाव्यांच्या दोन्ही टोळ्या रानाच्या दोन कडा धरून रान काढीत पुढेंपुढें चालल्या होत्या. रानाच्या मध्यभागांतून मी आणि धाकू कदम सावधगिरीनें चाललों होतों. अद्याप जनावराची चाहूल लागत नव्हती. पण कुठल्याहि क्षणीं जनावर नजरेस पडण्याची शक्यता होती; नि डोळ्यांत तेल घालून पाऊल टाकावें लागत होतें.

घटकाभर वेळ गेला नसेल तोंच रानकाव्यांच्या उजव्या फळींतून गोळीबार झाला. एक तोफेसारखा प्रचंड आवाज वातावरणांत घुमला.

हा आवाज रायफलीचाहि नव्हता नि ट्वेल्हबोअरचाहि नव्हता. खऱ्चून गनपावडर भरलेल्या गांवठी बंदुकीचा तो तडाखेबंद आवाज होता ! मी अतिशय आश्चर्यानें आणि तेवढ्याच रागानें पाहिलें. तों काय ?... रान-काढ्यांच्या गोंगाटानें त्रस्त होऊन घळीबाहेर पडलेल्या एका भल्या पुष्ट रानडुकरावर, रानकाढ्यांपैकीं कोणी उतावळ्या बरकंदाजानें न राहवून पेट घातला होता. नि मस्तकाला गोळी लागलेला तो काळाभोर रानडुक्कर मागील दोन पायांवर उभा राहून, सुळे काढून रोंरावत होता...टीचभर लांबीची शेपटी पिरगाळीत कुणावर तरी धांवून जात होता. नि झांज घेऊन कोलमडून पडत होता ... तेवढ्यांत दुसऱ्या कोणीतरी आणखी एक आवाज काढला नि त्या पशूची धडपड कायमची थांबली ... रानडुक्कर खालीं पडतांच रानकाढ्यांनीं हातचें काम तसेंच टाकून त्याच्याभोंवतीं गर्दी केली. कोणी त्याच्या मानेवरचे रांठ केंस उपटूं लागला...तर कोणी त्याचे कान कापावयाच्या खटपटीला लागला—

केवळ दिग्ङ्मूढ होऊन मी त्या प्रकाराकडे पहात होतों ! काय उपयोग होता माझ्या मघांच्या साऱ्या सूचनांचा ? कसलेंहि दुसरें जनावर आढळलें तरी आवाज टाकायचा नाहीं; माझा हुकूम मिळाल्यावांचून रान काढणें थांबवायचें नाहीं, हें परोपरीनें पढवूनहि त्या अडाणी लोकांनीं मला अखेरीस तोंडघशीं पाडलें. क्षुल्लक मांसाच्या आशेनें त्यांनीं माझ्या सगळ्या सूचना धाब्यावर बसवल्या ! या लोकांवर विसंबून मी फार मोठी चूक केली होती...शिकारीचा संपूर्ण विचका झाला असें मला वाटूं लागलें. खेळ अर्धवटच टाकून आतांच्या आतां परत फिरावें असेंहि क्षणभर उत्कटतेनें वाटलें. विषण्ण होऊन मी रायफलीचें तोंड जमिनीवर टेकवलें नि त्या मूर्ख माणसांच्या मूर्ख हालचाली बघत कांहीं न सुचून तसाच उभा राहिलों—

नि दुसऱ्याच क्षणीं समोरच्या झाडींत एक विक्राळ गर्जना घुमली. जणूं कांहीं इतका वेळ वाट बघत बसलेल्या त्या वाघानें एक आव्हानवजा डरकाळीं फोडली. रात्रीं भैरवगडावरून आलेली गर्जना माझ्या कानांनीं बिनचूक टिपून ठेवली होती. आतांहि माझ्या कानांवर पडली ती, तीच अंगावर शहारे आणणारी, प्रक्षोभक गर्जना—

नि त्या गर्जनेसरशीं मेलेल्या रानडुकराभोंवतीं जमलेल्या रानकाळ्यांत एकच धमाल माजली. वाघ अगदीं समोरच कुठें तरी आहे, हें सगळ्यांनीं ओळखलें नि एखाद्या पलटणींतल्या आज्ञाधारक शिपायांप्रमाणें तात्काळ त्यांनीं आपापल्या फळ्या पकडल्या. त्यांच्या त्या शिस्तीचें मला त्या क्षणींहि आश्चर्य वाटल्याविना राहिलें नाहीं. पण आतां नसते विचार डोकींत आणणें खरें नव्हतें...मी ताबडतोब रायफल उचलली नि पवित्र्यांत उभा राहिलों. रानकाळ्यांनींहि काळवेळ ओळखून मूर्खपणा सोडला नि आपापल्या फळ्यांवर जोराचा हांका सुरू केला. वाघ समोरच कुठें तरी होता. निबिड झाडोऱ्यांत तो आम्हांला दिसत नव्हता....पण त्याच्या मिनिटापूर्वीच्या डरकाळीनें आमच्या शरीरावर उठलेला कांटा अद्याप जिरला नव्हता. वाघाला मात्र आम्ही दिसत असण्याची शक्यता होती....मी एकाग्र होऊन समोरच्या झाडीकडे नजर देऊन एकेक पाऊल पुढें टाकीत होतों. रानकाळ्यांपैकीं कांहींजण दरम्यान त्या ठिकाणीं भिडलें होते सुद्धां—

नि मग पुन्हां एक भली मोठी डरकाळी फोडीत तो भैरवगडचा बादशहा, समोरच्या दरडीवर मुंडकें काढून आमच्याकडे बघत असलेला मला आढळला! पाठीमागील शरीर सगळें दरडींत लपवून नि फक्त मस्तक तेवढें दिसेल अशा बेतानें तो उभा होता...मुंडक्याशिवाय त्याच्या शरीराचा कोणताहि भाग मी पाहूं शकत नव्हतों—समोरच्या झाडीनें वेढलेली जी एक दरड होती, त्या दरडीमागें तो एवढा वेळ लपला होता. त्या दरडीच्या पायथ्याशीं आतां रानकाढे पोंचले होते नि त्यांना आपल्या माथ्यावर वाघ मुंडकें काढून उभा आहे, याची यत्किंचित्हि कल्पना नव्हती!...तो अजून थोडा मोकळा दिसतो काय त्याची वाट बघत मी रायफल सांवरून उभा होतों नि तोहि माझ्याकडेच आपले पिवळे डोळे रोखून बघत होता. त्याचें भव्य मस्तक, विस्फारलेल्या डोळ्यांच्या कडांपासून कानांपर्यंत गेलेल्या काळ्या रेषा, त्याचें चपटें पण विस्तीर्ण नाक मी माझ्या नजरेंत नीट सांठवलें. नि अधिक वेळ गमावला तर हा पठ्ठ्या हातचा निसटेल, या शंकेनें मी मनाचा निर्धार करून नळी रोखली...त्याच्या दोन्ही डोळ्यामध्यें वेध घेतला...

तोंच कोण्या रानकाढयानें दरडीच्या पायथ्याशींच एक आपटबार काढला, नि दरडीच्या कांठावर निवांतपणें मस्तक टेंकून असलेल्या त्या वाघानें

चवताळून, डोळ्याची पापणी मिटेपर्यंत ताड्‌कन् खालीं उडी घेतली. दरडीच्या मुळांत असलेल्या रानकाव्यांत त्याच्या अनपेक्षित उडीनें एकच हलकल्लोळ माजला. जो तो जीव घेऊन पळूं लागला. वाघानें ज्याच्या अंगावर झडप घेतली होती तो इसम जवळ जवळ म्हातारा होता. अंगानें फाटका होता. नि भीतीनें त्याची बोबडी वळली होती. वाघाची उडी पुढ्यांत पडतांच त्यानें डोकीचें पागोटें काढलें नि कांहीं न सुचून तें एखाद्या बावळ्यासारखें त्यानें वाघासमोर पसरलें. हेतु असा कीं, आपल्या-ऐवजीं वाघानें त्या पागोट्यावर उडी घ्यावी. पण तोंपर्यंत वाघानें मागील दोन्ही पायांवर उभें राहून त्या म्हाताऱ्याच्या छातीवर पुढील पंजे रोवले होते. त्या म्हाताऱ्यानें एक रक्त गोठवणारी भीषण किंकाळी फोडली. 'मेलों–मेलों–वांचवा' अशा आरोळ्या तो मारूं लागला. हातानें नको, नको, अशा अर्थाचे हातवारे करीत तो दीनवाणें रडूं लागला. एखाद्या बकऱ्यासारखा केंकाटूं लागला. बाकीचे रानकाढे वाट फुटेल त्या दिशेनें पळून गेले. हळदिव्या नि काळ्या पट्ट्यांचा तो लांबलचक वाघ आतां एका क्षणांत त्या माणसाची चटणी उडवणार, हें जाणून मी पुन्हां बंदूक खवाट्याला जोडली. त्या म्हाताऱ्यापासून वाघ किंचित् दूर होता तर म्हाताऱ्याला गोळी लागण्याचा संभव कमी होता....वाघावर नेम धरतांना माझी फार त्रेधा उडाली. त्या म्हाताऱ्याला चुकवून गोळी घालणें पराकाष्ठेचें अडचणीचें होतें...पण तरीहि मी तें आतां करणार होतों... नाहींतरी म्हाताऱ्याचें मरण आतां टळणार नव्हतें. त्याच्या करुण किंकाळ्या नि वाघाचें जबड्यांतल्या जबड्यांत गुरगुरणें, याशिवाय दुसरा कसलाहि अवाज कानीं येत नव्हता....

पण मी असा किंचित्काळ विचारांत गढलों आहे, तेवढ्यांत त्या म्हाताऱ्याच्या शरीराच्या चिंध्या चिंध्या झालेल्या माझ्या डोळ्यांनीं पाहिल्या... काय घडतें आहे याचें पुरें ज्ञान व्हायच्या आंतच, नरमांसाची चटक लागलेल्या त्या क्रूर ढाण्या वाघानें त्या म्हाताऱ्याच्या नरडीवर झेंप घेतली... त्याला खालीं पाडून उलटापालटा केला नि एखादें कुत्रें तोंडांत भाकरी घेऊन पळ काढतें, तसा त्या वाघानें त्या माणसाचें शरीर तोंडांत धरून तेथून पळ काढला ! माझ्या रायफलीचा घोडा ओढण्याचें मला भानहि

राहिलें नाहीं...भीतीनें मी नखशिखांत थरारून गेलों. सुन्न झालों. एवढें क्रूर दृश्य मी आजपर्यंत कधीं पाहिलें नव्हतें. माणसाचा असा भयानक अंत मी कधीं नजरेनें पाहिला नव्हता. क्षणापूर्वीं हातांनीं 'नको—नको' म्हणत करुणें किंकाळ्या फोडणारा तो गरीब खेडूत माझ्या नजरेसमोरून हलेना. तो पिवळा-काळा धिप्पाड वाघ नि तो एकाकी अशक्त माणूस यांची झटापट अद्याप चाललीच आहे असें मला वाटत होतें. पण हाय... तो नुसता भास होता ! वाघानें आपलें काम पार पाडलें होतें. माझ्यासमोर एका माणसाला ठार मारलें होतें. नि तो माझ्याकडे ढुंकूनहि न बघतां त्या माणसाचा मुडदा उचलून नाहींसा झाला होता. त्या जागेवर आतां उरलें होतें त्या म्हाताऱ्याचें बरेचसें रक्त नि फाटून चिंध्या झालेलें त्याचें मळकट रंगाचें पागोटें... बेवारशी नि दीनवाणें पडलेलें... माझें सगळें धाडस, कसब, नेमबाजी त्या सैतानासमोर क्षुद्र ठरली होती... कवडीमोल ठरली होती—

* * *

नाक मुठींत धरून आणि तोंड शरमेनें काळें करून मी कॅंपवर परतलों. दरम्यान माझ्या शिकारीचा उडालेला फजितवाडा गांवांत पसरला होता. ज्या माणसाला वाघानें मारलें होतें, त्याच्या घरचीं माणसें छाती पिटीत, आक्रोश करीत माझ्यासमोर येऊन उभीं राहिलीं. त्यांचें कसें सांत्वन करावें याचा मला बोध होईना. त्यांच्यासारखेंच मुक्तकंठानें रडावें असें मला फार वाटत होतें. अपेशानें आणि दुःखानें मला रडें फुटेल असें वाटत होतें. पण मला रडें फुटत नव्हतें—आणि मी आंतल्या आंत गुदमरत होतों—

रात्र पडली. बाहेर चांदणें पसरलें. आज कॅंपवर दिवा लागला नाहीं. घडलेल्या प्रकारानें आम्ही सारे निर्जीव झालों होतों. माझे सहकारी आपसांत कुजबुजत होते. मी जखमी वाघावर हांका घालायला नको होता, असेंच ते म्हणत असावेत. मी आकाशांतल्या चांदण्या मोजीत तंबूंतल्या जमखानावर पडलों होतों. अंगावर बसणारे डांस मारावे असेंहि वाटत नव्हतें. मन खिन्न आणि हताश झालें होतें. राहून राहून पश्चात्ताप होत

होता. आज माझ्या हातून घडलेल्या चुकांना परमेश्वर माफी देणार नाहीं... जखमी वाघावर, त्यांतूनहि नरभक्षावर हांके कधीं कोणी घातले नसतील, ते मी घातले होते....वाघ समोर त्या अश्राप माणसाच्या अंगाशीं भिडला तरी मी बंदूक चालवली नव्हती...मूर्खासारखा विचार करीत राहिलों होतों....मग मी मनांतून घाबरलों होतों काय ? त्या कर्दनकाळ वाघाला पाहून मी भिऊन गेलों होतों काय ? मग मी बंदूक कां नाहीं उचलली... कां नाहीं नेम धरला ? खास मी भित्रा होतों...खास मी घाबरलों होतों !' हे विचार डोकींत येतांच मी धडपडून उठलों. माझ्या मनानें माझ्यावर भित्रेपणाचा आरोप केला तें मला असह्य झालें. खरोखरी मी भित्रा नव्हतों. वाघाला मी किंचित्‌हि घाबरलों नव्हतों. तो माझ्या अंगावर येईल असं मी क्षणभरहि मानलें नव्हतें....पण तरीहि मी गोळी चालवली नव्हती हें खरें होतें.... छेः छेः असें व्हायला नको होतें. मी सारखा चिडत होतों, तळमळत होतों. रात्रभर तो लांबलांब पट्ट्यांचा प्रचंड वाघ माझ्या डोळ्यांसमोर येत होता नि रात्रभर मी त्याच्याशीं मनांतल्या मनांत मुकाबला करीत होतों. त्या वाघाबद्दलच्या त्वेषानें मी सारखा जळत होतों...पिचत होतों. कधीं एकदां उजाडतें, मी पुन्हां बाहेर पडतों नि त्या माजोरी वाघाची छेड काढतों असें मला झालें होतें. काल थोडी अधिक अक्कल मी वापरली असती तर ही पाळी माझ्यावर येती ना. पण कालच्या चुकांची भरपाई मला आज तरी करतां येण्यासारखी होती. आज मला सूड घ्यायचा होता. त्या सैतानाला मरण दाखवल्यावांचून मी त्या म्हाताऱ्याच्या ऋणांतून मुक्त होणार नव्हतों. नि माझें हे अपेश धुतलें जाणार नव्हतें—

असें होतां होतां सूर्योदय झाला, नि काल सकाळच्यासारखे आम्ही एकटेच बाहेर पडलों. बारा पोलीस नि मी तेरावा. पुन्हां कालच्याच रानांत शिरलों. आज प्रत्येकजण हुषार होता. वाघ दिसला कीं मिळेल त्यानें गोळी चालवायची, हें आम्ही ठरवलें होतें.

दुपारपर्यंत आम्ही त्या साऱ्या रानाची नीट तपासणी केली. प्रत्येक जाळी, प्रत्येक घळ नि प्रत्येक दरड आम्ही पालथी घातली....पण कांहीं पत्ता लागेना....तहानेनें घशाला कोरड पडली म्हणून शेजारच्या नदीच्या

डोहावर मी व हवालदार भुजबळ असे दोघे गेलों. पाणी पिऊन वर येतों तों आकाशांत गिधाडें तरंगतांना दिसलीं. मी भुजबळकडे पाहिलें; त्यालाहि नेमका मला आलेलाच संशय आला होता.

मग सगळ्यांनीं एकत्र येऊन विचारविनिमय केला. नि रानाच्या वरील ज्या भागांत गिधाडें तरंगत होतीं, त्या भागाच्या दिशेनें आम्ही निघालों. थोड्याच वेळांत आम्हांला कळून चुकलें, कीं ती एक छोटीशी दरी आहे. दरी म्हणण्यापेक्षां उन्हाळ्यांत कोरडा पडलेला तो एक अरुंद आणि खोल असा ओहळ होता. त्याच्या दोन्ही बाजूंनीं दाट झाडोरा माजला होता. जनावराला लपण्यासाठीं अगदीं अप्रतिम जागा होती. त्या ओहळाच्या चारी अंगांनीं आम्ही तलास काढीत हिंडत होतों. एवढ्यांत आमच्यापैकीं दोघां जणांना हवा होता तो माग नेमका सांपडला. वाघाची ताजी विष्ठा नि नजीकच मोकळ्या जागीं सुतक्यासारखें बसलेलें एक गिधाड. आमची चाहूल लागतांच तें जडपणें उठलें. पांच पंचवीस पावलें धांवलें नि त्यानें वर झेंप घेतली—

वाघ जवळपास कुठें तरी होता यांत शंका नव्हती. काल त्यानें त्या म्हाताऱ्याला इथेंच कुठेंतरी आणून फाडून खाल्लें असलें पाहिजे. जरा धीर धरला पाहिजे नि जरा डोकें वापरून काम केलें पाहिजे.. हिंमत मर्दा तो मदत खुदा! हिंमत धरली पाहिजे. कारण कालच वाघानें गोळीबार झेलला होता. एका माणसाला ठार केलें होतें. आज तो तुफान झालेला असणें साहजिक होतें. आमच्यापैकीं कोणीहि त्याच्या नजरेस पडता तरी त्यानें बेलाशक हल्ला चढवला असता—

बाकीच्यांना ओहळाच्या वरील अंगानें अत्यंत सावध रीतीनें चालत राहावयास सांगून मी बेडरपणें त्या खोल ओहळांत उतरलों नि पांचदहा पावलें टाकतांच एक गलिच्छ वास माझ्या नाकांत घुसला. त्या दुर्गंधीचा भपकारा असह्य होऊन मी नाक दाबलें नि बंदुक सांवरीत तयारीनिशीं पुढें पाऊल टाकलें. नि एकाएकीं माझा दुष्मन पलीकडेच हातपाय ताणून झोंपी गेलेला माझ्या दृष्टीस पडला! ओढ्याच्या कोरड्या पात्रांतील थंडगार वाळूंत नि गार सांवलींत तो आरामशीरपणें एखाद्या अजगरासारखा सुस्त होऊन झोपला होता. त्याच्यांत नि माझ्यांत अंतर फार नव्हतें. शेपटी लांब

पसरून नि मुंडकें रेतींत किंचित् उलटें खुपसून तो मोठ्या मजेंत झोंपला होता. त्याच्या अंगाभोंवतीं माशा घोंघावत होत्या. बहुधा त्याच्या तोंडच्या दुर्गंधीला किंवा अंगावरील जखमेला त्या जमा झाल्या असाव्या. एरवीं त्याला कसलाहि उपसर्ग होत नव्हता. छातीचा भाता वरखालीं करीत गडी खुशाल झोंपा काढीत होता—

◆ ◆ ◆

त्याला तसा पाहतांच माझें पित्त भडकलें. माझ्या शरीरांतील धमनीन् धमनी चवताळली. मस्तकांत गरमगरम रक्त चढलें. छातीचे ठोके जोर-जोरानें ठकठकूं लागले...त्वेषानें नि सूड भावनेनें मी किंचित् थरथरूं लागलों. पण निमिषार्धात मी स्वतःला सांवरलें. वर उभ्या असलेल्या पोलिसांना वाघ आढळला असल्याची हातानें खूण केली...

नि मग जवळचा एक धोंडा उचलला....तुम्हांला आश्चर्य वाटेल...पण मी बेगुमान बनलों होतों....त्या वाघापेक्षांहि विलक्षण बेगुमान बनलों होतों...जसा काल ह्या वाघानें त्या माणसाला माझ्यासमोर फाडून खाल्ला तसा मी त्याला आज फाडून खाणार एवढीच एकमेव भावना त्या क्षणीं माझ्या डोक्यांत होती. या वाघाला बेसावध अवस्थेंत मारायचें नाहीं. आपला शत्रू कोण आहे हें त्यालाहि एकदां उघड्या डोळ्यांनीं पाहूं द्यायचें असें बेभानपणें ठरवून मी तो उचललेला धोंडा नेम धरून त्या वाघाच्या अंगावर फेंकला—

वर उभे असलेले पोलीस बंदुका पवित्र्यांत धरून आश्चर्यानें आणि भीतीनें माना वांकवून पहात होते...

दगड नेमका टाळक्यांत बसलेला होता. तो वाघ तत्क्षणींच चिडून उठला. स्वतःशींच किंचित् गुरगुरला नि आळसटल्यासारखें करीत, हातपाय रुंदावीत त्यानें आपलें भलें मोठें मुंडकें वळवून माझ्याकडे आपले कालचेंच पिंगट पिवळट डोळे विस्फारून पाहिलें—

तो असा क्षणकाळ पाहतो आहे तोंच मी त्याचें मस्तक वेधलें नि नीट खात्री होतांच चाप दाबला—

बंदुकीच्या आवाजासरशीं तो किरण घेऊन एकदां उंच उडाला नि पुन्हां खालीं कोसळला...तोंपर्यंत माझ्या बंदुकीचा दुसरा आवाज होऊन त्याच्या शरीराची चाळण झाली होती. माझ्या पहिल्या आवाजानें, नारळ फुटावा तसें त्याचें मस्तक फुटलें होतें...लालभडक रक्तांत माखलेल्या त्या वाघाचें रूप अतिशय रौद्र....अतिशय भयानक दिसत होतें. त्यानें जिवाच्या आक्रांतानें एकदां आक्रोश केला. सगळें रान थरथरून गेलें नि पुन्हां एकदां उंच उडी घेण्याच्या नादांत तो खालीं कोसळला. त्यावर तो पुन्हां वर उठला नाहीं. जसा त्यानें मला काल नेम धरायलाहि अवकाश दिला नव्हता तसा मी त्याला आज माझ्यावर झडप घालण्याइतकाहि अवकाश दिला नव्हता. केवळ मी त्याला कायमचा झोंपवला होता.—

माझे सहकारी धडाधड उड्या मारून खालीं उतरले नि त्यांनीं विजयोन्मादाच्या आरोळ्या ठोकल्या. एकमेकांना मिठ्या मारल्या...टोप्या हवेंत उंच उडवल्या! उगीचच काडतुसें उडवून वायबार काढले. मोहीम यशस्वी झाल्याचा आनंद त्यांच्या पोटांत मावत नव्हता.

या शिकारीनंतर मी कैक नरभक्षकांच्या शिकारी मारल्या. मग मग तर नरभक्षक वाघ म्हटला म्हणजे मला चेवच येत असे. त्यापैकीं प्रत्येक शिकारीच्या पूर्वीं मला या भैरवगडच्या शिकारीची हमखास आठवण येत असे. त्या ढाण्या वाघानें, त्या म्हाताऱ्या माणसाला कसें ठार केलें, तें दृश्य डोळ्यासमोर नेमकें येत असे. त्या माणसानें जीव बचावण्यासाठीं वाघाच्या तोंडीं दिलेलें तें डोकीचें पागोटें मला स्पष्ट दिसूं लागत असे....... त्या गरीब म्हाताऱ्याचे ' नको—नको 'चे हातवारे मी समोर पाहतों आहें असा मला भास होई...नि शेवटीं वाघानें त्याच्या नरडीचा घोट घेऊन झाल्यावर त्याला तोंडांत धरून कसें नेलें तेंहि डोळ्यासमोर दिसूं लागे...नि मग त्या जागीं उरलेलें तें बेवारशी पागोटें वाऱ्यावर फडफडतांना दिसूं लागे.

हृदयावर कोरून बसलेल्या त्या करुण दृश्याच्या आठवणीनें मी वेडापिसा होई नि माझे हात नरभक्षकाचा सूड घेण्यासाठीं सळसळूं लागत आणि नरभक्षक वाघाची खबर मिळेल तेथें जाऊन त्याला ठार केल्याशिवाय मला चैनच पडत नसे.

◎ ◎ ◎

## १० : बिबट्याशीं झुंज

श्वापदांनीं गजबजलेलें हिरवेंगार दाट जंगल असावें, त्यांत ठिकठिकाणीं पाणथळीचीं ठिकाणें असावींत; स्वच्छ सोनेरी अशा सकाळच्या प्रहरीं, खांद्यावर बंदूक टाकून नि पट्ट्यांतील काडतुसें चाचपीत अशा जंगलांतून पारधीसाठीं एकटेंच मनमुराद भटकावें, अशी ओढ कुणाहि जातीवंत शिकाऱ्याला कधीं लागली नसेल असें नाहीं. जंगल जेमतेम टीचभरच आहे, त्यांत झाडी आहे आहे, नाहीं नाहीं—नि रानकाढ्यांचा गलबलाट क्षणाक्षणाला वाढतो आहे, अशा ठिकाणीं मुद्दाम चालविलेल्या बेसावध जनावरावर आडून गोळी चालविणें ही सर्वसामान्य शिकार झाली. ह्या शिकारींत समारंभ खूप होतो, धोका तर विशेषसा नसतोच, नि शिकारीची खात्रीहि हमखास असते. पण एकट्यादुकट्यानें बंदूक घेऊन रान तुडवीत असतां एखादा मस्त रानडुक्कर किंवा पटाईत बिबट्या जर नजरेला पडला, तर त्याच्याशीं सामना देण्यांत जी मर्दुमकी असते ती माझ्यासारखा शिकारी कधींहि कमी लेखीत नाहीं. मृगयेची सारी बेहोषी अशा प्रसंगींच अनुभवतां येते. हाडाचा पारधी अशी संधि हुडकीत असतो नि ती मिळाली म्हणजे तिचें सोनें करतो...

अशीच एक सुसंधि मला अकल्पितरीत्या लाभली होती...राधानगरीच्या धरणाच्या जागेची पाहणी नुक्ती पुरी होत आली होती. राधानगरीच्या त्या विस्तीर्ण तलावाच्या कांठाशीं, पाण्याशेजारीं उभ्या असलेल्या बगळ्यांसारख्या इंजिनियर लोकांच्या सफेद राहुट्या उभ्या टाकल्या होत्या. माझ्या इंजिनिअर मित्रानें मला तिथला रमणीय निसर्ग पाहून तांतडीनें पत्र पाठवून चार दिवस जंगलाच्या छावणींत राहण्यासाठीं म्हणून

मुद्दाम बोलाविलें होतें. नि अशा ठिकाणीं जायचें होतें म्हणून नेहमींच्या रिवाजाप्रमाणें मी माझी बारा बोअरची बंदूक घेऊन माझ्या मित्राच्या कॅंपवर येऊन दाखल झालों होतों. त्या वस्तींत पाऊल टाकतांक्षणींच, समोर पसरलेला विस्तीर्ण तलाव, त्याच्या कांठचे हिरव्यागार झाडींनें भरलेले डोंगर नि माणसाच्या वस्तीचा अभाव पाहून मी ओळखलें कीं, आपली फार दिवसांची हौस बहुधा या ठिकाणीं तृप्त होणार. शिकारीला ही अगदीं मोक्याची आणि माझ्यासारख्या एकांड्या शिकाऱ्याला आकर्षित करणारी जागा आहे. समोर दिसणारें अरण्य नक्की जनावरांनीं भरलेलें असलें पाहिजे याची मला मनोमन खात्री पटली. मी माझ्या इंजिनिअर मित्राला म्हणालों—" गड्या, फार सुरेख ठिकाणीं बोलावून आणलंस तूं मला ! आतां तुझ्या संगतीची गरज नाहीं मला...ही माझी प्यारी बंदूक, हा काडतुसांचा पट्टा नि एकटा मी...या जंगलांत हवा तसा हैदोस घालणार. चार दिवस आतां मी तुझा नाहीं नि तूं माझा नाहींस. तूं कागदावर नकाशे काढीत बैस. नि मला माझा खेळ निवांतपणें खेळूं दे—कबूल ? "

" कबूल, कबूल. पण आज एखादा ससा तर फटकाव आल्यासरशीं... जिभेला गंज चढला आहे बघ इथें आल्यापासून. तीच ती आमटी नि तोच तो भात. जरा तुझ्या कृपेनें कांहीं झणझणीत मिळालें तर मिळालें–"

मी बंदूक घेऊन आलों आहें हें कळतांच त्या तळावर सगळ्यांनाच आनंद झाला. शिकारीची कधीं न पाहावयास मिळणारी गंमत पाहायला मिळेल, म्हणून माझ्या मित्राबरोबर काम करणारे इतर इंजिनिअर्स, त्यांचे मदतनीस, त्यांचे नोकर–सारेजण माझ्या हालचालींकडे नजर लावून बसले.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं मी उठलों. भरपेट न्याहारी केली. वॉटरबॅग भरून घेतली. बंदूक खांद्यावर चढवली नि काडतुसांचा पट्टा लटकावून मी बाहेर पडलों. माझा मित्र म्हणाला, " अरे, बरोबर कुणाला तरी घे–रान अनोळखी आहे...उगाच भलतें धाडस करूं नकोस एकटा जाऊन–"

" हें बघ, ह्या पट्ट्यांतलीं सगळीं काडतुसें संपेपर्यंत मी या जंगलाला डरणार नाहीं ! नि चुकण्याची धास्तीच सोड...कारवारच्या भुलीच्या ज़ंगलांतहि मी कधीं चुकलों नाहीं अद्याप–"

अशा विलक्षण आत्मविश्वासानें मी बाहेर पडलों. सकाळची ताजी कोंवळी हवा श्वास भरभरून घ्यावी असें वाटत होतें. सोनेरी किरणें नि निळेंभोर आभाळ यांनीं मनाला आलेली उमेद गात्रागात्रांतून ओसंडून जात होती. समोर पसरलेल्या अफाट जंगलानें मी धुंद झालों होतों. जनावर दिसलें पाहिजे नि माझी रग जिरली पाहिजे असें एकसारखें वाटत होतें.

...अशा वेळीं जंगलांत शिरण्यांत आणखीहि एक लाभ असतो. जनावर आढळलें तर उत्तमच; नाहींपेक्षां हिरव्या झाडोऱ्यांतून, निरनिराळ्या ओळखी बिनओळखीच्या वनस्पतींचें निरीक्षण करीत, स्वछंद लकेरी घेणाऱ्या पाखरांचीं गाणीं ऐकत, तोंडानें शीळ घालीत बेबंद फिरणें हीसुद्धां कांहीं कमी चैनीची गोष्ट नाहीं. दमल्यासारखें वाटलें, तर खुशाल आडवें व्हावें एखाद्या काळ्या कातळावर नाहींतर पिवळ्या जर्द वाळल्या गवतावर; भूक लागली तर पाठीची शिदोरी काढून चव घेतघेत ती आरामांत खावी....जवळ एखादा झरा असला तर त्याला कुत्र्याप्रमाणें तोंड लावावें–नाहींपेक्षां वॉटर बॅगेची धार मुखांत सोडावी आणि डरडरून ढेकर द्यावी. एवढें झाल्यावर सुस्ती येते असें वाटलें तर तिथेंच घटकाभर लवंडावें. मोठा झकास वेळ जातो. फिरतांफिरतां मध्येंच भेटणारे हुप्पे वांदर, शेपटा फुलवून धांवपळ करणारीं लालतोंडाचीं मुंगुसें नि गोजिरवाण्या खारी, तसेंच तुमची जाग लागतांच दोन्हीं कान उंच उभारून जीव घेऊन पळणारे ससे तुमची उत्तम करमणूक करतात. क्वचित् कुठे तळपत्या उन्हांत सळसळत फिरणारे जर्द नाग नि पाचोळ्यांत लपलेले सुस्त अजगर आढळतात नि आपण पावलें जपून टाकतों....ह्या अशा मुक्त फिरण्याचाहि आनंद अवर्णनीय असतो. फिरण्याची आपणाला धुंदी चढलेली असते नि पावलें थांबण्याचें विसरून जात असतात.

म्हणून त्या दिवशीं राधानगरीचें तें मनाजोगतें जंगल दिसतांच मी या दोन्हीं हेतूंनीं बाहेर पडलों. जनावर आढळेल याची एकंदर चिन्हांवरून खात्री वाटत होती. पण नच आढळलें तरी मनसोक्त भटकतां येईल; एवढी तरी किमान कमाई पदरीं पडणारच होती.

तलावाच्या कांठाकांठानें मी ऐन जंगलांत घुसलों तेव्हां नवाचा सुमार झाला होता. रिकाम्या पोटीं घरटीं सोडून बाहेर पडलेल्या नाना जातींच्या

पाखरांनीं आपल्या आवाजानें रान भरून टाकलें होतें. दूर डोंगराच्या टोकावरून येणाऱ्या कुकुटकोंबड्याच्या ( भारद्वाजाच्या ) तालबद्ध आवाजाकडे माझें लक्ष वेधलें होतें. तूर्तचें माझें ' लक्ष्य ' तो पक्षी ओरडत असलेलें ठिकाण एवढेंच मर्यादित होतें. साधारणपणें जंगलांत फिरतांना भारद्वाज पक्षी किंवा लावी जातीचीं पांखरें ज्या ठिकाणीं आढळतील त्या ठिकाणीं एखादें लहानमोठें जनावर आढळतें असा माझा अनुभव होता. त्यामुळें कुठल्याहि जंगलांत असलों तरी ह्या दोन जातींच्या पाखरांच्या ओरडण्याकडे माझें फार लक्ष असतें.

तास दीडतास मी पायपीट केली. कुकुटकोंबडा ओरडत होता; त्या ठिकाणच्या कळकाच्या बनाभोंवतीं एक चक्कर टाकली. माघ महिन्याचे दिवस होते. कळकांचीं बेटें जवळजवळ निष्पर्ण झालीं होतीं नि कांटेरी शिरडांच्या त्या गच्च दाटींत एक पाऊल जरी टाकलें तरी अंगावरील कपड्यांच्या धांदोट्या निघत होत्या. एक वेळ करवंदीच्या जाळींत घुसणें परवडतें पण कळकाच्या बेटांचीं गोष्टच नको. एवढी चिवट कांटेरी वनस्पति दुसरी कुठली नाहीं. तीं घनदाट कळकांचीं बेटें पाहून मनाशीं एक विचार मात्र ताबडतोब आला, कीं हें ठिकाण रानडुकरांना राहायला मोठें निवाऱ्याचें आहे. कुणीं सांगावें, या कळकांच्या गर्दींत एखादा वराहसमूह सुखेनैव निद्रासुख उपभोगीत पहुडला असेलहि. हा विचार मनांत येतांच मी त्या दृष्टीनें पुन्हां एकदां चारहि बाजूंनीं तपासणी करण्यास सुरुवात केली. कुठें एखादी बारीक खूण दिसती तरी मला पुढचा माग काढणें सोपें होतें.

मग मी टाळ्या वाजवूं लागलों. झाडींत इकडेतिकडे दगड फेंकले. कळकांच्या बेटांत दगड आंत घुसत नसत. शिरडांच्या फांदोट्यांत अडकून तरी राहत किंवा चिवट वाळक्या बांबूवर आदळून मागें तरी फिरत. पण त्या स्तब्ध वातावरणांत माझ्या ह्या हालचालींनीं एक प्रकारची गडबड उडून राहिली. नि थोड्याच वेळांत माझा मघाचा अंदाज खरा ठरतो आहे असें वाटूं लागलें. कळकांच्या बेटांत कांहीं खसबस सुरू झाली आहे असें वाटूं लागलें. मी भुईसरपट असे कांहीं दगड फेंकले. ते मात्र आंत

दूरवर घुसले. मी नीट बारकाईची नजर ठेवली होती; नि वरचेवर बंदुक हाताळीत होतों.

तेथील दोन कळकांच्या बेटांत थोडी मोकळी जागा होती नि तिथें कसलीतरी उंच वनस्पति माजून राहिली होती. नेमक्या त्याच ठिकाणीं कांहींतरी खुसबुसतें आहे याची मला चाहूल लागली. कसलेंहि जनावर निघो, आपण तयार असलें पाहिजे हें ओळखून मी बंदुकींत सहा बुलेट्सचें एल्. जी. काडतूस भरलें नि सावध राहिलों. खसबस वाढतच होती. मी किंचित्काल वाट पाहिली. झाडींतील आवाज थोडका थांबल्यासारखा वाटला नि मग ताबडतोब एका जवान बिबट्यानें बाहेर उडी ठोकली !

...झाडींत त्यानें डोकें उंच करतांच त्याची मला ओळख पटली. तिथें होणाऱ्या खसबसाटावरूनच मी मनाशीं ताडलें होतें कीं इथें निघणारें जनावर रानडुक्कर नक्कीच नाहीं. रानडुक्कर कधीं बाहेर पडायला इतका वेळ लावीत नाहीं. मुसंडीसरशीं गडी बाहेर पडतो नि जीव घेऊन पळूं लागतो. पण वाघाचें तसें नाहीं. तो नीट अदमास घेत, बाहेरची चाहूल चाचपीत, अति सावधगिरीनें बाहेर पडेल. एकदम बाहेर पडणार नाहीं. नि बाहेर पडतांच डोकें वर काढून नजर पोंचेल तेथपर्यंतचा मुलूख पाहून घेईल. धोका वाटला तर चाणक्षपणें पळवाटहि हेरून ठेवील नि अगदीं नाइलाजच झाला तर मात्र सरळ बाहेर पडेल नि तुमच्यासमोर क्रुद्ध होऊन सामन्यासाठीं उभा ठाकेल !... हे बारकावे मला माहीत असल्यामुळें मी ओळखलें होतें कीं एकंदर चिन्हांवरून इथें निघणारा प्राणी म्हणजे वाघच असला पाहिजे. पण तो केवढा मोठा निघेल याची मात्र कल्पना नव्हती. हें जंगल मला सर्वस्वी अनोळखी होतें. सह्याद्रीच्या या भागांत बिबटे फार आढळतात नि क्वचित् एखादा ढाण्या वाघहि निघतो एवढी माहिती मला होती. त्यामुळें माझा होरा न चुकतां वाघच बाहेर पडला याचें मला आश्चर्य वाटलें नाहीं. मी पाहिलें, वाघ बिबट्याच होता पण चांगला पुरा वाढीचा, मजबूत हाडापेराचा नि शरीरानें पुष्ट असा होता. सुमारें पन्नास फूट अंतरावर तो निःसंकोचपणें उभा होता. नि आपले हिरवेपिवळे डोळे विस्फारून भयचकित मुद्रेनें माझ्याकडे एकटक बघत होता. त्याच्या अशा पाहण्याचें मला आश्चर्य वाटलें. कारण शत्रूकडे असें ठामपणें पाहात उभें राहणें बिबट्या वाघाच्या रक्तांतच नसतें. धोका

आहे अशी पुसटशी शंका येतांच तो तिथून माहींसें होण्याची पराकाष्ठा करतो. समोरासमोर सामना देण्याकडे त्याची उपजत प्रवृत्ति नसते. आडून खुनशीपणें हल्ला करायचा हे त्याचें तंत्र ठरलेलें. त्यामुळें हा डौलदार बिबट्या असा माझ्याकडे सरळ पहात उभा असलेला पोहताचें मीं वेळ न गमावतां बंदुकीची नळी त्याच्यावर रोखली नि त्याचें मस्तक वेधण्याचा प्रयत्न केला.

नि एवढें होताक्षणीं तो जातीचा बिबट्या वाघ आपल्या जातीवर नेमका गेला. मला बंदूक नीट रोखूंहि न देतां त्यानें पुढचे पाय आखडले. मागचे पाय ताणले नि सफाईदार उडी घेतली. निमिषार्धांत स्वारी शेजारच्या घनदाट झाडोऱ्यांत दिसेनाशी झाली. मला त्यानें किंचित् काळ कुतुहलानें न्याहाळलें खरें, पण माझ्याशीं झटापट मात्र त्यानें चुकवली. मीं मनाशीं म्हटलें, ठीक आहे. एकूण मला हवा तसला नग आहे या ठिकाणीं. असेंच फिरून आतां हा गडी कुठें मुरून राहतो, कुठें त्याची–माझी गांठ पडेल नि त्याला कसा हाणतां येईल याची पूसतपास केली पाहिजे.

मी मग तिथून अतिशय सावधगिरीनें खालील खोलगट भागांत उतरलों नि तलावाच्या कांठाशीं आलों. पाहिलें, तों त्या ठिकाणीं तलावाचें पाणी ओंजळीनें किंवा तोंड लावून पितां येईल अशी एकहि जागा नव्हती. लांबवर सारखा दरडकांड पसरला होता नि पाणी तेथून पुरुषभर अंतरावर होतें. मला जनावरें पाणी जिथें प्यावयास उतरत असतील ती जागा शोधून काढावयाची होती, नि त्या ठिकाणीं दबा धरून बसावयाचें होतें. सुमारें चार फर्लांग अंतर मी दरडीवरून चालत काढलें नि एके ठिकाणीं मला दरड तुटलेली आढळली. दोन दरडीमध्यें एक कोरडा ओहळ होता नि त्याची एक पाणंद झाली होती.

नेमक्या याच ठिकाणीं जनावरें पाण्यासाठीं येत असलीं पाहिजेत असें वाटलें, नि मी खालीं उतरून निरीक्षण केलें. नि काय आश्चर्य ?...मला तेथल्या दलदलींत रानडुकरांचे खूर उमटलेले स्पष्ट दिसून आले...अधिक पाहतां वाघाच्या पावलांचे ठसेहि मी शोधून काढूं शकलों नि इतरहि कांहीं प्राण्यांचीं पावलें तेथें उमटलेलीं मला आढळलीं. बरोबरच होतें.

एवढ्या विस्तीर्ण जलाशयाचा कांठ बहुतेक सारा दरडींत वेढला होता. जनावरांना उतरून पाणी पितां येईल अशी एक हीच जागा होती नि योगायोग म्हणजे मला लपून बसतां येईल अशीहि एक सुरेख जागा वरच्या दरडीवर होती. मी तिथें जाऊन बसून पाहिलें. जनावर पाणंदींतून उतरतांना किंवा पाणी पिऊन वर चढतांना, मला कसाहि गोळीबार करतां येणें सुलभ होतें. जागा अतिशय मोक्याची होती. शिकार होईल यांतहि शंका नव्हती. एक वाघ माझ्या नजरेस पडला होता नि या ठिकाणीं आणखीहि कांहीं दृष्टीस पडण्याची शक्यता होती.

दुपारचे बारा वाजून गेले होते. मी शिदोरी सोडली. माझ्या मित्राच्या स्वयंपाक्यानें भाकरी आणि भरलें वांगें बांधून दिलें होते. त्या मसालेदार जेवणाचा मीं भरपूर समाचार घेतला नि पाणी पिऊन बंदूक उशाला टाकून मी त्या दरडीवरील सावलींत तण्णावून दिली. संध्याकाळीं पांच वाजल्यानंतरच माझी कामगिरी सुरू होणार होती. तोपर्यंत झोंप काढण्याशिवाय कांहीं उद्योग नव्हता...

जंगलच्या थंड हवेवर मी थोड्याच वेळांत आरामशीर झोंपून गेलों. किती वेळानें मला जाग आली कुणास ठाऊक....आळसटलेल्या शरीरानें मी उठलों. या वेळीं जंगलांत सारीकडे संध्याकाळच्या काळोख्या सांवल्या पसरल्या होत्या. एक प्रकारची जड स्तब्धता सगळीकडे भरून राहिली होती. सकाळचा पाखरांचा किलबिलाट, दुपारीं सगळीकडे भासणारें चैतन्य, एकाएकीं कुठें नाहींसें झाल्यासारखें वाटूं लागलें. दिवस बुडायच्या वेळचें उदासीन वातावरण पसरलें होतें. अशा वेळेस माझ्या मनाचा सारा उत्साह संपुष्टांत आला नि मला अचानक वाटूं लागलें कीं, आता शिकार-बिकार कांहीं नाहीं! सरळ उठून कॅंप गाठावा...आजचा दिवस खराब उजाडला बहुतेक. नि मग मला सकाळच्या त्या सोनेरी चपळ बिबट्याची अकस्मात् आठवण झाली. त्यासरशीं माझें सुस्तावलेलें मन हुशारलें. मृगयेचा उत्साह पुन्हां माझ्या नसांतून सळसळूं लागला. मी आजूबाजूला पाहिलें. सगळीकडे चिडीचीप झालें होतें. मनगटावरील घड्याळांत साडेसहा वाजले होते. काळोख हलक्या पावलांनीं जंगलांत घुसूं लागला होता. जनावरांची पाण्यावर येण्याची नेमकी हीच वेळ होती. मी सावरून बसलों.

वॉटरबॅगेंतील थोडें पाणी घेऊन तें डोळ्यांना लावलें व नजर चलाख केली. बंदूक पुन्हां भरली, नि दरडीवर पाणंदीच्या दिशेनें बंदूक रोखून नीट दबा धरून बसलों. आणखी तासभर वाट बघायची आणि खिशांतील छोट्या टॉर्चच्या प्रकाशांत कॅंप गाठायचा असा बेत मनाशीं ठरवला.

...फार वेळ वाट बघावी लागली नाहीं. एकेक जनावर बोलावल्यासारखें पाणवठ्यावर येऊं लागलें. प्रथम एक तरस खुरडत खुरडत येऊन पाणी पिऊन गेले. त्याला माझी जाग लागली नाहीं. मग दोन कोल्हीं आलीं. त्यांतील एकानें मला जाळींत बसलेला बहुधा टेहेळलें असावें. तें संशयानें जीव घेऊन मागच्यामागे पळालें. त्याचा दुसरा सौंगडी मात्र सावकाश पाणी पिऊन इकडेतिकडे बघत सावचितपणें निघून गेला नि मग पाठोपाठ कसलीतरी फिसफिस पाणंदीच्या वरील बाजूनें झालेली माझ्या तीक्ष्ण कानांनीं ऐकली. मीं पाहिलें, नि माझा आनंद गगनांत मावेनासा झाला ! माझा सकाळचा बहादुर दोस्त, तो देखणा बिबट्या वाघ पाणंदीच्या वरील अंगाला उभा राहून शिंका देत होता. त्याच्या त्या शिंकांची मला गंमत वाटली. बंदूक गुडघ्यावर तोलून मी बसलों होतों, तो तसाच किंचित् आणखी दबून बसलों. तो थोडा अजून पुढे यावा असें मला वाटत होतें. शिवाय तो तहानेलेला होता. त्याला अशा वेळीं गोळी घालून कोरड्या जिभेने मृत्यूच्या घरीं पाठवावा हें माझ्या आजवरच्या शिकारी बाण्याला अनुसरून नव्हतें. मी आजवर कधीं बेसावध, झोंपलेल्या, पाण्यावर चाललेल्या, व मैथुनक्रीडेंत रमलेल्या जनावरांवर गोळी घालण्याचें कटाक्षानें टाळीत आलों होतों. आजहि या समोर उभ्या ठाकलेल्या बेसावध आणि तृषार्त वाघावर गोळी न चालवतां त्याला प्रथम पाणी प्यायला देऊन मग ठोकावा असें मी ठरविलें. मिनिटभरांत तो तिथून निघाला आणि पाण्याच्या दिशेनें संथ पावलें टाकीत पाणंद उतरूं लागला. चार पावलें चालावें, पुन्हां थांबून इकडेतिकडे बघावें, किंचित् जमीन हुंगावी, पुन्हां चार पावलें टाकावींत, असें करीत तो मी बसलों होतों, त्याच्या-खालून सरळ पाण्यावर पोंचला. मी आजूबाजूला सहज नजर फिरवली. तें मघाचें कोल्हें दूर उभें राहून एकदां माझ्याकडे नि एकदां त्या वाघाकडे कुतूहलानें बघत असलेलें मला आढळलें. मी त्याच्याकडे दुर्लक्ष करून

खालीं पायाशीं येऊन भिडलेल्या वाघावर नजर खिळवली. बंदुकीचा चाप वरचेवर हाताळीत मी त्याच्या पाणी पिऊन होण्याची वाट पाहूं लागलों.

...त्या पाणवठ्याची खडान् खडा माहिती असलेला तो वाघ मग हलकेच खालीं वांकला नि निर्धास्तपणें जीभ बाहेर काढून लपालप् पाणी पिऊं लागला. काळ्याभोर पाण्यावर तरंगामागून तरंग उठले. त्या स्तब्ध वातावरणांत त्याच्या जीभेचा तो आवाज कितीतरी मोठा वाटत होता. पोटभर पाणी पिऊन होतांच त्याला थोडी मस्ती करण्याची लहर आलीसें वाटलें. त्यानें शेजारच्या चिखलांत आपला उजवा पंजा उगारून मारला नि ती ओली माती तो मजेनें इकडेतिकडे उडवूं लागला. मग त्यानें थोडें थांबून एक झकासपैकीं आळस दिला; जांभई दिली—नि आळस देतां देतां किंचित् उंच मान करून त्यानें वरतीं पाहिलें नि माझी त्याच्या छातीचें निशाण धरून रोखलेली बंदूक नि पाठोपाठ खाकी कपड्यांत लपून बसलेला मी, त्याच्या तीक्ष्ण नजरेस पडलों! त्याची माझी नजरानजर होतांच मी निमिषार्धहि न गमवतां, टार्जेटपॉईंट नीट जमला आहे कीं नाहीं याचीहि क्षिति न बाळगतां कच्कन चाप ओढला—

....धाडकन् आवाज झाला. नि त्या पाठोपाठ एक भीषण चीत्कार माझ्या कानांवर आदळला. खालीं पाणंदींत उलटापालटा होत त्यानें एकदां नेटानें किरण साधलें नि माझ्या दिशेनें उडी घेतली. बिथरल्या वाघ खवळला म्हणजे त्याच्या शक्तीपलीकडील उंच उडी घेतो, हें मला ठाऊक होतें. त्यामुळें साधारणतः बिथरल्याची उडी पोचूं शकणार नाहीं इतकी उंच जागा मी बैठकीसाठीं निवडली होती. पण माझा अंदाज चुकला. त्या पठ्ठ्यानें जीवाच्या आकांतानें मारलेली उडी सरळ माझ्या अंगावर येऊन पडली नि तो रक्तांत माखलेला वाघ माझ्या शरीरावर येऊन कोसळला. मी बसल्या जागींच जमीनदोस्त झालों...मी नुक्तें कुठें बंदुकींत दुसरें काडतूस भरलें होतें. पण वाघ असा अंगाशीं येऊन भिडेल याची मला कल्पनाहि नव्हती. मी क्षणभर गोंधळलों, घाबरलों. स्वतःचा बचाव कसा करावा हें माझ्या ध्यानांत येईना.

हा जखमीं वाघ आतां माझ्या शरीरांत आपले सुळे रुतवणार, आपल्या तीक्ष्ण नखांनीं माझीं आतडीं बाहेर काढणार असें क्षणभर मनांत

आलें नि मी घामानें निथळून निघालों....पण मग एकाएकीं मला जोर आला. विलक्षण चेव आला. समोर ठाकलेल्या मरणाचा निकराचा प्रतिकार करण्यासाठीं मी सिद्ध झालों नि त्या बिबट्याला बंदुकीच्या नळीनें पोटांत ढोसून दूर ढकलण्याचा प्रयत्न करूं लागलों. जनावर नेमकें किती जखमी झालें आहे, हें अजमावण्यासहि सवड नव्हती...आतां एक स्वतःचा बचाव नि समोरच्या शत्रूचा पाडाव या दोनच गोष्टी माझ्या डोकींत उरल्या होत्या. माझ्या प्रयत्नांना यश येत होतें. तो प्राणांतिक घायाळ झालेला वाघ माझ्या जोरासरशीं मागें हटत होता. पण तरीहि माझ्यावर आपले निष्प्रभ पंजे मारण्याचा कसोशीचा प्रयत्न तो करीत होता. त्याच्या पंजांनीं मला थोडी दुखापत झालीहि; पण तिकडे माझें लक्ष नव्हतें... मी आणखी थोडा जोर करतांच संपत आलेला तो बिबट्या दरडीवरून धाडकन् खालीं पाणंदींत कोसळला. मी तत्क्षणीं उठून उभा राहिलों, बंदूक नीट रोखली. त्याचें मस्तक धरून मी दुसरें काडतूस पेटवलें—

त्याला अधिक मरणयातना सोसावयास लावण्याची माझी इच्छा नव्हती.

....पुन्हां धाडकन् आवाज वातावरणांत घुमला. माथ्यावरील झाडींत, घरट्यांतून जमलेल्या पांखरांनीं चीत्कार केला.... धुरानें क्षणभर कांहीं दिसेनासें झालें नि खालील मातींत, अंगाला आळोखेपिळोखे देत, सकाळ-पासून माझ्या नजरेंत भरून राहिलेल्या त्या देखण्या, चपळ, जवान आणि शूर वाघानें आपले पाय लांब केले... माझ्या नरडीचा घोट घेण्यासाठीं सणसणत असलेला त्याचा कराल जबडा, माझ्या चामड्या लोंबवण्यासाठीं फुरफुरणारे त्याचे बळकट पंजे नि सूडानें निखाऱ्यासारखे पेटलेले त्याचे डोळे, बोलबोल म्हणतां अचेतन झाले. कँपवर आलेल्या पहिल्याच दिवशीं मी जबरदस्त शिकार हाणली; नि रानांत एकटें जाऊनहि माझ्यासारखा शिकारी काम फत्ते करूं शकतो, हें मी माझ्या दोस्तांना पुराव्यानिशीं पटवून दिलें !

म. ग्रं. सं. ठाणे, बालग्रंथालय शाखा.
पा. क्र. ... नों. दि. ...
वि. ...

अस्सल, रसरशीत, बहारदार नि जिवंत ग्रामीण
कथांच्या चमचमीत मेजवानीची भेट— म्हणजे—

## ‘ भे टी गां ठी ’

लेखक : शंकर पाटील

किंमत रुपये ३·५०

◆ ◆ ◆

छोट्यांसाठीं एक सुंदर नाटुकलें

## ‘ इथें बाळें मिळतात ’

लेखक : विजय तेंडुलकर

किंमत : ६० नवे पैसे

सा ध ना  प्र का श न

४३०-३१, शनिवार पेठ, पुणें २.

Hard Cook 106 - 86
Soft Cock 85 - 68
Steem Cool 63 - 30


ग्रंथ संग्रहालय,
अनु. 30
क्रमां. 2596
नौ. दि.

IRBK-0107726

IRBK-0107726